ज्ञानदीप लावू जगी

पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव	:	श्रीमन्मोरयागोसावी महाराज यांचें गद्य चरित्र
लेखक	:	विष्णु बाळकृष्ण खेडकर
प्रकाशक	:	व्ही. व्ही. पाठक, मुंबई
प्रकाशन वर्ष	:	१९१३
मूळ ग्रंथ प्रत	:	महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था, पुणे


पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प
अंकेक्षण रूपांतर - २०२०

श्रीमन्मोरयागोसा

यांचें

चरित्र.



[समाधि शके १४८३ मार्गशीर्ष वद्य ६

श्रीमंगलमूर्ति प्रसन्न.

चिंचवड येथील प्रसिद्ध साधु
श्रीमन्मोरयागोसावी महाराज

यांचें

गद्य चरित्र.



आर्यार्ध

" सत्पुरुषकथा अद्भुत रसदा ह्मणतों इलाच सुरभी मी ॥ "
(मोरोपंत)

लेखक

विष्णु बाळकृष्ण खेडकर.

स्पेशल मास्तर जिल्हा नार्मलक्लास-चिंचवड जि० पुणें.

बाळकृष्ण लक्ष्मण पाठक यांनीं
जगदीश्वर छापखान्यांत छापविलें.
शके १८३५ सन १९१३ इसवी.
आवृत्ति १ ली.

प्रस्तावना.

संसारत्याग न करितां। प्रपंचउपाधी न सांडतां॥
जनामधें सार्थकता। विचारेंचि होय॥ (श्रीरामदास)

१ ह्या असार संसारांत मनुष्य प्राण्याला सुखशांति प्राप्त होण्याचीं जीं अनेक साधनें आहेत त्यांतच संतचरित्रांचें वाचन आणि मनन हें एक मोठें सुलभ साधन आहे. प्रस्तुत चरित्राचे नायक श्रीमोरया हे एक अद्वितीय पुरुष होऊन गेले. त्यांच्या साधुत्वाची कीर्ति महराष्ट्रांत सर्वत्र पसरलेली आहे. त्यांचा चरित्र भाग लिहिण्याचा सुयोग आज प्राप्त झाला ही केवळ त्यांचीच कृपा होय. उद्योगधंद्या-निमित्तानें माझें चिंचवड गांवीं येणें झालें आणि येथें आल्यावर त्यांच्या दर्शनलाभानें एक प्रकारची मनास स्फूर्ति उत्पन्न झाली. त्या स्फूर्तीनेंच श्रींचा चरित्रभाग लिहिण्याचा मी उपक्रम केला. तो कितपत सिद्धीस गेला हें ठरविणें सदय वाचकांच्या धर्म-बुद्धीवरच अवलंबून आहे.

२ श्रीतुकाराम महाराज किंवा श्रीरामदास यांच्या इतका जरी लौ-किक पसारा त्यांचा दिसून येत नाहीं तरी साधु या दृष्टीनें त्यांच्या पेक्षां ते कमी होते असें नाहीं. वरील साधुद्वयाप्रमाणें श्रीमोरयांनीं ग्रंथरचना वगैरे फारशी केलेली दिसत नाहीं, किंवा आपण स्वी-कारलेल्या दीक्षेचा लोकांत प्रसार व्हावा असाही त्यांचा हेतु नव्हता; तथापि त्यांनीं केलेलीं कांहीं ईश्वर विषयक पदें व आरत्या वगैरे ज्या सांपडल्या त्यांतील थोड्या वेंचक वेंचक शेवटीं दिल्या आहेत.

३ श्रीमोरयांचें वैराग्य, त्यांचें अध्यात्मिक ज्ञान, आणि त्यांस झालेला ईश्वरी साक्षात्कार या त्रयीचा आमच्या वाचकांच्या अंतः-करणावर थोडासा जरी ठसा उमटला तरी आमच्या लिहिण्याचा हेतु तडीस गेला असें आम्हीसमजूं. यांचें ग्रंथलेखनाचा माझा

हा प्रयत्न पहिलाच असल्यामुळें त्यांत कित्येक दोष आढळण्याचा संभव आहे, करितां तिकडे दुर्लक्ष करून ग्राह्य भाग असेल तो "हंसक्षीर न्यायानें" घेण्याची वाचकांस सविनय प्रार्थना आहे.

४ सदर पुस्तक लिहितांना ज्यांनीं ज्यांनीं आपला अमूल्य वेळ खर्चून मला साधार माहिती, दिली त्या चिंचवडकर सद्गृहस्थांचा मी फार आभारी आहें. तसेंच पुस्तकाच्या अंतर्व्यवस्थेंत ज्या माझ्या सुहृदांनीं (ज्याचा नाम निर्देश करण्याची मला परवानगी नाहीं) अत्यंत मदत केली त्यांचा तर मी अत्यंत ऋणी आहें. नकाशे काढण्याचें बरेचसें श्रेय येथील एक सुखवस्तु गृहस्थांकडे आहे.

सर्व पुस्तक लिहून तयार झाल्यावर द्रव्याभावामुळें तें बरेच दिवस छापण्याचें राहिलें गेलें होतें. पुस्तक कसें छापून प्रसिद्ध होईल या विवंचनेंत पडलों असतां मला श्रीमंगलमूर्तीनीं एकाएकीं प्रेरणा केल्यावरून मुंबईस गेलों. प्रयत्नांतीं श्रीमंत ग० स० राव हायकोर्ट वकील; श्री. डाक्टर सर भालचंद्र कृष्ण; श्री. नारायण माधवराव समर्थ हायकोर्ट वकील; श्री. तुकाराम जावजी शेट जे. पी० इ० गणेशभक्तांनीं उदार अंतःकरणांनीं द्रव्यद्वारा यथाशक्ति मदत केल्यामुळें बरीच उमेद आली शेवटीं माझे ग्रामस्थबंधु आणि मुंबईचे फार जुनें प्रसिद्ध बुकसेलर व पब्लिशर रा. बा० ल. पाठक यांचे दुकनाच धार्मिक व भाविक मालक श्री० पंढरीनाथ विनायक पाठक यांनीं पुस्तक छापून प्रसिद्ध करण्याची माझी विनंती मान्य केल्यावरून आज हा सुयोग प्राप्त झाला आहे. याबद्दल मी या सर्वांचा अत्यंत आभारी आहे. फार तर काय पुस्तकप्रसिद्धीचें सर्व श्रेयच त्यांजकडे आहें अखेरीस ज्या श्रीमंगलमूर्तींच्या कृपाप्रसादानें हा सुमंगल दिन प्राप्त झाला, त्याचे चरणीं शतशः प्रणाम करून ही प्रस्तावना संपवितों.

कर्ता.

श्रीगणेशाय नमः

उपोद्घात.

" धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे "

(श्रीमद्भगवद्गीता)

१ मनुष्य लोकांत धर्माचें बंधन दृढतर रहावें एवढ्या करितां परमेश्वरानें अनेक विभूति मागें उत्पन्न केल्या आणि पुढेंही तो करील यांत संशय नाहीं. पशुसृष्टि आणि मानवसृष्टि या दोहोंत जर कांहीं विशेष असेल तर तो 'धर्म' या बाबतींत होय-धार्मिक-कक्षेच्या मर्यादेंत राहून मनुष्य प्राण्याला आपल्या जन्मांचें साफल्य करितां येतें तशी पशुवर्गाची गोष्ट नाहीं. " चांगलें आणि वाईट " यांची निवड करण्याला धर्मासारखें दुसरें साधन नाहीं. किंबहुना धर्म हा मनुष्य जातीचा आधारच होय. ह्यासाठीं अनेकांनीं आपले प्राण संकटांत घातले आहेत धर्मासाठीं ख्रिस्ति धर्मसंस्थापक येशूनें आपल्या स्वतांस क्रूसावर टांगून घेतलें. साक्रेटिसानें विष प्राशन केलें, मार्टीन लूथरनें आपला देह जाळून घेतला. या सर्व गोष्टींचें मूळ त्या पुरुषांच्या धर्मश्रद्धेतच होतें. इतर धर्मी यांत जर धर्मासाठीं असलीं माणसें निर्माण झालीं आहेत तर आपल्या ह्या सनातन धर्मांत किती सत्पुरुष आणि विभूति उत्पन्न झाल्या असतील ह्याची केवळ कल्पनाच करावी. त्यांत प्रमुखत्वानें गणना करावयाची ह्मणजे बौद्धमत खंडन करून ह्या भरतभूमींत धार्मिक साम्राज्य पुन्हां ज्यांनीं प्रस्थापित केलें ते श्रीमच्छंकराचार्य हे होत. त्यांची ती वादीमतखंडनाची हतोटी, त्यांचें दिव्यतेज, अतिविशाल बुद्धिसामर्थ्य आणि असामान्य विद्वत्ता हीं कोणाच्या मनांत धर्मज्योत उत्पन्न करणार नाहींत ? खरोखर अशा वंदनीय माहात्म्याकडे पाहून श्रीमद्भगवद्गीतेंत शिरोभागीं ग्रथित केलेली परमात्म्याची प्रतिज्ञा किति उदात्त, सत्य व संस्मरणीय आहे याची साक्ष पटते जशी धर्माची तशीच देशाची भरभराट ही त्यांच्या सा-

रख्या पुण्यपावन सत्पुरुषांकडून झाली. किंबहुना ज्या देशांत असल्या प्रखर धर्मतेजाची प्रभा चोहोंकडे फांकून राहते तो देश सस्यशाली असतो असें ह्मटलें असतां चालेल. आमच्या ह्या आर्यभूमीचें नांव घेतलें कीं, त्याबरोबरच मनांत धर्म मूर्तिमंत उभा राहतो. याचें कारण उघडच आहे कीं, तिचें आणि धर्माचें अगदीं तसेंच एकत्व झालेलें आहे. पूर्वीं साधुपुरुषांच्या पुण्याईनें देशाची हल्लीं सारखी निकृष्ट स्थितीच नव्हती. पोटभर खावयाला असल्यावर देशांत शांतता व समाधान असणें साहजिकच आहे.

२ आमच्या ह्या महाराष्ट्रांत कांहीं काळपर्यंत मुसलमानी धर्माची धामधूम चालू होती. सामान्य जनांस ह्या धामधूमीचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य नसल्यानें त्यावेळीं देशाची फार दुर्धर अवस्था झाली. या पुण्यभूमींत प्रत्यक्ष परमेश्वर हजारों वेळां अवतरलेला आहे. आणि अनेक वेळां दिलेल्या वचनाप्रमाणें तो धर्म संस्थापनार्थच वरचेवर अवतरत असतो. ही गोष्ट लक्षांत घेतां त्यानें अवतार स्थितींत केलेल्या उपदेशाप्रमाणें चालणें हेंच आपणांस श्रेयस्कर आहे. धार्मिक बाबींत साधुसंतावर जयकारितां येईल हें संभवनीय मानणें ह्मणजे सूर्याला तम समजणें किंवा आकाश चर्माप्रमाणें गुंडाळतां येईल असें मानणें यासारखेंच हास्यास्पद होय. धार्मिक दृष्ट्या जरी आपलें महत्व पृथ्वीवर कमी होण्याची भीति नसली, तथापि संपत्ति व वैभव इत्यादि ऐहिक बाबतींत आपण अगदीं विपरीत स्थितींत आहोंत. कारितां सत्पुरुषाचा चरित्ररूप आदर्श पुढें ठेवून ऐहिक आणि पारलौकिक सुख आपण संपादावें हें अगदीं उचित होय.

३ सत्संगप्रीति हें एक खऱ्या धार्मिकतेचें मुख्य लक्षण आहे. निर्दोष वर्तन आणि जगत्कल्याणपरायणता हीं संतलक्षणें होत. संतजन धर्माचे आधारस्तंभच आहेत. अंतःशांतीच्या उत्कृष्ट सुखाचा

अखंड अनुभव घेणारे जे माहात्मे त्यांचा जन्म व जीवितक्रम केवळ लोकहितार्थच ईश्वरेच्छेनें होत असतो. प्रत्यक्ष संतसमागम दुर्मिळ असला तथापि संतचरित्रें तरीं वाचावींत. संतांच्या समागमानें किंवा संतचरित्रें मननानें आपल्यामध्यें कोणते गुण कमी आहेत हें कळतें व विगुणता दूर करण्याचे उपायही अवगत होतात. इतर जनांच्या समागमापेक्षां संत समागमांत विशेष हा असतो कीं, संतसमागमापासून कधींही वाईट वळण लागण्याची भीति नसते. संतांचें प्रेम निरपेक्ष व निर्मळ असतें म्हणून सर्व धर्मशास्त्र ग्रंथांत संतांचें माहात्म्य फार वर्णिलें आहे. मनुष्य जातीला साधु वर्ग हा उत्तम मातापितरांप्रमाणें उपकारी आहे अशा ह्या संतमालिकेपैकीं चिंचवडचे श्रीमोरयागोसावी हे एक होत.

ज्या ज्या साधनांच्या आधारानें. हा ग्रंथ लिहिला आहे त्यांतील मुख्य साधनांचीं नांवें.

१ मोरयांचें संस्कृत श्लोकबद्ध चरित्र (हस्त लिखित)
२ मोरयांचें प्राकृत ओवीबद्धचरित्र (छापील)
३ चिंचवड माहात्म्य संस्कृत श्लोकबद्ध (हस्त लिखित)
४ गणेशभक्तकथा (हस्त लिखित)
५ मोरयांचें मराठी गद्यचरित्र इसलामपूरकर कृत (छा०)
६ मुद्गल पुराण. } छापील.
७ गणेश पुराण, }
९ चिंतामणिगोसावीचरित्र (ह. लि.)
१० भक्तिविजय (छापील)
११ मोरयांचा गाथा. (हस्त लिखित व छापील
१२ चिंचवड संस्थानांतील जुने कागदपत्र.

अनुक्रमणिका.

विषय.	पृष्ठें.
मंगलाचरण	१
उपोद्घात	१
प्रकरण १ लें. चिंचवडक्षेत्र	१
प्रकरण २ रें. कुलवृत्तांत	६
प्रकरण ३ रें. बालपण	१३
प्रकरण ४ थें. गुरुदर्शन	१७
प्रकरण ५ वें. तपश्चर्या	२१
प्रकरण ६ वें. मातृपितृनिधन	२४
प्रकरण ७ वें. गृहस्थाश्रम	२६
प्रकरण ८ वें. प्रसादप्राप्ति	३३
प्रकरण ९ वें. समाधि	३७
प्रकरण १० वें. चमत्कार	४१
प्रकरण ११ वें. परिवार	५३
प्रकरण १२ वें. अखेर	८५
प्रकरण १३ वें. उपसंहार	९६
प्रकरण १४ वें. पद्यें	९८

मंगलाचरण.

स्रग्धरा:

सर्वेशा, सर्ववंद्या, भवनिधिहरणा, वक्रतुंडा गणेशा ॥
विघ्नेशा, विश्वभर्त्या, कलिमलदहना, ज्ञानज्योति प्रकाशा॥
सद्भावें वंदितों मी तवपदयुगुलां संहरी या त्रितापा ॥
सप्रेमें शक्ति द्यावी तव चरितकथा बा रचायास बापा ॥१॥


इंद्रवज्रा.

सप्रेम मी वंदित शारदा ती ॥
आहे जगीं जी बहु बुद्धिदाती ॥
वाग्देवते बैससि मन्मुखांत ॥
येईल हा ग्रंथ तरी जगांत ॥ २ ॥


द्रुतवि॰

विनवितों सकलां अमरांप्रती ॥
सुवर देउनि तोषवि संप्रती ॥
निरसुनि मम विघ्नगणा त्वरें ॥
चरित सिद्धिस न्या अपुल्या करें ॥३॥

श्री मंगलमूर्तीचें देवालय




श्री मंगलमूर्तीचें देवालय



घाट
घाट
गणेशकुंड
श्री मोरया १
श्रीनारायण महाराज ३
सभा मंडप.
श्रीचिंतामणी ४
श्रीचिंतामणी. २
श्री धरणीधर म ५
गाभारा.
श्रीनारायण. म. ६
श्री चिंतामणी ७
श्रीदिगंबर महाराज
श्री धरणीधर म. दत्तक.
दिपमाळ
नंदी
पार
श्रीकाकामहाराज
न्हाणी
ब्राह्मण भोजनाची जागा.
मठ
श्री मोरया गोसावी यांचे देवळाचा नकाशा

श्री मन्मोरया गोसावी यांचा वंशवृक्ष.



चि. शा. पु.

प्रकरण पहिलें.

१ श्रीक्षेत्रचिंचवड.

" शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मनः "

(श्रीमद्भगवद्गीता)

१ सृष्टिसौंदर्य हा परमेश्वराचें स्वरूपदर्शक असा आदर्शच आहे. सृष्टिदेवतेचीं अनेकविध दृश्यमान स्वरूपें पाहून कोणाचेंही अंतःकरण उचंबळून गेल्याशिवाय राहणार नाहीं ! ! आणि ह्मणूनच आपल्यांतील उत्तम उत्तम कवींनीं तिचें मनोहरस्वरूप काव्यांत रंगविलें आहे; किंबहुना ईश्वर हा सृष्टिरूपानेंच केवळ नटून राहिला आहे असा भास होतो. त्यांतूनही काश्यादिक्षेत्रांच्या योगानें तर त्या सृष्टिदेवतेला विशेष पावित्र्य आलें आहे. हिमाचलांतून उत्पन्न होणारी गंगा, अमरकंटकांतून निघणारी नर्मदा, दक्षिणेंत वाहणारी कृष्णा इत्यादि नद्यांनीं आपला हा आर्यावर्त देश सुशोभित करून सोडिला आहे. अशा या पवित्रतम स्थलभागांपैकीं पुणें जिल्ह्यांत चिंचवड हें एक क्षेत्र आहे. तें पुण्याहून मुंबईस जातांना जीं स्टेशनें लागतात त्यांपैकीं तिसरें असून तेथून पश्चिमेस सुमारें दीड मैलांवर हा गांव वसला आहे. गांव जरी फार मोठा नाहीं, तरी फार जुनाट असावा असें वाटतें.

हा पूर्वी चिंचवाडी ह्या नांवानें गणला जात होता. हें नांव पडण्याचें कारण बहुधा येथें असलेल्या चिंचांच्या वृक्षांची विपुलता हें असावें व याच अर्थाचें द्योतक ह्मणून चिंचवडे ह्या उपनांवाचे ह्या गांवीं पाटीलही आहेत. त्याकाळीं येथें अरण्यमय असा बराच मोठा भाग असावा आणि ह्मणूनच तो श्रीमोरयागोसावी यांनीं आपणांस एकांतवास मिळावा ह्मणून पसंत केला. पुढें कालमानानें एकंदरींत सुधारणा होत गेल्यानें त्याच्या नांवांतही बदल होऊन तें चिंचवाडीचें 'चिंचवड' या हल्लीच्या नांवानें प्रसिद्ध झालें. श्रीमन्मोरया-गोसावीं यांनीं वास केल्यापासून तर या गांवाची महती महाराष्ट्रांत चोंहींकडे पसरली गेली. ह्याच्या भोंवतालचा प्रदेश फारसा डोंगराळही नाहीं व सपाटही नाहीं. आसपास जिराईत बागाईत जमिनी असल्यामुळें व पवनानदी दक्षिणवा-हिनी होऊन या गांवास वळसा घालून गेल्यामुळें त्यास सृष्टि-सौंदर्याची अवर्णनीय शोभा प्राप्त झाली आहे. याची कल्पना प्रत्यक्ष अवलोकन केल्यावांचून येणार नाहीं. गांवची एकंदर वस्ती सध्यां दोन हजारांवर असून ग्रामसंरक्षणार्थ पूर्वी चांगला मजबूत तट असावा असें हल्लीं अवशिष्ट राहिलेल्या त्याच्या भागावरून दिसून येतें. गांवास दोन चार वेशी असून परिस्थितीच्या प्रतिकूलतेमुळें त्यांपैकीं एकदोन अगदीं नामशेष होण्याच्या स्थितीस येऊन पोंचल्या आहेत. हल्लीं

वेशीबाहेरील भागीं बरीच मोठी वस्ती झालेली आहे, त्यांत बाजारपेठ प्रसिद्ध आहे. या गांवांत मुख्य वस्ती ब्राह्मणांची असून इतर जातींचा भरणाही बराच मोठा आहे. गांवाची रचना चांगली असून येथें व्यापारधंदाही बराच चालत असतो. आसपासच्या (पांच सहा कोशपर्यंतच्या) खेड्यांत येथून माल पुरविला जातो. गांवच्या लोकांची रहाणी शहरवजा असून बरीच घराणीं सुखवस्तु व इनामदारांचीं आहेत. एकंदरींत सर्व लोक खाऊन पिऊन सुखी आहेत.

२ गांवांत बरींच देवालयें आहेत पैकीं श्रीमारुती व श्रीभैरवनाथ यांचीं देवळें चांगल्या स्थितींत असून त्यांचे उत्साहास संस्थानांतून कांहीं मदत मिळत असते. श्रीमन्मंगलमूर्तींचें मुख्यस्थान गांवाचे दक्षिणेस असून त्यास ' वाडा ' अशी संज्ञा आहे. यांतच संस्थानची कचेरी असते. श्री मोरयागोसावी व त्यांचे पुढील सात वंशज यांचीं समाधिमंदिरें अगदीं नदीच्या पात्रांत असून त्यांतच त्या सत्पुरुषांच्या समाधी आहेत. देवळांची रचना अशी सुंदर बनविली आहे कीं ती पाहिली असतां पूर्वींच्या शिल्पकलेची व कारागिरांच्या बुद्धिमत्तेची साक्ष पटते. देवळांच्या भोंवती दगडांचा चुनेगच्ची भक्कम तट असून तो आज २।३ शेंवर्षें टिकला आहे, ह्यावरून त्याच्या कामाची कल्पना सहजच होईल. देवालयांच्या

दक्षिणेस व उत्तरेस दोन भव्य पटांगणें आहेत, यांत पूर्वी बाग होते. हल्लीं येथें त्यांचा उत्सवप्रसंगीं ब्राह्मणभोजन पाकशाळा व दुकानें यांजकडे उपयोग होतो. देवळाच्या उत्तरेस राजबिंडा या नांवाचे दोन लहान मोठे खडक आहेत. या खडकांवर महाराजांची व कोणा मराठी सं० भेट झाली ह्मणून हें नांव त्यास पडलें. गांवाभोंवतीं जकातीचीं नाकीं पूर्वी होतीं तसेंच एक टांकसाळ असून चिंचवडी नाणीं चालू असत. आतां हें सर्व बंद आहे. मुख्य देऊळ श्रीमोरयांचें असून त्यांचे पुत्रपौत्रादिक सात पुरुषांचीं देवळें त्याला लागून बांधिलीं आहेत त्यामुळें श्रीमोरयांचा परिवार एक-समयावच्छेदेंकरून दृग्गोचर होतो. दत्तक पिढीचें देवालय तुटक बांधलें आहे. श्रीचिंतामणिमहाराज व श्रीनारायण-महाराज यांचीं देवळें इतर देवळांपेक्षां खोल असल्यानें त्यांत पावसाळ्यांत नदींतील पाणी झिरपून सांचतें. सांचलेलें पाणी काढून टाकण्याकरितां देवळाबाहेर उच्छ्वास केले आहेत. त्यांतील पाणी काढलें ह्मणजे देवळांतील पाणी आपो-आप कमी पडतें. पवनानदीस पूर आला ह्मणजे सर्व देवळें पाण्यांत बुडून जातात. त्यावेळीं नदीचे पात्राचा जो भया-नक परंतु चित्ताकर्षक देखावा दिसतो तो खरोखर अवर्णनीय आहे. पवनाबाई वर्षांतून दोन तीन वेळ तरी आपल्या पवित्र

जलानें श्रीमोरयांस स्नान घालिते. देवालयाचे पाठीमागें नदीवर निरनिराळे घाट बांधलेले आहेत ते त्रिकाळ मनुष्यांच्या गर्दीनें फुलून गेले असतात. त्यावर कोणी कर्मनिष्ठ स्नान करून ललाटपटलीं विभूति चर्चून संध्यावंदन करितात, तर कोणी पवनाबाईंत धडाधड उड्या टाकून मत्स्य सुसरी इ० जलचरांप्रमाणें पोंहत आहेत. तर कोणी लगबगीनें तांब्यांत पाणी घेऊन जातां जातां शिवलिंगावर घालून श्रीमोरयांचे मस्तकीं शमी दुर्वांकुर ओलेत्यानेंच अर्पण करीत आहेत इकडे ब्राह्मणमंडळी श्रीमोरयापुढील मंडपांत बसून आवर्तनें करीत आहेत, कोणी सुवासिनी व विधवा पवनाबाईचें स्नान करून मोरयास प्रदक्षिणा घालीत आहेत, कोणी पाणी नेत आहेत असें सर्व देऊळ व सर्व घाट प्रत्यहीं गजबजलेला आढळतो. तेथें बसून सृष्टिदेवतेकडे आसमंतात् दृष्टि फेकिली असतां जो आल्हादजनक व चित्तापहारी देखावा दृष्टिगोचर होतो तो अगदीं अवर्णनीय आहे. दोहों बाजूला लहान लहान डोंगरांच्या रांगा, वृक्षांची गर्द झाडी आणि तींतून शांतपणानें वाहणाऱ्या पवना नदीचा प्रवाह पाहून या क्षेत्रांत निरंतर वास करून श्रीमंगलमूर्तींच्या दर्शनपूजनाचा अखंड मंगलमय लाभ करून घ्यावा अशी यात्रेकरू प्रेक्षकांच्या मनाची भावना होते. प्रवासी लोकां-करितां या देवळांचे संन्निधच २।३ धर्मशाळा मठ वगैरे बांधले

आहेत. गोरगरीब, अतीतअभ्यागत, बैरागीफकीर, अंधपंगू, इ० लोकांकरितां अन्नसत्र व सदावर्ते संस्थानांतून चालू आहेत. व त्यांचा उपयोगही शेंकडों लोक करून घेत आहेत.

३ एकंदरींत हा गांव कोणीही पाहिल्यावर परम संतोषदायक असाच वाटतो. अशी ही रमणीय व पवित्र भूमि पाहून श्रीमंगलमूर्तीनें श्रीमोरया गोसाव्यांस श्रीमद्भगवद्गीतेंतील वरील उक्तीप्रमाणें वास करण्याची आज्ञा केली ती सर्वथैव योग्यच होय.

४ पुढील चरित्रभाग क्रमशः दिलेला आहे त्यावरून सर्व गोष्टींचा खुलासा वाचकांच्या सहज ध्यानांत येईल.

प्रकरण दुसरें.

कुलवृत्तांत.

"पवित्र तें कूळ पावन तो देश। जेथें हरिचे दास जन्म घेती"

श्रीतुकाराम

१ या अवाढव्य सृष्टींत आपल्या आर्यभूमीचें जें विशेष महत्व आहे. त्याचें कारण तींत आजपर्यंत जे पुण्यपावन सत्पुरुष होऊन गेले हें आहे. हिंदुस्थानाशिवाय जगाच्या कोणत्याही भागांत हें साधुत्वाचें बीज इतक्या उत्तमरीतीनें उद्भूत झालेलें नाहीं. देश तसेंच कूल हीं दोन्हीं या हरिभक्तांनीं आपल्या निर्मळ व पवित्र आचरणांनीं जगद्वंद्य करून सोडिलीं

आहेत. श्रीतुकारामाच्या शिरोलिखिततत्वाचें खरें रहस्य हेंच आहे. अशा ह्या पवित्रतम भूमींत सुमारें सहाशें वर्षांपूर्वी कर्नाटकदेशांत बेदराजवळ 'शाली' नांवाच्या खेडेगांवांत वामनभट्ट नांवाचा आश्वलायनसूत्रीं हरितसगोत्रोत्पन्न देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण रहात होता. त्याचें उपनांव शालिग्राम असें होतें. याच्या बालपणची व पूर्वजांची विश्वसनीय माहिती मिळत नाहीं. तथापि तो मोठा प्रतिभासंपन्न, सदाचारी, विद्वान्, स्वधर्मनिष्ठ व महान् भगवद्भक्त असा होता. त्याची पत्नि पार्वतीबाई ही सुशील, पतिसेवापरायण, साध्वी व प्रेमळ होती–त्यांचे घरची फार गरिबी असल्यामुळें त्यास अन्नवस्त्रांची फारच टंचाई पडे. म्हणून तो आपला उदरनिर्वाह केवळ भिक्षावृत्तीवरच करीत असे, त्याला पुत्रसंतान वगैरे नसल्यामुळें त्याचें लक्ष प्रपंचांत नसे, वामनभट्ट पत्नीसह आपला सर्वकाळ ईश्वरभजनांत घालवीत असे. शेवटीं अशा ह्या कष्टमय स्थितीला कंटाळून त्यानें कोठेंतरी देशांतरास जावें व ईशकृपेनें एखाद्या क्षेत्रीं सद्गुरूची गांठ पडल्यास तेथेंच काळ घालवावा असा दूरवर विचार केला. पार्वतीबाईसही तो विचार पटला, नंतर त्यानें सर्व व्यवस्था व निरवानिरव करून गांव सोडला वाटेनें येतांना त्या उभयतांस भयंकर अरण्यांतून प्रवास करावा लागून फार

दुःखें सोसावीं लागलीं. अखेरीस थोडक्या दिवसांनीं ते फिरत फिरत शके १२५२ सालीं स्वानंदपूर क्षेत्रीं (मोरगांवीं) येऊन पोंचले. त्यावेळीं वामनभटजीचें वय सुमारें ५० वर्षांचें असावें.

२ गांवानजीक नदीतीरावर त्यांनीं कांहींवेळ विश्रांती घेतली नंतर त्याच ब्रह्मकमंडलुनदींत स्नानादिक विधि उरकून आपले भुकेनें व्याकुळ झालेले पंचप्राण तिच्या उदकप्राशनानें कसे-बसे शमविले. इतक्यांत त्याठिकाणीं कांहीं ग्रामस्थ नित्य व्यवहारार्थ येऊन पोंचले. वामनभटजीनें त्यास सप्रेम नमस्कार करून या क्षेत्राचें नांव व महिमा यांची त्यांजवळ विचारपूस केली. त्यावरून ग्रामस्थांनीं त्यास त्या क्षेत्राचा महिमा सांगितला त्याचा सारांश असाः--

ते ह्मणाले. "महाराज--या क्षेत्राचें नांव स्वानंदपुरी. (मयूरपुरी किंवा मोरगांव) असें आहे. हें नांव प्राप्त होण्याचें कारण एकदां देवांनीं कमलासुरास मारण्याकरितां यज्ञ केला. यज्ञांतून तेजोमय मयूर उत्पन्न झाले, देवांनीं त्यांचें वाहन करून त्या कमलासुराचा वध केला. त्यावरून या क्षेत्राचें नांव मयूरपूर किंवा मोरगांव असें पडून देवाचें नांवही मोरेश्वर असें पडलें. या क्षेत्राचा महिमा अगाध आहे. मुद्गल पुराणांत या मयूरक्षेत्राचें सविस्तर महात्म्य कथन केलें आहे

याचा महिमा वर्णन करण्यास प्रत्यक्ष ब्रह्मदेवही थकले मग आम्ही पामरांनीं त्याचें किती वर्णन करावें. या क्षेत्राचा अधिपति श्रीएकदंत आहे जो केवळ देवतात्रयींचें जन्मस्थान–ॐकारवदन तोच येथें प्रत्यक्ष वास करतो हें केवळ स्वानंदभुवनच आहे याठिकाणीं काश्यादि सकळ क्षेत्रें व त्रिभुवनवंद्य सर्व तीर्थें आपापल्या अंशानें सदैव वास करितात. प्रत्यक्ष ब्रह्मा विष्णु महेश हेही येथें अंशभूत होऊन राहिले आहेत. ही ब्रह्मकमंडलू नदी ब्रह्मदेवाचा सर्वतीर्थमिश्रित कमंडलू सांडून निर्माण झाली आहे. हिला प्राकृत लोक 'कऱ्हा' असें म्हणतात. फार काय सांगावें ? हें चारी मुक्तींचें केवळ माहेरघरच आहे. या क्षेत्रीं जो देह ठेवितो त्यास पुनरावृत्ति नाहीं असें जाणून इतर क्षेत्रांतून हजारों लोक येथें मुक्ति मिळण्याकरिता आले व त्यांनीं आपले देह येथेंच ठेविले आहेत. त्यांच्या ह्या समाधी पहा. या नदीतीरीं तपश्चर्या करणारे निर्विघ्नपणानें मुक्तीस जातात. या क्षेत्रांत अनुष्ठान करणारे लोक कार्यसिद्धि पावल्यावांचून राहिलेच नाहींत."

या प्रमाणें ग्रामस्थांचें भाषण श्रवण करून वामन भटजीनें हर्षित होऊन पत्नीसह त्या ब्राह्मणांस वंदन करून, त्यांचे आशीर्वाद घेतले, आणि तात्काळ देवालयांत जाऊन श्री मयु-

रेश्वराचें दर्शन घेऊन त्याची अनन्यभावें स्तुति केली. नंतर उभयतांनीं क्षणैक विचार करून आपली पुत्रकामना येथेंच परिपूर्ण होईल अशा भावनेनें वास्तव्य करण्याचें ठरविलें. आणि नदीतिरीं एक निरुपद्रवी जागा पाहून वामन भटजीनें ग्रामस्थांच्या मदतीनें एक लहानशी पर्णकुटिका तयार केली व ते दोघे उभयतां आत्यानंद पुरस्सर तेथेंच राहूं लागले.

३ वामनभटजी मोठा कर्मठ, देवभक्त व सत्यवादी मनुष्य आहे अशी लवकरच सर्वांची खात्री झाल्यामुळें ग्रामस्थलोकांपैकीं बरेच लोक त्यांचा यथाशक्ति परामर्ष घेऊं लागले. वामन भटजीचा नित्यक्रमः—ब्रह्मकमंडलूचें स्नानपान, देवदेवतार्चन, श्रीमोरेश्वराचें पूजनस्तवन, प्रेमाचें भजन आणि नंतर भिक्षाशन असा असे. असा क्रम नित्य चालला असतां त्या उभयतांनीं कांहीं दिवसांनीं भाद्रपदमासीं ग्रामस्थांबरोबर ४ दिवसपर्यंत द्वारयात्रा केल्या. शेवटीं सांगता करून वामन भटजीनें पुत्रकामनेच्छेनें सुमुहूर्तीं अनुष्ठानास आरंभ केला. बारा वर्षें पूर्ण अनुष्ठान झाल्यावर भगवान् श्री मोरेश्वर यांनीं स्वप्नदृष्टांत दिला कीं, " तुला पुत्र होणार नाहीं " वामनभटजीनें पुनः अनुष्ठानास आरंभ केला. त्यास बारा वर्षें पूर्ण होतांच पूर्वोक्त दृष्टांत झाला. याप्रमाणें तीन तपें पूर्ण झालीं तरी पुत्रप्राप्तिवर झाला नाहीं. शेवटीं त्यानें दिलगीर व निराश होऊन

चवथें उग्र तप आरंभिलें, त्यासही बारा वर्षें पूर्ण होतांच " मातेपेक्षांही मनाचा कोमळ " श्री मोरेश्वर मनांत कळवळला व त्यांनीं मी तुझी निस्सीमभक्ति पाहून संतुष्ट झालों आहें " तुझेनशिबीं पुत्रतर नाहींच परंतु आतां केवल मदिच्छेनेंच मी " तुझेठिकाणीं मानवरूपानें अवतरून जगदुद्धार करीन " असा स्वमदृष्टांत दिला. वामनभटजी जागृत होऊन पाहतो तों कोठें कांहीं दिसेना. नंतर आतुरतेनें हा घडलेला सर्व वृत्तांत त्यानें मोठ्या उत्कंठेनें आपले पत्नी-स निवेदन केला. त्या महासाध्वीस श्रीमोरेश्वर आपले उदरीं जन्म घेणार ह्मणून फारच आनंद झाला व त्या आनंदाचे भरांत तिनें आपल्या पल्लवास शकूनगांठ बांधिली. नंतर त्या उभयतांनीं मोरेश्वराचें यथोपचारपूजनस्तवन करून त्यांचे चरणीं लोळण घेतली व झालेला दृष्टांत लवकर खरा व्हावा ह्मणून करुणा भाकली. थोडक्याच दिवसांनीं पार्वती-बाई गर्भवती झाली. दिवसेंदिवस गर्भ वृद्धिंगत होत जाऊन तिला रात्रंदिवस ईश्वरभजन करावें, व पताका घेऊन यात्रेस जावें इ० डोहोळे होऊं लागले. नवमास पूर्ण होतांच श्रींच्या कृपेनें पूर्वोक्त दृष्टांताप्रमाणें. श्रीमन्‌शालीवाहन शके १२९७ विधातृनाम संवत्सरे मिति माघ शु. ४ मध्याह्न काळीं भृगुवासरीं रेवती

नक्षत्र द्वितीयचरणीं पुत्ररत्न प्राप्त झालें. साध्वी पार्वतीबाई पुत्रमुखावलोकन करीत असतां तिला शुंडादंडमंडित गणेशमूर्ति दिसल्याचा क्षणैकभास झाला व ती तन्मय होऊन गेली. तिला पूर्वदत्तवराचें व शकुनगांठीचें स्मरण झालें. आणि प्रत्यक्ष श्रीगणेशमूर्तीनें आपल्या उदरीं जन्म घेतला ह्मणून ती धन्यता पावली. इतक्यांत गणेशांनीं पूर्वस्वरूप सोडून व्यावहारिक मानवरूप धारण केलें.

६ पुत्ररत्न प्राप्त झाल्याचें वृत्त वामनभटजीस समजतांच तो मोठ्या कौतुकानें पुत्रमुख पाहण्यास आला व पुत्रमुखावलोकन करीत असतां त्यास जो आनंद झाला तो त्रैलोक्यांत मावेना. तो श्रीमोरेश्वरांचें वारंवार स्तवन करून दंडाप्रमाणें भूमीवर पडला व कृतार्थ झाला नंतर व्यावहारिकरीतीनें ग्रामस्थांसहवर्तमान वामनभटजीनें यथोचित पुत्रजन्मोत्सव-सोहळा केला. बारादिवस पूर्ण पार पडतांच मुलाचा नामकरण-विधि केला. व 'मोरया' असें त्याचें नांव ठेवून शर्करा वांटली.

७ ज्या कुळाला सदाचाराचें अगदीं साधें वळण लागलेलें असतें. त्यांत जन्म पावलेला व वृद्धिंगत झालेला मनुष्य चांगल्या आचरणांनीं युक्त असाच आढळतो. श्रीमोरयासारख्या योग्यांचा जन्म वाटेल त्या कुळांत खात्रीपूर्वक व्हावयाचा नाहीं. ईश्वरावर निस्सीमश्रद्धा, परमेश्वर प्रेम एकभाव उत्त-

म आचरण इत्यादि सद्गुण ज्या कुळांत जन्मसिद्ध मुरलेले असतात त्यांतच श्रीमोरयासारखा अद्वितीय महात्मा-पुरुष जन्मास येतो. अनेक पिढ्यांत केलेलें तपाचरण असल्या-महापुरुषाच्या अवतारानें फलद्रूप होतें. असो.

हेंच मोरया आमच्या ह्या चरित्राचे नायक होत.

प्रकरण तिसरें.

बालपण.

" प्रसादचिह्नानि पुरः फलानि "

(रघुवंश)

१ वरील अवतरणांतरगत सिद्धांताचें उद्‌घाटन श्रीमोरया-गोसावी यांच्या आयुष्यांत कसें विस्तृत रीतीनें झालें हें पुढें दिसून येईलच. 'भविष्यत् कालाचा उदय तत्पूर्वचिन्हांकित असतो.' हें तत्व कालिदासानें आपल्या रघुवंश काव्यांत सर्वमान्य होईल अशा रीतीनें वर्णिलें आहे. आणि तें आ-पल्या ह्या चरित्रनायकाच्या कीर्तीला अगदीं अनुरूप असेंच आहे यांत संशय नाहीं. श्रीमोरयांनीं बालपणांत आणि पुढें जे यौगिक चमत्कार करून दाखविले आणि आपलें अचाट दैवी सामर्थ्य जगाच्या निदर्शनास आणून दिलें त्याचें मूळ त्यांच्या बाळपणांतच जागोजाग दृष्टीस पडत होतें. असो. असलें पुत्ररत्न प्राप्त झाल्यामुळें वामनभटजींच्या पूर्व-

युक्त दुःखाचें आणि त्रासाचें परिमार्जन व्हावें, हें साहजिकच आहे.

२ श्रीमोरया हे बालपणापासूनच फार बुद्धिवान् व श्रद्धाळू होते. ह्यांच्या बुद्धीची व्यापकता आणि ईश्वरविषयक भक्ति ह्या अगदीं जन्मसिद्धच होत्या फारतर काय ही जोड त्यांना पूर्वजन्मींच लाधलेली होती, असें ह्मटलें असतां चालेल. मोरयास बाळपणींसुद्धां अश्लाघ्य बाळलीला किंवा व्यर्थ हट्ट कसातो माहीत नव्हता. त्यांची वृत्ति इतर मुलांप्रमाणें क्रीडा करण्याकडे नसून परमार्थाकडे वळलेली होती. त्यांचे ठिकाणीं देव, ब्राह्मण व साधु यांचे विषयीं पूज्यबुद्धि, सत्यप्रियता, मनाचा मोकळेपणा, शांति आणि निरभिमानता हे गुण मूर्तिमंत वास करीत होते. त्यांचा लहानपणचा क्रम समवयस्क मुलें जमवून बरोबर पाषाणाचेच टाळ घेऊन दिंडी काढावी व लहान काड्यांस चिंध्या अडकवून त्या पताका खांद्यावर घेऊन मुखानें गणेशनामाचें भजन करावें असा होता. हें ग्रामस्थांनीं पाहून त्यांचें फार कौतुक करावें. आणि हा मुलगा पुढें मोठा भगवद्भक्त होईल असें मुखानें नेहमीं ह्मणावें.

३ मोरयाचे वयास पांच वर्षें पूर्ण होतात न होतात, तोंच त्यांच्या आयुष्यमर्यादेवर एक मोठें घोरतर-गंडांतर अकस्मिक येऊन धडकलें. त्यावेळीं वामनभटजी व पार्वतीबाई

ह्यांच्या मनास फारच चिंता उत्पन्न झाली व त्यांनीं अनन्य-भावानें श्रीमोरेश्वरास शरण जाऊन आपल्या एकुलत्या एक पुत्रास त्यांतून वांचविण्याविषयीं प्रार्थना केली. त्यावेळीं ते त्यांतून निभावतील असें कोणासही वाटत नव्हतें परंतु श्री मोरेश्वरांस वामनभटजींची करुणा येऊन त्यांनीं गोसाव्याच्या रूपानें प्रगट होऊन श्रीमोरयावर आलेल्या अरिष्टाचें निरसन केलें. व त्यांस कफनी, पादुका व मंत्र देऊन ते अंतर्धान पावले.

४ श्रीमोरयांनीं परमभक्तीनें श्रींनीं दिलेला प्रसाद ग्रहण केला व ते त्याच–गोसाव्याच्या–वेषानें वर्तन करूं लागले. तेव्हां पासून त्यांस श्रीमोरयागोसावी हें नांव प्राप्त झालें. आपल्या मुलावर आलेल्या अरिष्टाचें परमेश्वरानें स्वतः येऊन निरसन केलें हें पाहून वामनभटजीस जो आनंद झाला तो काय वर्णावा ? त्याची कल्पना सहृदय वाचकच करोत. असो.

५ वामनभटजींनीं श्रीमोरयांस आठवें वर्ष लागतांच त्याचा विधिपूर्वक व्रतबंध संस्कार यथोचित थाटामाटानें केला. व त्यास थोडें बहूत शिक्षण स्वतः देऊन नंतर एका विद्वान् सुशील गुरूच्या स्वाधीन पुढील अध्ययनाकरितां केलें. श्रीमोरयांनीं आपल्या गुरूची व गुरुपत्नीची एकनिष्ठपणें सेवा करून त्यांची प्रीति संपादिली. स्नानसंध्यादिक ब्रह्मकृत्याचा ओनामा त्यांस बालपणींच झाला असल्यानें त्यांनीं थोडक्याच दिव-

सांत संहिता, जटा, घन इ० तत्कालीन विषय अगदीं मुखोद्गत केले. वेदाध्ययनाचेवेळीं त्यांची शीघ्र ग्राहकता पाहून गुरूंनीं फार आनंदानें त्यांची नेहमीं वाहवा करावी. " वसंत ऋतूंत आम्रमंजिऱ्यांचा परिमळ जसा सर्वत्र भरून राहतो " तसें त्यांचें बुद्धितेज अंतःकरणांत न मावल्यामुळें तें बाहेर सर्वत्र पसरून राहिलें आणि " घेईल ज्या गुणांला तो गुण मति वेष्टुनीहि फांकेल " ह्या आर्यार्धाप्रमाणें त्यांच्या बुद्धीनें ज्या गुणाला एकदां धारण केलें. तोच गुण ती विस्तृत करीत गेली. अल्पावधींतच त्या लौकिकगुरुपासून मिळण्यासारखी विद्या त्यांनीं संपादन केली. किंबहुना ?

" अनेकजन्मसंसिद्धिस्ततो याति परां गतिम् "

या भगवदुक्तीप्रमाणें त्यांची पूर्वजन्मींची आगाऊच सात्विक संस्कारांची तयारी होती ती या जन्मांत एकदम फलीभूत होऊन जगाच्या कल्याणासाठीं उद्भूत झाली असें ह्मटलें असतां चालेल.

श्रीमोरयांनीं आपल्या मातापित्यांची आज्ञा कधींही उल्लंघन केली नाहीं. त्यांची सर्वतोपरी शुश्रुषा करून त्यांस संतुष्ट राखण्यास ते तत्पर असत. हें पाहून वामनभटजीस आपल्या वृद्धावस्थेंत असा सुशील, आज्ञाधारक बुद्धिमान् व सद्गुणी मुलगा लाधला, ह्मणून फार समाधान होई. मुलाच्या

अंगच्या गुणाची व बुद्धीची प्रशंसा लोकांच्या तोंडून ऐकून वामनभटजींच्या अंतःकरणांत आनंदाचे उमाळे उठत. पार्वतीबाईंनीं तर मीठ मोहऱ्यांनीं त्यांची वारंवार दृष्ट उतरावी.

७ श्रीमोरयांनीं फावल्यावेळीं पूर्वश्रुत गोष्टींचा एकांतीं बसून एकाग्र विचार करावा. आणि ध्रुवास जसी दृढ निश्चयाच्या योगानें ईश्वरप्राप्ति झाली तशी आपणही प्रयत्नानें व दृढ निश्चयानें करून घ्यावी असें त्यांनीं मनांत ठरवून तदनुसार ते त्या प्रयत्नास लागले व तो त्यांचा प्रयत्न ही सिद्धीस गेला हें पुढें कळून येईल.

प्रकरण चौथें.

४ गुरुदर्शन योग.

" सद्गुरु वांचोनी सापडेना सोय । धरावे ते पाय आधीं आधीं "
(श्रीतुकाराम)

१ या दुःखमय संसारसागरांतून तरून जाण्यास सद्गुरूच्या कृपानौकेवांचून अन्य साधन नाहीं. अंधारांत चांचपडत चालणाऱ्या मनुष्यास जसा दीप किंवा समुद्रांतून चालणाऱ्या नौकेस मार्गदर्शक दीपस्तंभ तसा सद्गुरु हा संसाररूप निबिडतमांत मार्ग दाखविणारा सूर्यच होय. व्यावहारिक दीप हा फक्त जडांधकाराचाच नाश करितो. पण सद्गुरुदीपक हा अज्ञान तिमिराचा नाश करून ज्ञानमय अशा प्रकाशमान्

भूमीवर नेऊन पोंचवितो. या जगमान्य तत्वाला अनुसरून आपणासही हा भवसमुद्र निर्धास्त उल्लंघन करण्यास कोणी तरी गुरु असावा अशा भावनेनें प्रेरित होऊन श्रीमोरया गोसावी यांना गुरु प्राप्तीची सारखी तळमळ लागून राहिली.

२ शिष्याची अशी तयारी झाल्यावर मग सद्गुरु कांहीं लांब नाहींत, पिकलेल्या फळास भक्षण करण्याकरितां जसे पक्षी तयार असतात तसेच अनुग्रह पात्र सच्छिष्यास उपदेश करण्याकरितां सद्गुरु जणुं काय एका पायावर उभेच असतात. श्रीमोरयांची अशी स्थिति पाहतांच एके दिवशीं अकस्मात् श्रीयोगिराजसिद्ध नामक सद्गुरूंनीं त्यांस आपल्या दर्शनाचा लाभ दिला. श्रीमोरयांनीं ती दिव्य मूर्ती प्रगट झालेली पाहतांच त्यांचे पदीं तत्काळ वंदन केलें, आणि अतिदीन वदनानें योगिराजांचे चरणीं आपला मनोदय निवेदन केला.

३ योगिराजांनीं श्रीमोरयाचें तें मृदु भाषण, मर्यादशीलपणा ब्रह्मज्ञानसंपादन करण्याची उत्कट इच्छा व दृढनिश्चय हीं पाहून हा सच्छिष्य अनुग्रहपात्र आहे असें जाणिलें आणि हा आपल्या कसोटीस पूर्णपणें उतरेल असें समजून कृपेनें त्याचे मस्तकीं वरदहस्त ठेविला. नंतर ध्यानधारणादि योगसाधनविधि सांगून मंत्रोपदेश केला. तो श्रीमोरयांनीं एकाग्रचित्तानें ग्रहण करितांच त्याचा देहभाव गलित होऊन तेथेंच त्यांची समाधी लागली, आणि ' सर्वं ब्रह्ममयं जगत् ' अशी तदाकार

वृत्ति झाली. नंतर योगिराजांनीं त्यांस व्युत्थानावर आणिलें व 'तूं आतां यापुढें थेउरास जाऊन अनुष्ठान कर' अशी आज्ञा केली. ती मोरयांनीं शिरसावंद्य करून मला या गुरुचरणाचा लाभ निरंतर होत जावा ह्मणून प्रार्थना केली. त्यावर मी तुला पुन्हा चिंचवड येथें याच वेषानें दर्शन देईन असें सद्गुरूंनीं त्यांस आश्वासन दिलें व आपण अंतर्धान पावले.

४ हा सर्व वृत्तांत श्रीमोरयांनीं घरीं आल्यावर आपल्या वडिलांस व मातोश्रीस अत्यानंदानें निवेदन केला. आणि मला गुर्वाज्ञेनें तपश्चर्या करण्याकरितां थेऊर येथें जाणें आहे तरी आपली आज्ञा असावी ह्मणून त्यांचे चरणीं विनंति केली. ती ऐकतांच त्या उभयतांस अत्यंत गहिंवर दाटला. त्यांच्या मुखावाटे एक शब्दही निघेना, मोहातिरेकानें ते अगदीं वेडे होऊन गेले. अशी मातापित्यांची झालेली अवस्थापाहून श्रीमोरयांसही अत्यंत प्रेम दाटलें तथापि विवेक करून त्यांनीं त्यांचें समाधान केलें, व क्षेत्रस्थ परिचित मंडळीस त्यांचें यथायोग्य संगोपन करण्याविषयीं नम्रतापूर्वक सांगून अनुष्ठानास जाण्याविषयीं आज्ञा मिळविली. नंतर सुमुहूर्त पाहून थेउरास प्रयाण केलें. वाटेनें जातांना जे चमत्कार झाले त्यांचे वर्णन पुढें चमत्कारप्रकरणीं वाचकांस कळून येईल, थोडक्याच दिवसांनीं ते थेऊर येथें येऊन पोंचले. गांवांत आल्यावर त्यांनीं आपला तपश्चर्याकरण्याचा हेतु ग्रामस्थांस निवेदन केला. आणि याच

क्षेत्रीं तूं तपश्चर्या कर अशी मला गुरूंनीं आज्ञा केली तेव्हां असा या क्षेत्राचा काय महिमा आहे तोही मला कथन करावा. मी ऐकण्यास फार उत्सुक झालों आहें ह्मणून त्यांची अत्याग्रह-पूर्वक विनंति केली त्यावरून ते ह्मणाले:— महाराज !

९ या क्षेत्रास स्थावरक्षेत्र किंवा थेऊर असें ह्मणतात याचें साग्र वर्णन मुद्गलपुराण खंड ८ व गणेश पुराणांत आहे. तें सर्व करण्यास आमची बुद्धि समर्थ नाहीं. याक्षेत्राचा स्वामी श्रीचिंतामणि आहे. जगांतील अनंत तीर्थें अंशमात्रानें या क्षेत्रीं वास करितात. योगी, मुनि सुरासुर इ० ची येथें निरंतर वस्ति आहे या परम पवित्रक्षेत्रांत अनुष्ठान केलें तर प्रत्यक्ष गजानन प्रसन्न होतात. इतर क्षेत्रीं एक हजार वर्षें अनुष्ठान केल्याचें पुण्य येथें एकच दिवसाच्या अनुष्ठानानें लाभतें. फारतर काय अश्वमेधाचें पुण्यही येथें प्राप्त होतें. या गणेशतीर्थाच्या दर्शनानें सद्गति मिळते. स्पर्शानें सायुज्यता लाधते. हें गणेश पादोदक ग्रहण केलें तर सर्वपातकांचा तत्काळ क्षय होतो. स्वानंद प्राप्ति मिळते. पुनर्जन्म येत नाहीं येथेंच शिवानें तप करून सिद्धि मिळविली त्यावरून तो सिद्धेश्वर नांव पावला तें स्थान हें पहा. गाणपत्त्यांस हें क्षेत्र प्रयागासमान आहे ही मातृगया आहे. मोरगांव पितृगया आहे. या गणेशकुंडावर पिंडश्राद्ध केलें तर प्राणि मातृऋणांतून मुक्त होतो. असा या क्षेत्राचा

महिमा आहे. महाराज आपल्या मनोदयानुरूप आपण तपश्चर्या करावी तुमची मनकामना निःसंशय पूर्ण होईल. हें ऐकून त्यांनीं तेथेंच तप करण्याचें ठरविलें.

प्रकरण पांचवें.

५ तपश्चर्या.

" चणे खावे लोखंडाचे । मग ब्रह्मपदीं नाचे"

(श्रीतुकाराम)

१ ऐहिक किंवा पारमार्थिक कोणतें ही सुख संपादन करावयाचें असल्यास तप हेंच मुख्यसाधन आहे मनुष्यप्राणि सुखाची इच्छा नित्य करीत असतो. परंतु त्याचें आचारण दुःख प्राप्त होईल इकडेसच गेलेलें असतें. त्यामुळें इष्टसुखप्राप्ति तर होत नाहींच परंतु उलट दुःखमात्र अनुभवातें लागतें. अल्पायासानें किंबहुना मुळींच कांहीं श्रम न करितां सिद्धि मिळावी ही कल्पना अगदीं घातुक अतएव त्याज्य आहे. लोखंडाचे चणे खावेत तेव्हां कोठें ब्रह्मपद मिळतें. हें भगवद्भक्त साधु तुकारामाचें ह्मणणें कांहीं संशयात्मक नाहीं. मनुष्य प्राणि अहेतुकसुखाची आशा धरून कांहीं प्रयत्न करीत नाहीं. आणि मग सिद्धि प्राप्त झाली नाहीं, ह्मणजे तो थोडासा निरीश्वरवादी बनतो. परंतु तसा प्रकार साधूचेंठिकाणीं नसतो. त्यांस अनेक दुःखें जरी भोगावीं लागलीं तरी ते

कर्तव्यपराङ्मुख होत नाहींत; उलट नेटानें संकटास टक्कर देऊन इष्टकार्य संपादन करितात. "न निश्चितार्थाद्विरमन्ति धीराः" या तत्वानुरूप श्रीमोरयांनीं जें घोर तप केलें त्याचें स्वादुफल त्यांच्या सातपिढ्यांपर्यंतच्या वंशजांना अनुभवण्यास सांपडलें. असो. मागें सांगितलेल्या स्थावर क्षेत्रीं श्रीमोरयांनीं आपली तपश्चर्येची जागा नीट स्वच्छ करून घेतली व तेथेंच ते स्थिर आसनकरून राहिले. त्यांची शरीरप्रकृति उत्तम असल्यामुळें त्यानां अनुष्ठानाचें कडकडीत व्रत पाळण्यास कालाचा किंवा स्थलाचा प्रतिबंध कधींहि झाला नाहीं. थंडी वाऱ्याची भीति त्यांस कशी ती नव्हती क्षुधाशमनार्थ काय करावें याची त्यांनीं कधींहि चिंता केली नाहीं. श्रीमोरेश्वरावर दृढ विश्वास ठेवून तपास आरंभ केला. तोंच त्यांची समाधि लागली ह्या स्थितींत त्यांचें बाह्यस्फुरण नाहींसें होऊन देहींच विदेहीपणा त्यांस भोगावयास सांपडला बेचाळीस दिवस अन्नोदक विरहित समाधी लागलेली पाहून श्रीचिंतामणि परम संतुष्ट झाले. व त्यांनीं त्यांस समाधियोगांतून जागृत केलें. आणि ह्मणाले "बा मोरया तूं या पुढें असलें घोरतर तप करूं नकोस. ह्याच तपाच्या फलप्राप्त्यर्थ मी स्वेच्छेनें तुझे उदरीं जन्म घेतों. तूं आतां क्लेश भोगूं नकोस" व "प्रजा तंतु मा व्यवच्छेत्सीः" ह्या वेदानुज्ञेप्रमाणें गृहस्थाश्रमी हो आणि सर्वां-

भूतीं भगवद्भाव ठेवून स्वधर्म आणि भूतदया यांचा उत्तम परि-
पोषकर हें परमेश्वराचे निघालेले उद्गार मोरयांनीं श्रवण करून
श्रीचरणीं सखेदानंदानें विनंति केली कीं हे देवाधिदेवा मला
आपण संसारांत घालता, परंतु तेणेंकरून मला आपल्या पाया-
चा अंतर पडेल व मी मायामोहपाशांत गुरफटून जाईन तेव्हां
मला ह्या संसारसंकटांतपडण्याची आज्ञा होऊं नये. आणि
जर संसारांत घालणेंच असेल तर जन्मकाळीं आपण कोणतें
चिन्ह धारण करून प्रकट व्हाल याची मला खूण पटावी.
त्यावर प्रभु मोरेश्वर ह्मणाले "तुला प्रपंचापासून बाधा मुळींच
होणार नाहीं व तुला परमार्थ साधण्याकरितां संसाराचा त्याग
करण्याची किंवा पंचाग्निसाधनासारखीं साधनें करून अरण्यां-
त बसण्याची मुळींच अवश्यकता नाहीं. प्रपंचांत राहून पूज्य
मातापितरें व निराधार कलत्रपुत्र यांचें संगोपन करूनहि मा-
झी प्राप्ति करून घेतां येतें. मी जन्म घेतेवेळीं खेचरी मुद्रा
धारण करीन व माझे हृदयावर पंजाप्रमाणें शिंदुराचा पट्टा
उमटेल. तूं आतां मोरगांवीं परत गमन कर आणि तेथें यथा-
काळीं जो तुला प्रसाद मिळेल तो माझ्या स्वरूपाचाच आहे
असें समज,"

२ प्रभुमुखांतून स्रवणाऱ्या मधुर उपदेशामृताचे घुटके कर्ण
रंध्रांनीं घटाघट घेत असतां श्रीमोरयांच्या पोटांत अत्यानंदा-

च्या उकळ्या फुटल्या व आज माझे हातीं परब्रह्म मंगलमय श्रीचिंतामणिच्या जननभांडाराच्या किल्याच सांपडल्या असें त्यास वाटून परमानंद झाला.

३ श्रीमोरयांनीं तपाची सांगता करून ईशाज्ञेप्रमाणें पुन्हा मोरगांवीं जाण्याची तयारी केली व थेऊरकर ग्रामस्थांचा सप्रेम निरोप घेऊन ते परत मोरगांवीं येऊन पोंचले.

प्रकरण सहावें.

६ मातृपितृनिधन.

" मरणं प्रकृतिः शरीरिणाम् ॥ विकृतिर्जीवितमुच्यते बुधैः "

(रघुवंश)

१ नरदेहाच्या अशाश्वतते बद्दल जी शिरोलिखित उक्ति आहे तिचें वैय्यर्थ कोण करूं शकणार आहे? या जगांत जन्मास येणें आणि पुनश्च मरणें हें चक्र नेहमीं चालूच आहे. श्रीमद्भगवद्गीतेंतही देहाच्या नश्वरतेविषयीं भगवंतांनीं ह्मटलें आहे.

" जातस्या हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च "

हें चक्रपरिवर्तन नेहमीं चालूच आहे ह्या गोष्टीकडे साधुसंतांनीं विशेष लक्ष पुरवून आपला आयुष्य क्रमही तसाच रेखाटलेला असतो. एका कवीनें एका ठिकाणीं ह्मटलें आहेः—

सजातो येन जातेन । याति वंशः समुन्नतिम् ॥
परिवर्तिनि संसारे । मृतः को वा न जायते ॥"

ह्या उक्तीप्रमाणें तोच नर जन्मास आला कीं ज्यानें आपला वंश उन्नतीच्या शिखरास नेऊन पोंचविला. नाहीं तर चक्रा सारख्या फिरणाऱ्या या संसारांत कोण जन्मास येत नाहीं? व कोण बरें मरत नाहीं? या गोष्टीची यथार्थता सिद्धकरण्यास खरोखर श्रीमोरयांचे वडील वामन भटजी हे कसे कारणीभूत झाले हें चतुर वाचकांच्या सहजी लक्षांत येणार आहे.

२वामन भटजींनीं सर्व तीर्थयात्रावगैरे यथासांग केल्या आणि राउळांत जाऊन श्रीमंगलमूर्तीचरणीं विनंति करून शेवटचा निरोप मागितला कीं, हे प्रभो! हा माझा देह आतां येथेंच तुझ्या चरणीं पडावा. सती पार्वती बाईनेंही आपल्या पतीनीं श्रीचरणीं केलेली विनंति ऐकून सतीधर्माप्रमाणें वामनभटजींचीं आज्ञा घेऊन श्रीचरणीं देह आधींच अर्पण केला. पत्नीच्या निधनानंतर वामन भटजीस आपला काळ लौकर व्हावा असें वाटूं लागलें व ते पूर्वीपेक्षां अधिकच वैराग्यशील बनले. त्यांचें सर्व तन मन धन श्रीमोरेश्वर चरणीं लागून राहिलें. पुढें सुमारें चार महिन्यांनीं वामन भटजी नित्याप्रमाणें देवळांतून श्रीची पूजा अर्चा करून आले व कऱ्हेच्या तीरीं जाऊन गणेश तीर्थाजवळ बसले. आणि श्रीमोरयास प्रेमपूर्वक जवळ घेऊन अत्यंत कळकळीनें उपदेश केला कीं, तूं पूर्णब्रह्म मोरेश्वर चरणीं सदोदित तत्पर रहा येवढेंच आतां तुला माझें सांगणें आहे.

तूं सूज्ञच आहेस" असें ह्मणून श्रीमोरेश्वराचें नामस्मरण करीत करीत देहविसर्जन केला. व इहलोकची आपली यात्रा संपविली. शके १३३२. त्यावेळीं त्यांचें वय सुमारें १३० वर्षांचें होतें असें एका हस्तलिखित पत्रावरून समजतें. जुन्या बखरींतून त्यांचें वय सुमारें १२५ वर्षांचें असावें असें आढळतें. असो.

३ मातापितरांचें वियोगजन्य दुःख श्रीमोरयास कांहीं काळपर्यंत वाटलें. तथापि त्यांच्या दैवीसंपत्तीमुळें त्यांजवर प्रापंचिक लोकांप्रमाणें दुःखाचा पगडा बसला नाहीं. जनरूढीप्रमाणें वडिलांचें और्ध्वदेहिक कृत्य दानधर्म वगैरे यथासांग करून श्रीमोरयांनीं आपला पूर्वक्रम सुरू केला. श्रीमोरयांनीं गोप्रदान वगैरे केल्याचें दर्शक चित्र मोरगांवीं गणेशकुंडासमीप देवळाच्या दगडावर खोदलेलें आढळतें.

प्रकरण सातवें.

७ गृहस्थाश्रम.

" सतुंष्टो भार्यया भर्ता भर्त्रा भार्या तथैवच ।
यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ॥

(मनुस्मृति)

१ आश्रम चतुष्टयांपैकीं कोत्याही आश्रमांत जीवन्मुक्त होण्यास प्रतिबंध नाहीं, तथापि गृहस्थाश्रमाचा महिमा फार

श्रेष्ठ आहे, किंबहुना इतर तिन्ही आश्रम गृहस्थाश्रमावरच अवलंबून आहेत. याच आश्रमांत कामक्रोधादिक शत्रु जिंकण्याचे वारंवार प्रसंग येतात. तसे इतरत्र येत नाहींत. गृहस्थाश्रमांतच जर शमदमादि देवता षडरिपूंचा नायनाट करितील तर ती गोष्ट विशेषच प्रशंसनीय होय. यथाशक्ति आर्तदुःखविमोचन अज्ञजनास सन्मार्गदर्शन यांतच खरा पुरुषार्थ आहे.

" नाहीं परोपकारापरि दुसरें थोर पुण्य हें वचन "

परोपकारासारखें खरोखर दुसरें मोठें पुण्य या जगांत लाधत नाहीं. तेव्हां अशा ह्या गृहस्थाश्रमांतच ह्या वरील गोष्टींचा अनुभव घ्यावयास सांपडतो. असें असूनहि श्रीमोरयांनीं केवळ परमार्थिक बुद्धीनें त्याचा अव्हेरच केला होता परंतु केवळ परमेश्वरी अनुज्ञा ह्मणूनच तो त्यांना पुढें पतकरणें भाग पडलें.

२ श्रीमोरयांचीं वृद्ध मातापितरें निवर्तल्यावर त्यांस एकांत वास करावा अशी इच्छा झाली ह्मणून त्यांनीं राउळांत जाऊन श्रीमोरेश्वराची आज्ञा मागितली; त्यावरून श्रींनीं दृष्टांत दिलाकीं तूं "आतां पवनातीरीं चिंचवडास जाऊन वास्तव्य-कर मी नित्य तुझे जवळच आहें मात्र प्रतिमासीं चतुर्थीस एकवेळ माझे वारीस चिंचवडाहून येथें—मोरगांवास—येत जा व तुला थेऊर येथें झालेल्या दृष्टांताची स्मृति ठेवून वर्तन कर" श्रीमोरयांनीं ही प्रभुची आज्ञा शिरसावंद्य करून श्रींची

मनोभावें पूजा केली व स्तवन करून मोठ्या सद्गदीत अंतःकरणानें श्रींचा निरोप घेऊन मोरगांव सोडिलें. व फिरत फिरत लवकरच प्रथम चिंचवडानजीक ताथवडे गांवीं एकांतस्थान पाहून राहिले. (त्यांनीं तेथें केलेले चमत्कार पुढें वर्णिले आहेत) तथापि तेथेंही त्यांस जनतेचा उपसर्ग फार लागू लागला. शेवटीं त्यांनीं कंटाळून पवित्र पवनातटाकीं चिंचवड येथें रमणीय स्थल पाहून आपला कायमचा वास केला नंतर तेथून त्यांनीं जवळच असलेल्या श्रीकिवजाई देवीच्या जंगलांत जाऊन तपश्चर्या करावी. असा त्यांचा नित्यक्रम चालला असतां एके दिवशीं श्रींचिंतामणीच्या दृष्टांतानें प्रेरित होऊन राईत पुनवळें येथील काश्यप गोत्री गोविंदराव कुलकर्णी या नांवाचा एक ब्राह्मण चिंचवड येथें श्रीमोरयागोसावी यांजकडे प्राप्त झाला. व त्यांस ह्मणाला कीं महाराज माझी उपवर मुलगी आपणास अर्पण करावी अशी श्रींचिंतामणीची मला आज्ञा झाल्यावरून मी आपणाकडे आलों आहें व माझीही इच्छा तशीच आहे. करितां आपण तिचें पाणिग्रहण करावें' अशी विनंति केली. त्यावर श्रीमोरयांनीं उत्तर दिलें कीं, आह्मां वैराग्यशील माणसांना मुलगी देऊन काय उपयोग आहे ? जरी ईश्वरसंकेतानें आह्मीं तुझ्या मुलीचा अंगीकार केला तथापि आमची नैराश्यता ही कायमच राह-

णार. त्यांतूनही आमचे वयास सुमारें शहाण्णव वर्षें झालीं आ- हेत. आमची गृहस्थिति अत्यंत गरिबीची आहे. तेव्हां अशा दुःस्थितींत तूं आपली मुलगी लोटावीस असें मला वाटत नाहीं. इतक्यावर तुझी मर्जी. असें भाषण ऐकून गोविंदराव ह्मणाला महाराज आपल्यासारखा तपोनिष्ठ जामात मला कोठें मिळावयाचा आहे ? मला आपल्या संपत्तीची बिलकूल अपेक्षा नाहीं ज्याला प्रत्यक्ष श्रीमंगलमूर्ती व ऋद्धिसिद्धि प्रसन्न होऊन अनुकूल झाल्या आहेत त्यांना कोणत्यागोष्टी- ची वाण पडणार ? तुह्मी माझ्या विनंतीस मान दिलाच पाहि- जे. हें त्यांचें भक्तिपुरस्सर भाषण श्रीमोरयांनीं श्रवण करून व श्रीचिंतामणींची पूर्वदत्त आज्ञा ध्यानांत आणून ते त्यांच्या ह्मणण्या प्रमाणें विवाह करण्यास सिद्ध झाले. नंतर गोविंद- राव मोठ्या प्रसन्न अंतःकरणानें आपले घरीं गेले. आणि घडलेला सर्व वृत्तांत त्यांनीं आपल्या पत्नीस कळवि- ला- हा जुळून आलेला योग तिला फारच पसंत पडला. आणि त्या उभयतांनीं यथाशक्ति सालंकृत कन्यादान करू- न देण्याचा निश्चय ठरविला गोविंदरावानें चिंचवड येथें येऊ- न ग्रामस्थांच्या मदतीनें शुभ मुहूर्तावर लग्नसमारंभ पार पाड- ला ज्या विवाहास प्रत्यक्ष विघ्नहराची अनुकूलता त्याला कोठें कमीपणा यावयाचा आहे ? सर्व समारंभ श्रीमोरया

गोसाव्यांच्या बाजूनें श्रीमंगलमूर्ती व ऋद्धिसिद्धि यांनीं सपरिवार येऊन साजिरा केला सर्व धार्मिकविधि व सर्व लौकिक विधि.यथास्थित झाले. मुलीचें नांव उमा (सरस्वती) असें ठेविलें. या लग्न समारंभास पंचक्रोशींतील निमंत्रित अनिमंत्रित मंडळींचा समुदाय पुष्कळच जमला होता. त्यांचा यथोचित आदरसत्कार व भोजनविधि हे सुव्यवस्थित झाले. गोंविंदरावास तपस्वी जामात मिळाला ह्मणून लोक त्याचे धान्यवाद गाऊं लागले. चार दिवस यथासांग लग्नसोहळा उरकल्यावर श्वशुर जामातांच्या प्रेमभेटी झाल्या नंतर गोविंदराव आणि इतर जन समुदाय आनंदानें आपापल्या घरीं परत गेला. आणि श्रीमोरयागोसावी आपल्या पत्नीसह आनंदानें कालक्रमणा करूं लागले.—

यावेळीं केलेला चमत्कार पुढें वर्णिला आहे—

२ गृहस्थाश्रमाचा स्वीकार केल्यापासून श्रीमोरयांचा नित्यक्रम असा असेः—त्यांनीं ब्राह्ममुहूर्तीं उठून प्रातः स्मरण व सद्गुरुचिंतन करावें. नंतर शौचमुखमार्जनादि विधि उरकून सूर्योदयापूर्वीं पवनेवर स्नानास जावें, तेथें संध्या ब्रह्मयज्ञादि विधि सारून मग घरीं येऊन पूजा अर्चा करावी नंतर ध्यान. धारणादि विधि उरकावा अतीत अभ्यागत आल्यास त्यांचा यथायोग्य आदर सत्कार करून महानैवेद्य करावा व त्यासह

भोजन करावें. भोजनोत्तर सद्ग्रंथ श्रवण व पठण करावे. रात्रौ पूजा अर्चा धूपार्ती करून श्रीमंगलमूर्तीचें एकाग्रमनानें भजन करावें. ह्या प्रमाणें ह्या सत्पुरुषाचा वर्तनक्रम असे.

श्रीमोरयांच्या प्रपंचाला भार्या ही फार उत्तम मिळाली. वय लहान असूनही तिनें सर्व प्रपंच उत्तम आवरला. ती सत्कुलोत्पन्न असून मोठी दयाशील, शांतस्वभावाची, व सर्व प्रकारें अनुकूल अशी होती. परोपकार करण्यांत व आबालवृद्धांसी प्रेमानें वागण्यांत ती मोरयांच्या पेक्षां. कांकण भर जास्तच असे. मी व माझा संसार असा भाव त्यांचे मनास कधीं शिवला नाहीं. सर्व संसार श्रीमंगलमूर्तीचा तेव्हां त्याचा तोच चालवून घेतो अशा निरहंकारपणानें उभयतां वागत असत.

३ कांहीं काळ लोटल्यावर श्रीमोरयांची पत्नी उमाबाई ही गर्भवती झाली. नवमास पूर्ण होतांच शके १४०३ विकृती नाम संवत्सरे मिति माघ वद्य ४ रोजीं चंद्रदर्शनीं ती पुत्ररत्न प्रसवली. या वेळेस श्रीमोरया हे स्थावरक्षेत्रीं श्रींच्या वारीस गेलेले होते. तेथें चिंतामणीची पूजा करीत देवालयांत बसले असतां गुंगीत दृष्टांत झाला कीं मी चिंचवड येथें तुझे घरीं जन्मास आलों आहें. तूं जाऊन–पाहा. नंतर श्रीमोरयागोसावी अत्यानंदानें तातडी

करून चिंचवडास आले तोंच त्यांस उमाबाई प्रसूत होऊन मुलगा झाल्याचें आनंदकारक वृत्त समजलें. मग पुत्र-मुखावलोकन करण्याचे हेतूनें श्रीमोरया सूतिकागृहांत गेले. व पाहतात तों पूर्वी सांगितलेल्या सर्व खुणा व आपण थेऊर येथें केलेली महापूजा मुलाच्या आंगावर उमटलेली दिसली. मग श्रीमोरयांच्या त्या वेळेच्या आनंदास काय पारावार आहे ? त्यांनीं माझ्या आभाग्यांच्या घरीं प्रत्यक्ष पुत्ररूप कामधेनूच प्राप्त झाली असें मानून त्यांस परम समाधान वाटलें. बारावे दिवशीं जातकरण नामकरण विधि होऊन मुलाचें नांव " चिंतामणि" हेंच ठेविलें.

४ चिंतामणि शुक्लेंदुप्रमाणें जस जसा वाढत गेला तस तसा तो आपल्या मातापितरांस व इतर जनांस ही अत्यंत सुखावह वाटूं लागला. त्याची वृत्ती बाळपणापासूनच आपल्या वडिलां प्रमाणें ईश्वरचरणाकडे वळलेली होती. व तदनुरूप त्याच्या बाळपणच्या सर्व क्रीडा ही होत्या. त्याच्या वयाच्या सातव्या वर्षी श्रीमोरयागोसाव्यांनीं त्याचा व्रतबंध संस्कार यथाविधि केला. आणि मुलाचा पूर्ण अधिकार पाहून त्यांनीं त्याचे मस्तकीं वरदहस्त ठेवून त्यास अनुग्रहपूर्वक शिक्षण दिलें. चिंतामणि पुत्र धर्मास अनुरूप अशीच आपल्या मातापित्यांची सेवाचाकरी करीत असे. श्रीमोरयांनीं यथाकालीं

त्याचा विवाह केला त्याला दोन कांता होत्या त्याही महान् पतिव्रता सुशील अशा मिळाल्या होत्या. श्रीमोरयांना असा पुत्र लाधलेला पाहून फार धन्यता वाटे त्यांनीं आपलें सर्व लक्ष ईश्वरचरणीं लावून आपला नित्य नेमधर्म मोरगांवचीवारी करणें वगैरे सर्वक्रम यथास्थित व नेटानें चालविला होता. वारीस जात असतां मोरयांनीं जे कित्येक दैवी चमत्कार करून जगाच्या अनुभवास आणिले ते पुढें एकसमुच्चयेंकरून कथन केले आहेत.

प्रकरण आठवें.

८ प्रसादप्राप्ति.

" प्रसादे सर्वदुःखानां हानिरस्योपजायते "

(श्रीमद्भगवद्गीता)

१ या जगांत ईश्वरी प्रसाद ही एक अत्यंत दुर्मिळ गोष्ट आहे. आणि ती मिळाल्यावांचून कोणत्याही कामांत यश येणें फारच दुर्घट आहे ईश्वरीप्रसादानें असाध्य तें साध्य व असंभवनीय तें संभवनीय होतें, मनुष्यकृत प्रयत्नाला फळसिद्धि प्राप्त होणें हें सर्वस्वी ईश्वरी प्रसादावर अवलंबून आहे. श्रीमोरयांच्या तपाला जें येवढें यश मिळालें त्याचें कारण त्यांना

प्राप्त झालेला श्रीमोरेश्वरांचा कृपाप्रसाद हेंच होय. असो. मागीलभागांत सांगितल्याप्रमाणें श्रीमोरयांचा क्रम सुरू असतांच एकेदिवशीं चतुर्थीस ते मोरगांवीं वारीस गेले. (वाटेनें जातांना व तेथें गेल्यावर जे चमत्कार झाले ते चमत्कार प्रकरणांत नमूद केले आहेत.) श्रीमोरेश्वराचें मनःपूर्वक ध्यान करीत असतां श्रींची ऋद्धिबुद्धिसहीत तेजोमय स्वारी मोरयांच्या पुढें एकदम येऊन अवतीर्ण झाली. श्रीमोरयांनीं नेत्र उघडून त्यांचें दर्शन घेतांच सर्वांगीं आपादकंचुकित रोमांच उभे राहिले, व डोळ्यांतून आनंदाश्रूंचा पूर लोटला श्रीमंगलमूर्तींनीं आपल्या प्रिय भक्तास उठवून सांगितलें कीं "तुझी वारी आतां मला पावली यापुढें तूं माझ्या वारीस येऊं नकोस. तुझा वृद्धापकाल झाल्यानें तुझे फार हाल होतात ते माझ्यानें बघवत नाहींत आतां मीच तुझे घरीं येऊन राहतों, उदईक सकाळीं गणेशकुंडांत स्नान करीत असतां तुला जो प्रसाद प्राप्त होईल तो माझेस्वरूपाचाच आहे त्यास घेऊन मागें न पाहतां तूं चिंचवडास जा" असें ह्मणून श्रींची स्वारी अंतर्धान पावली. शके १४१४ सालीं श्रीमोरयागोसावी एकेदिवशीं सकाळीं नित्याप्रमाणें कऱ्हानदीवर गणेशकुंडांत स्नानास उतरले. व बुडीमारून वर येतात तोंच त्यांच्या ओंजळींत श्रीमंगलमूर्तींचा तांदळा आला त्यावेळीं आकाशांतून पुष्पवर्षाव

झाला नदीचे पलीकडे शमीवृक्षावर देव मोरेश्वराच्या नामाचा गजर करीत होते. जवळच पुष्पें, शमी, दूर्वा, नैवेद्याचें सामान असें साहित्य पडलें होतें. हा चमत्कार श्रीमोरयांनीं पाहून नदीवर जमलेल्या ग्रामस्थांसही तो दाखविला. उदईक श्रीमोरयास प्रसाद प्राप्त होणार हें वृत्त आगाऊच सर्वत्र पसरलें असल्यानें पुष्कळ लोकांचा समुदाय तेथें जमला होता अकबर बादशाच्या बापाचा सरदार अल्लाउद्दीन हाही हें वृत्त ऐकून सुप्याहून मोरगांवास आला; श्रीमंगलमूर्तींच्या दर्शनाकरितां देव प्राप्त झाले आहेत, हें जाणून मोरयागोसावी त्यांचे संनिध गेले. व मिळविलेल्या सर्वशाखांची एकत्र भाजी व कणकेची पोळी करून त्यांनीं शमीखालीं देवास भोजन समर्पण केलें. व अवशिष्ट नैवेद्य सर्वलोकांस वाटिला उच्छिष्ट रजःकण पडले होते ते देवतांनीं पक्ष्यांच्या रूपानें येऊन भक्षण केले. हें पाहून श्रीमोरया ह्मणाले माझ्या वंशजांनीं याच ठिकाणीं जीवमात्रास अन्नसंतर्पण करावें. व ब्राह्मणापासून अंत्यजापर्यंत प्रसाद द्यावा ह्या ठिकाणास हल्लीं पोळी असें ह्मणतात व सर्वशाखांचा प्रसाद जो तेव्हांपासून चालू झाला तो अद्यापही चालू आहे. येथें अंत्यजांनीं उच्छिष्टास जरी स्पर्श केला तरी दोष धरीत नाहींत अशी वहिवाट अद्यापही आहे. श्रीमोरयांनीं नदीवरून त्या मंगलमूर्तीरूप तांदळ्यास मोठ्या भक्तीनें व

थाटामाटानें श्रींच्या देवालयांत आणून ठेविलें. व त्याची मोरेश्वरासह पूजा केली. नंतर त्यांनीं पाषाणही द्रवून जाईल. इतक्या कळवळ्यानें देवास आळविलें. त्यावेळीं देवाच्यागळ्यांतील पुष्पमाळा मोरयांच्या कंठांत एकदम येऊन पडली तोच शेवटचा महाप्रसाद जाणून श्रीमोरया तांदळयासह देवालया बाहेर चिंचवडास जाण्याच्या उद्देशानें निघाले त्यांच्या मागें प्रभुही निघाले सातपावलें पुढें चालून गेले नाहींत तोंच त्यांनीं देव खरोखरच आपलेबरोबर येत आहे काय ह्मणून मागें वळून पाहिलें. तेव्हां श्रीमंगळमूर्ती ह्मणाले तूं जर मागें पाहिलें नसतेंस तर मी "यावच्चंद्रदिवाकरौ" तुझे वंशांत अखंड अवतीर्ण झालों असतों. आतां सातपिढ्यांपर्यंत माझासाक्षात्कार तुझे वंशजांस होईल. मोरयानीं भवितव्य जाणून समाधान मानिलें व पुढें चालले. त्यांचेबरोबर त्यावेळचे चिमणजोसी, अप्पाभट जुन्नरकर, गुरनेरकर, अमळनेरकर, देशपांडे वगैरे ठोकळ मंडळी आली. चिंचवडानजीक येतांच चिंचवडकरांनीं मोठ्याच थाटामाटानें श्रीमोरयांस सामोरे जाऊन गांवांत मिरवीत आणिलें. व यथाशक्ति समारंभ केला.

२ प्रसादमूर्ती चिंचवडास आणिल्यावर श्रीमोरयांनीं तिची स्थापना केली व आपण तिच्या भजनपूजनांत दंग झाले. यानंतर ते मोरगांवीं वारीस गेले नाहींत. फक्त भाद्रपदमासीं व माघमासीं यात्रेस जाण्याचा प्रघात श्रीच्या आज्ञेप्रमाणें सुरू

केला तो अद्यापही आहे. यावेळीं श्रीचा तांदळा बरोबर नेण्याची वहिवाट आहे.

३ श्रीमोरयांनीं गृहस्थाश्रमाचा या रीतीनें अनुपम सुख लाभ घेऊन ऐहिक कर्तव्याची मर्यादा संकुचितकेली. आणि पुढें आपला काळ त्यांनीं केवळ ईश्वरभजनांत आणि ब्रह्मानंदांत घालविला. खरोखर अशा सत्पुरुषाच्या सदुपदेशानें आणि त्यांच्या चरित्रमननानें मनुष्य प्राण्याचें कल्याणच होईल यांत संशय नाहीं सत्पुरुषमालिकेंत अशारीतीनें गृहस्थाश्रमाचा लाभ संपादन झालेला अन्यत्र क्वचितच दृष्टीस पडेल असो. या नंतर त्यांनीं आपला काल जगापासून अलिप्त राहण्याकडे कसा लावला याचें वर्णन पुढील भागांत येईल

प्रकरण ९ वें.

१ समाधियोग.

" असो ऐसे सकळही गेले । परंतु एकचि राहिले ॥
जे स्वरूपाकार झाले । आत्मज्ञानी ॥ ५९ ॥

(श्रीरामदास.)

१ या जगांत जननमरण विरहित स्थिति प्राप्त करून घेणें हेंच संसाराचें मुख्य सार आहे. मनुष्य प्राणी बाह्य सृष्टीला पाहून

भुलून जातो. परंतु अंतःसृष्टीचा ज्ञानदीप त्याच्या नजरेपुढें येत नाहीं. ह्याचें कारण उघड आहे कीं, मनुष्यप्राणि हा जात्या उत्सवप्रिय असल्यानें त्याचा ओढा जन्मास येऊन जगांतील अनंत सुखें भोगावीं ह्याकडेसच विशेष असतो. परंतु सारभूत जें तत्व त्याकडे दुर्लक्ष असल्यामुळें "पुनरपि जननं पुनरपि मरणं" ह्याप्रकारें श्रीमच्छंकराचार्यांनीं वर्णिल्याप्रमाणें त्याची स्थिति होते. ही स्थिति घालविण्याचा एकच उत्तम उपाय ह्मटला ह्मणजे संसारांत अलिप्त राहून परमेश्वराचें नामसंकीर्तन व भजनपूजन ह्याची संवय मनास लावून घेणें हा होय. पूर्वोक्त तत्वानुरोधानें श्रीमोरयागोसावी आपला वर्तन क्रम चालवीत असतां त्यांस गुरुदर्शनाची अत्यंत उत्कंठा प्राप्त झाली. व पूर्वदृष्ट गुरूंची भेट कशी होईल अशी त्यांस मोठी चिंता पडली. हें गुरुमहाराजांनीं योगबळानें जाणून त्यांस पूर्वी सांगितल्याप्रमाणें आकस्मिक येऊन भेट दिली. श्रीमोरयांनीं गुरुपदास अत्यादरपूर्वक वंदन करून प्रेमाश्रु ढाळले.व यापुढें आपण येथेंच वास करावा अशी इच्छा दर्शविली. ती त्यांनीं मान्य करून आपलें अवशिष्ट आयुष्य त्यांचेजवळच घालविलें. नंतर थोडक्याच कालांत ते समाधिस्त झाले. (शके १४८१)

२ श्रीमोरया गोसावी यांचा महिमा फार वाढल्यामुळें त्यांस

लोकांकडून पुष्कळ उपसर्ग लागूं लागला. ह्मणून ते फार कंटा-ळले नंतर त्यांनीं श्रीमंगलमूर्तींची दर्शन देण्याविषयीं भक्ति-पुरस्सर प्रार्थना केली. श्रीमंगलमूर्तींनीं तत्काळ प्रगट होऊन श्रीमोरयांस दर्शन दिलें व तुझी काय इच्छा आहे ती निवेदन कर ह्मणून विचारिलें. श्रीमोरयांनीं या पुढें आपणांस गुप्तवास असावा व जगांत तुझें आस्तित्व असेपर्यंत मला तुझ्या चरणा-चें दास्य द्यावें असें मागणें मागितलें. श्रीनीं तें मान्य करून मी तुझे हृदयमंदिरीं अक्षय्यवास केला आहे. व तुझे इच्छेप्र-माणें सर्व गोष्टी यथास्थित होतील असा वर दिला आणि आ-पण अंतर्धान पावले.

२ श्रीमोरयांनीं तीच आज्ञा प्रमाण मानून आपल्या पुत्रास चिंतामणीस समाधी घेण्याचा आपला मनोदय कळविला व लागलीच पवना नदीचे कांठीं शुद्ध भूमी पाहून एक गुहा तयार करण्यास आज्ञा केली. चिंतामणीनें आज्ञेप्रमा-णें गुहा तयार करून ठेविली. शके १४८३ मार्गशीर्ष वद्य ६ रोजीं प्रातःकाळीं पवनानदीवर त्यांनीं स्नान संध्या आटोपून श्रीमंगलमूर्तींचें यथासांग पूजन केलें. नंतर ते गुहेंत उतरले, आसन विधि केला, नासाग्रीं दृष्टि ठेवून समाधी लाविली,

चिंतामणीनें त्यांचे पुढें दोन दीप प्रज्वलित करून ठेविले. पुढें गणेशपुराण मांडिलें. व आपल्या दोन्ही पत्न्यासह त्यांची पूजा करून साष्टांग नमस्कार केला. नंतर सर्व बाहेर आले. चिंतामणीनें सद्गदित अंतःकरणानें गुहेचें द्वार लावून घेतलें. व त्यावर शिळा टाकिली. व श्रीमोरयाचे डोक्यावरच नीट येईल अशी जागा शोधून तेथें सिद्धिबुद्धीसहित मंगलमूर्तीची स्वहस्तें स्थापना केली. शके १५८० विलंबनाम सं० देऊळ बांधिलें; आरंभ कार्तिक शु॥ १२; संपूर्ण आषाढ शु॥ ४ श्रीमोरयांनीं समाधी घेतल्याचें वृत्त लागलेंच चोहींकडे पसरलें. भाविकजनसमुदाय दर्शनाकरितां येऊं लागला. समाधीपुढें भजन, पूजन, नामसंकीर्तन सुरु झाले. ब्राह्मण भोजन झाल्यानंतर सर्वत्रांनीं " मंगलमूर्ती मोरया " ह्या नांवाचा जयघोष केला. नंतर सर्व समारंभ संपूर्ण होऊन भक्तजन आपापले घरीं परतले. याप्रमाणें श्रीमोरयागोसावी यांनीं संसारांत राहून परमार्थसाधन कसें करितां येतें याचा प्रत्यक्ष अनुभवाचा धडा जगाच्या निदर्शनास आणून दाखविला. हे त्यांचें जगावर केवढे उपकार झाले ! ! !

श्रीमंगलमूर्ति मोरया.

प्रकरण १० वें.

साधुत्व आणि दैवी अद्भुत चमत्कार.

" चमत्कृति निधानही कृति तुझी जगाच्या पते "

(कुसुमांजलि.)

१ संतांनीं केलेल्या अद्भुत चमत्काराबद्दल आधुनिक विद्वानांत बराच मतभेद असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. परंतु यौगिकशक्तींने असले चमत्कार संभवनीय असतात. हें पातंजलियोगदर्शनावर लिहिलेल्या व्यासभाष्यावरून सहज लक्षांत येईल. साधूंच्या आंगीं दैवी चमत्कार करण्याचें सामर्थ्य असणें हें त्यांच्या साधुत्वाला एकप्रकारें भूषणास्पदच ह्मटलें पाहिजे. किंबहुना साधु आणि असाधु ह्यांच्यांतील भेद स्पष्टपणें कळून येण्यास "दैवी चमत्कार" हें एक प्रकारचें उत्तम साधनच होय. असो. आतां आह्मी पुढें श्रीमोरयांनीं बालपणापासून केलेले कांहीं चमत्कार यथाक्रम देतों.

चमत्कार १ ला.

एकेदिवशीं एका शेतकऱ्यानें आपल्या खडकाळ जमिनीजवळ श्रीमोरयांस नेऊन त्यांची भक्तिपुरःसर विनवणी केली कीं, महाराज आपल्या चरणधूलीनें माझी जमीन सुपीक व्हावी. तेव्हां श्रीमोरयांनीं आपला चरणस्पर्श केला तेव्हांपासून ती फार सुपीक झाली.

चमत्कार २ रा.

श्रीमोरया आपल्या गुरूच्या आज्ञेवरून अनुष्ठानाकरितां मोरगांवाहून थेउरास जात असतां वाटेंत लागणाऱ्या आठ कोसांवरच्या एका डोंगरावर एक महान् भुजंग वस्ति करून राहत असे; असें वृत्त त्यांचे कर्णीं आलें. तो सर्प मार्गानें जाणाऱ्या येणाऱ्या प्रवाशांना दंश करून त्यांचा प्राण घेत असे. त्यामुळें कोणीही प्रवासी तिकडून जाण्यास बहुधा धजत नसत, असें असतांही श्रीमोरया त्याच वाटेनें श्रीमंगलमूर्तीचें नामस्मरण करीत चालले. सर्पानें ते जवळ आले असें पाहून एकदम फूत्कार करून त्यांचे आंगावर उडी घेतली. व त्यांच्या पायास कडकडून दंश केला. परंतु श्रीमोरया भजनरंगांत अगदीं गुंग होऊन गेल्यामुळें त्यांची वृत्ति–"ब्रह्मानंदीं लागली टाळी, कोण देहातें सांभाळी" याप्रमाणें झाली होती ह्मणून सर्पदंशाचें त्यांना भानही नव्हतें. मग विषबाधा कोठून होणार? परिसाचा स्पर्श लोहास होतांच जसें त्याचें सुवर्ण बनतें. तसें मोरयांच्या पदरजस्पर्शानें त्या भुजंगाला आपल्या पूर्वजन्मींच्या ज्ञानाची जागृति झाली. व त्यानें आपला दुष्ट देह श्रीमोरयांचे चरणीं विसर्जन करून मुक्ति घेतली व उद्धरून गेला.

चमत्कार ३ रा.

व्याघ्र शिलारूप झाला.

श्रीमोरयांनीं थेऊर येथें गेल्यावर अनुष्ठानास आरंभ केला

तो श्रीचिंतामणि यांनीं त्यांची कसोटी पाहण्याकरितां एक महाक्रूर व्याघ्र त्यांच्या अंगावर सोडला. परंतु श्रीमोरयांच्या समाधिवृत्तींत यत्किंचित् चलबिचल झालीं नाहीं. उलट श्रीमोरयांचा अंगस्पर्श त्या व्याघ्रास होतांच तो तात्काळ शिलारूप झाला. व उद्धरून गेला. ती शिला अद्याप थेऊर येथें कायम आहे.

चमत्कार ४ था.

शेतकऱ्याच्या जन्मांध मुलीस दिव्य दृष्टि दिली.

एकेदिवशीं श्रीमोरयागोसावी ताथवडे गांवांजवळील किवजाई देवीच्या देवळांतून अनुष्ठान संपवून श्रींच्याधूपार्तीसाठीं विस्तव आणण्याकरितां जवळ असलेल्या पवाराच्या शेतांतील कोपींत गेले त्यावेळीं पवाराचीं मनुष्यें रानांत गेलीं होतीं व घरीं एक जन्मांध कन्या राहिली होती. तिच्याजवळ श्रीमोरयांनीं अग्नि मागितला. तेव्हां तिनें मीं आंधळी असल्यानें विस्तव देण्यास असमर्थ आहें असें सांगितलें त्यावरून त्या योग्यानें श्रीगजानन कृपेनें तुला दिसूं लागेल तूं विस्तव लौकर आणून दे असें सांगितलें ती विस्तव देण्यास उठतांच तिला दिव्यदृष्टि प्राप्त झाली व तिनें तत्काळ अग्नि आणून श्रीमोरयागोसावी यांस दिला व त्यांचे चरणीं लीन झाली.

चमत्कार ५ वा.

पवार स्त्रियेस पुत्रप्राप्ति झाली.

ताथवडे गांवचा तुकाराम पवार नांवाचा दुसरा एक मराठा गृहस्थ श्रीमोरयांच्या अनुष्ठानस्थलाजवळच राहत होता. तो एकेदिवशीं श्रीचेदर्शनास आला व प्रार्थनाकरून ह्मणाला कीं, महाराज मला आपली कांहीं सेवा घडावी ह्मणून मी श्रीमंगलमूर्तीच्या नैवेद्याकरितां दूध आणून देत जाईन त्याचा स्वीकार व्हावा. ही त्याची विनंति श्रीमोरयांनीं मान्य केली. त्या पवाराचा दूध देण्याचा नित्य क्रम चालला असतां एके दिवशीं त्याचे बायकोस दूध पोंचविण्याचा विसर पडला. सायंकाळीं स्मृति होतांच ती दूध घेऊन पर्णकुटिकेंत आली त्यावेळीं मोरयांनीं तिला सहज विचारलें कीं, तुला पुत्र किती आहेत ? तें ऐकतांच तिला अत्यंत गहिंवर येऊन रडें कोसळलें. व ती ह्मणाली महाराज मला मूलबाळ कांहींच नाहीं. श्रीमोरयांनीं तिची ती अवस्था पाहून कळवळून श्रींचा प्रसाद देऊन तुझी मनकामना लौकरच श्रीगजानन पूर्ण करितील असा आशीर्वाद दिला. पुढें कांहीं दिवसांनीं तिला पुत्र प्राप्ति झाली. त्यावेळीं पवारानें त्यास जमीन इनाम दिलेली अद्याप त्यांचे वंशजाकडे उपभोगास आहे.

चमत्कार ६ वा,

अपकाऱ्यावरही उपकारच केला.

एकेदिवशीं मध्यरात्रीच्या सुमारास सुरुळगांवीं राहणाऱ्या नरहरी महिपती या नांवाच्या मराठ्यानें श्रीमोरयांची ध्यानस्थ वृत्ति खरी आहे किंवा खोटी आहे हें पाहण्याकरितां मुद्दाम दुष्टपणानें ते ध्यानस्थ असतां त्यांच्यापर्णकुटिकेस एकाएकीं आग लाविली. सर्व पर्णकुटिका जळून खाक झाली. परंतु सद्गुरु मोरया आपल्या जागेवरून लवलेश हालले नाहींत. अग्नीनें त्यांच्या शरीरास बिलकूल इजा केली नाहीं. समाधी विसर्जन केल्यावर त्यांना असें कळून आलें कीं, हें सर्व कृत्य नरहरीनें परीक्षा पाहण्याकरितां मुद्दामच केलें होतें. तथापि ह्या कृत्याचा त्यास पश्चात्ताप झाल्यावर तो त्यांस शरण आला. तेव्हां श्रीमोरयांनीं त्यास क्षमा करून " असा पुन्हा कोणाचा व्यर्थ छल न करण्याविषयीं उपदेश केला. " अशा प्रकारची ज्याची एकतान वृत्ती झाली त्याला पीडा करणारा ह्या अखिल ब्रह्मांडांत कोण समर्थ आहे ? अशा त्या विकाररहित पुरुषाला कोणापासून भय आहे ? भयसारें द्वैतपणांत असतें, जे दुज्याभावास गिळून बसले ते जगांत निर्भयच होत.

चमत्कार ७ वा.

अन्नपूर्तता केली.

श्रीमोरयांच्या लग्नसमारंभ समयीं त्यांच्या श्वशुरानें आपल्या सामर्थ्यानुरूप शंभर सवाशें पानांचें साहित्य चिंचवड येथें बरोबर आणिलें होतें. परंतु तेथें आल्यावर त्यास असें वाटलें कीं, आपण आणिलेल्या भोजनाच्या साहित्यांत लग्नसमारंभा करितां जमलेल्या मंडळींचा समावेश होणार नाहीं ह्मणून त्यास फार काळजी उत्पन्न झाली. हें श्रीमोरयास समजतांच त्यांनीं त्यांस बोलावून आणून सांगितलें कीं, तुह्मास काळजी करण्याचें बिलकूल कारण नाहीं. श्रीमंगलमूर्ती असलेल्या साहित्यांत सर्व पार पाडितील.तुह्मी स्वयंपाक सिद्ध झाल्यावर मला कळवा. त्याप्रमाणें त्यांच्या सासऱ्यानें स्वयंपाक सिद्ध झाल्याचें येऊन सांगितलें. नंतर श्रीमोरयांनीं स्वहस्तें श्रीमंगलमूर्तीस नैवेद्य समर्पण करून स्वयंपाकगृहांत येऊन सर्व स्वयंपाक अवलोकन केला व त्यावर तीर्थ सिंचन करून पात्रें मांडण्यास आज्ञा दिली. थोडक्याच वेळांत ब्राह्मणांच्या शेंकडो पंक्ति जेवून उठल्या नंतर त्यांनीं इतर जातीस प्रसाद वाटला (आणि स्वयंपाकघरांत जाऊन पाहतात तों पूर्वसिद्ध अन्न जशाचें तसेंच कायम आहे.) मग सर्वांनीं उर्वरित प्रसाद भक्षण करून श्रीमंगलमूर्तींच्या नांवाचा जय घोष केला.

चमत्कार ८ वा.

महापुराचें उल्लंघन केलें.

एकेवेळीं पर्जन्य काळांत श्रीमोरयागोसावी नित्याप्रमाणें मोरगांवीं वारीस चालले असतां वाटेंत अंबी गांवाजवळ येऊन पोहोंचले तों कऱ्हानदीला महापूर आला असें त्यांनीं पाहिलें. रात्र अंधारी मोरगांवीं तर वेळेवर गेलेंच पाहिजे, तेव्हां आतां काय करावें या चिंतेंत ते पडले. शेवटीं कृतनिश्चय करून त्यांनीं श्रीमंगलमूर्तींच्या नांवाचा गजर केला व पाण्यांत शिरले तों त्यांस कोणी उतरून पलीकडे नेत असल्याचा भास झाला नदी उतरून पार झाले तो त्यास मांड्या इतकें पाणी लागलें असून ज्यानें हात धरला होता तो कोठें दिसेना. तेव्हां श्रीमंगलमूर्तींनींच आपल्यास साह्य केलें असें जाणून ते त्या आनंदांत झपाट्यानें निघून मोरगांवीं आले.

चमत्कार ९ वा.

देवद्वाराचीं कुलुपें गळून पडलीं.

वर लिहिल्याप्रमाणें मोरगांवीं श्रीमोरयागोसावी दाखल झाले तों बरीच रात्र झाल्याकारणानें पूजाऱ्यांनीं देवालयास कुलुपें लावून ते घरोघर गेले. आतां आपली पूजा अंतरली ह्मणून श्रीमोरयांच्या चित्तास फारच उद्विग्नता वाटली तोंच अद्भुत

करणी होऊन देवालयाचीं सर्व कुलुपें पटापट पडून दारें उघडलीं. नंतर श्रीमोरया आंत गेले श्रीमोरेश्वरांची कोणी महापूजा केलेली होती ती त्यांनीं एके बाजूस काढून ठेवून यथासांग पूजा केली. आणि आपण बाहेर आले तोंच कुलुपें पूर्ववत् लागलीं. पहांटेस पुजारी येऊन दारें उघडून पाहतात तों श्रीमंगलमूर्तींची रात्रौ केलेली महापूजा कोणी दूर काढून ठेवून नवी पूजा केलेली आहे असें त्यांस दिसून आलें. शोधा अंतीं त्यांना समजलें कीं चिंचवडचे मोरयागोसावी आले आहेत त्यांनींच ही पूजा केली असावी ह्मणून त्यांनीं त्यांस भेटून विचारलें तेव्हां श्रीमोरयांनीं रात्रौ घडलेला सर्व चमत्कार त्यांस निवेदन केला. तेव्हांपासून श्रीमोरयांनीं पूजा केल्याशिवाय पुजारी देवळास कुलुपें घालीनातसे झाले. भक्तासाठीं श्रीमंगलमूर्तींनीं ज्या अघटित लीला केल्या त्या कोठवर वर्णाव्यात!!!

चमत्कार १० वा.

कुष्ठी ब्राह्मण दिव्यदेही केला.

पुढें एकेप्रसंगीं चतुर्थीस श्रीमोरया वारीकरितां मोरगांवीं जाण्यास निघाले. वाटेंत एक गलितकुष्ट पापी त्यांचे नजरेस पडला त्यांनीं मोरयाजवळ पाणी प्यावयास मागितलें. तेव्हां त्यांना त्याची कींव येऊन त्यांनीं त्यास पाणी आणून पाजिलें

व थोडें उदक अंगावरही सिंचन केलें. त्यामुळें त्याची तहान भागून देहहि दिव्य झाला. सर्व व्याधि क्षणार्धांत नष्ट झाल्यामुळें त्यांनीं श्रीमोरयांची अनन्यभावें स्तुति केली व मला आपल्या चरणांची कांहीं सेवा घडावी अशी इच्छा दाखविली. त्यावरून श्रीमोरयांनीं त्यास श्रीमयुरेश्वराचा नामोच्चार करीत जा. व प्रतिमासीं चतुर्थीस मोरगांवीं वारीस येत जा. अशी आज्ञा केली व आपण पुढें निघून गेले. श्रीमोरयासारखा महाभक्त त्या ब्राह्मणास धन्वंतरी मिळाल्यावर त्याची व्याधी नष्ट व्हावी हें अगदीं साहजिक आहे.

चमत्कार ११ वा.

ब्राह्मणाची पोटशूळ व्यथा घालविली.

श्रीमोरयागोसावी एके दिवशीं वारीस गेले असतां एका वृक्षाखालीं एक ब्राह्मण पोटशूळाचे व्यथेनें फार व्याकुळ होऊन मूर्च्छित पडलेला त्यांनीं पाहिला. तो व्यथेनें जर्जर होऊन परमेश्वराचा धांवा करीत मोठ्यानें आक्रोश करीत होता त्याचे ते करुणालाप ऐकून श्रीमोरयांचें चित्त फारच द्रवलें आणि त्यांनीं आपल्या हातानें त्याचें पोट चोळलें. चमत्कार असा झाला कीं, त्याचें पोट दुखणें क्षणार्धांत कमी पडून तो चांगला बरा झाला. नंतर त्यानें उठून श्रीमोरयांस आभारपूर्वक नमस्कार केला व ह्मणाला; महाराज माझी जन्माची व्य-

था आज आपल्या हस्तस्पर्शानें निरसन झाली. माझे मागें प्रपंचपाश वगैरे कांहीं नाहीं तेव्हां मला या आपल्या चरणाचा अंतर पडूं देऊं नये. येवढी माझी नम्रतापूर्वक विनंति आहे. त्यावर "तूं गणेशभजन कर व तुझी इच्छा असल्यास येथेंच प्रतीमासीं भेट घेत जा" असें सांगून ते पुढें निघून गेले.

चमत्कार १२ वा.

मोरयाकरितां श्री मोरेश्वर देवळाबाहेर आले.

श्रीमोरयागोसावी एके चतुर्थीस मोरगांवीं वारीस येत असतां त्यांस तेथें पोंचण्यास बरीच रात्र झाली. तेव्हां आतां श्रीमोरयांची स्वारी येत नाहीं असें जाणून पूजाऱ्यांनीं देवद्वारास कुलुपें लाविलीं इतक्यांत मोरया येऊन पोंचले तों द्वारास कुलुपें लागल्याचें त्यांस दिसून आलें. आपल्या वृद्धावस्थेमुळें आज लौकर येणें न झाल्यामुळें श्रींची पूजा नैवद्य अंतरला हें पाहून त्यांस फारच वाईट वाटलें. व त्यांनीं देवळाबाहेर तरटीच्या झाडा (कल्पवृक्षा) खालीं आसन टाकून ध्यान करण्यास सुरुवात केली तों श्रीमंगलमूर्ती देवळांतून निघून मोरयाचे पुढें येऊन बसले. हें पाहून श्रीमोरयांनीं सद्गदीत अंतःकरणानें त्यांचें पूजन स्तवन करून भजनास प्रारंभ केला. त्या गडबडीनें पुजारी जागे झाले आणि त्यांतील एका भाविक पूजाऱ्यास देवाची स्वारी देवालयांत सिंहासनावर नसून

मोरयांच्या पुढें बसली आहे व मोरया भजनरंगांत अगदीं तल्लीन झाले आहेत असें दिसलें. हा चमत्कार त्यानें स्वतः पाहून मोठ्या तातडीनें ग्रामस्थांस बोलावून आणून सांगितला. तेव्हां ते आश्चर्यानें श्रीमोरयांकडे पाहूं लागले. व हा प्रत्यक्ष ईश्वर रूपानें अवतरला आहे अशी त्यांची खात्री झाली. त्या पुजाऱ्यानें त्याची प्रार्थना केली कीं, महाराज "आमचा देव श्रीमंगलमूर्ती जागचे जागीं नेऊन बसवा नाहीं तर या स्थलाचें लोकांस वैय्यर्थ वाटेल. सेनानी वाचून सेना-किंवा चंद्रावाचून रजनी तद्वत् हा आमचा भक्तवृंद श्रीमंगळमूर्तींवाचून व्यर्थ होय. आह्मीं आजपर्यंत अति-नम्रतेनें ज्या पायावर मस्तकें ठेविलीं व जो सर्व सुखाचें आगर असा हा मंगलमूर्ती त्याचें ध्यान पहात आलों. ज्याच्या दर्शनमात्रेंकरून लाखों प्राणि जीवन्मुक्त झाले त्या श्रीमोरे-श्वराचीमूर्ती परत देवळांत नेऊन बसवावी. फार काय सांगावें. आमचा उदरनिर्वाह सुद्धां ही मूर्ती येथें आहे ह्मणूनच यथा-स्थित चालतो." हें भाषण श्रवण करून श्रीमोरया हांसून ह्मणाले तुम्हीं भिऊं नका. शांत चित्त व्हा. माझें भजन संप-ल्यावर श्रीगजानन आपल्या जागीं परत जातील. तुमच्या सर्वांच्या कृपाप्रसादानें मलाही श्रींचीं पाउलें दिसलीं आहेत. आतां तूं सर्व मंडळीसह निर्भय मनानें स्वगृहीं गमन करावें. मोरयांचें भजन संपतांच श्रीगणेश आपल्या जागेवर जाऊन

बसले. त्यांचे स्मरणार्थ त्या झाडाखालीं हल्लीं देवळाच्या प-श्चिमेस एक गणेशमूर्ति आहे. याचवेळीं श्रीमंगलमूर्तींनीं श्री-मोरयांची वृद्धावस्था जाणून त्यांस पुन्हां वारीस न येण्याची आज्ञा केली व आपण स्वतः प्रसादरूपानें त्यांचे गृहीं चिं-चवड येथें राहिले.

चमत्कार १३ वा.

वैश्याच्या मृतपुत्रास उठविलें.

श्रीमंगलमूर्ति मोरयांच्या भक्तीस्तव देवळाबाहेर आले व त्यांचेबरोबर प्रसादरूपानें चिंचवडास गेलें हें वृत्त कर्णोप-कर्णी सर्वत्र पसरलें. लोकांच्या झुंडीच्या झुंडी श्रीमोरयांच्या दर्शनास येऊं लागल्या मोरगांवीं दुसरे दिवसीं एकच गर्दी उडून राहिली. शांतपणानें कोणास दर्शन होण्याचीही पंचा-ईत पडली. अशा समारंभाच्या वेळीं एक वैश्यजातीचा धर्म-भोळा मनुष्य आपल्या बायकोमुलासह श्रीमोरयांच्या दर्श-नास आला. गर्दीमुळें त्यास दर्शन होईना शेवटीं तसाच नेटा-नें तो गर्दीत शिरत असतां दुर्दैवानें कोणा मनुष्याचा धक्का बसून त्याचे कुटुंबाच्या कडेवरील तान्हा मुलगा खालीं पडला. व क्षणांत चेंगरून जाऊन गत प्राण झाला. मग त्या उभयतांच्या शोकास काय विचारावयाचें आहे ? दुःखातिरेकानें त्याच्या कुटुंबास मूर्च्छा आली. इतक्यांत श्रीमोरयांची स्वारी पूजा

करून देवालयाबाहेर आली तोंच वैश्यानें त्यांचे पाय घट्ट धरिले आणि घडलेला वृत्तांत त्यांस निवेदन केला. नंतर मोरयांनीं सदयअंतःकरणानें त्या मुलाकडे पाहून त्याचे मुखांत तीर्थ घातलें व अंगावरही सिंचन केलें. त्यासरसें मूल झोंपेंतून उठल्याप्रमाणें जागें होऊन टकमका पाहूं लागलें. हा चमत्कार पाहतांच त्या उभयतांस जो आनंद झाला तो काय सांगावा ? तो वाचकांनीं कल्पनेनेंच जाणावा असो. हा अत्यद्भुत चमत्कार सर्वांनीं पाहिल्यावर त्यांनीं श्रीमोरयांच्या नांवाचा सर्वत्र जयजयकार केला. " मंगलमूर्ति मोरया "

प्रकरण ११ वें.

श्रीमोरयांचा परिवार.

१ श्रीचिंतामणि महाराज.

" शुद्धबीजा पोटीं फळें रसाळ गोमटीं "

(श्रीतुकाराम)

१ आपल्या ह्या आर्यधर्मांत कौटुंबिकस्थितीचें पर्यवसान पुत्रधर्मांत झालेलें असतें असें आढळून येईल. आणि येवढ्याकरितांच गृहस्थाश्रमाचें महत्व फार मानलें गेलें आहे आणि त्यांतलें त्यांतही सद्धर्मशील व धर्मैकनिष्ठ पुत्रसंतति प्राप्त होणें मोठ्या भाग्याचेंच लक्षण होय. श्रीमोरयांनीं गृहस्थाश्रम स्वीकारला तो ईशाज्ञेनें स्वीकारला तर खराच परंतु त्यांस

वरील उच्चतत्वाची पूर्णपणें जाणीव होती. त्यांना पुत्र-संततीचें सुख परमेश्वरीकृपेनें उत्तम लाधलें. हें तरी केवळ त्यांचें भाग्यच होय. उत्तमक्षेत्रांत चांगलें बीज पेरलें गेलें तर त्याचें फळ उत्तमच प्राप्त होणार हें तत्व अगदीं त्रिकालाबाधीत आहे. व याची साक्ष वरील श्रीतुकोबारायाच्या उक्तींत ही स्पष्टपणें निर्दिष्ट केलेली दिसून येते तशीच ऋग्वेदांतील अरणांत आत्मषट्कांत ही याचा उल्लेख उत्तम केलेला आहे "व रमेको गुणी पुत्रो नच मूर्खशतान्यपि । एकश्चंद्रस्तमो हंती नच तारागणा अपि " हजारों तारागणांनीं जो अंधकार नाहींसा होत नाहीं तो फक्त एका चंद्रोदयानें होतो.एकच पुत्र परंतु सद्गुणी व सदाचारी असला तर तें कूळ जसें शोभतें तसें शंभर मूर्खपुत्रांनींही सुशोभित होत नाहीं. " एकेनापि सुवृक्षेण पुष्पितेन सुगंधिना ॥ वासितं तद्वनं सर्वं सुपुत्रेण कुलं यथा ॥ " असो श्रीमोरयांनाही तसेंच पुत्ररत्न लाभलें होतें.श्रीचिंतामणिमहाराज यांची कीर्ति आपल्या पित्यापेक्षांही कांकणभर सरस अशी चोहोंकडे पसरून राहिली होती. किंबहुना गतानुगतिक काल त्यांच्या जन्मानें उज्ज्वलितच होत गेला. त्यांनीं केलेल्या अद्भुत चमत्कारामुळें त्यांच्या दैवीतेजाची प्रभा पुढें पसरतच गेली. त्यांची वृत्तीही बालपणापासून ईश्वरसेवा आणि अध्यात्मिक ज्ञान याकडेच वळलेली होती, त्यांनीं आपला आयुष्य-

क्रम थोडासा लौकिकदृष्ट्या व्यवहार्य असाच रेखाटला होता. त्यांनीं आपल्या वयाच्या आठव्याचवर्षी भाद्रपद शुद्ध ४ चे दिवशीं—ते व्याधिग्रस्त झाले असतांना—मातेजवळ अन्नमागितलें परंतु मातुश्रीनें— तो दिवस उपवासाचा असल्यामुळें त्यांस दिलें नाहीं. हें पाहून श्रीचिंतामणीनीं श्रीमोरेश्वराचा धांवा केला. तेव्हां मोरगांवाहून श्रीमंगलमूर्ती आपल्या पत्न्यासह गोसाव्याच्या रूपानें येऊन त्यांनीं त्यांची मनकामना पूर्ण केली. श्रीचिंतामणी महाराजांची लहानपणींच कीर्ति सर्वत्र पसरली.

२ एकेदिवशीं तळेगांव येथील एका ब्राह्मणानें भक्तिभावानें श्रीचिंतामणीच्या चरणीं येऊन विनंति केली कीं, महाराज मी निपुत्रिक असल्यानें फार कष्टी आहें. माझी मनकामना आपल्या कृपाप्रसादानें परिपूर्ण होईल अशी मला दृढ आशा आहे. त्याचा भाव जाणून महाराजांनीं त्याला एक आम्रफल दिलें व तें तूं आपल्या कुटुंबाकडून भक्षण करीव ह्मणून सांगितलें. ब्राह्मणानें त्याप्रमाणें करितांच त्याला यथाकालीं पुत्रसंतति प्राप्त झाली. पुढें तो मुलगा श्रीचिंतामणिमहाराजांच्या सेवेला नेहमीं तत्पर राहिला.

उत्तरोत्तर महाराजांची दैविक चमत्कार करून दाखविण्याची प्रसिद्धि फारच झाली.

३ एका गंवजेकर ब्राह्मणास मुसलमान सरदारानें "सरकार

देणें दिलें नाहीं या सबबीवर " धरून नेऊन अटकेंत ठेविलें. त्या ब्राह्मणाचा भाद्रपदीच्या यात्रेस जाण्याचा नेम होता. ह्मणून त्यानें यवनाधिपतीस आपल्यास सोडावें यास्तव पुष्कळ विनंति करून पाहिली परंतु तिचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. शेवटीं ब्राह्मणानें निराश होऊन श्रीचिंतामणीचा धांवा करून करुणा भाकली. तेव्हां श्रींनीं त्याची गुप्तरूपें जाऊन सुटका केली व त्यास मोरगांवीं यात्रेस नेलें. दुसरेदिवशीं सकाळीं शिपाई कोठडी उघडून पाहतात तों आंत ब्राह्मण दिसेना. तपासाअंतीं तो मोरगांवच्या यात्रेस गेल्याचें वर्तमान त्यांस कळलें. त्यानंतर ब्राह्मणास पुन्हा पकडून आणून खरा वृत्तांत विचारला त्यावरून त्यानें झालेला खरा खरा मजकूर बादशाहास सांगितला. त्यावरून यवनाधिपाची श्रीचिंतामणिमहाराजांविषयीं फारच पूज्यबुद्धि झाली.

४ एकदां यवनबादशाहानें श्रीचिंतामणीची (साधुत्वाची) परीक्षा पाहण्याकरितां आपले यवन सेवक पाठवून त्यांस धरून आणण्याचा हुकूम केला राजाज्ञेप्रमाणें सेवक चिंचवड येथें दाखल झाले. इकडे महाराज श्रीमंगलमूर्तींच्या भजनपूजनांत गर्क झाले होते. त्यांना पाहतांच यवनसेवकांची पूर्ववृत्ति पालटून ते तेथेंच गुंग होऊन गेले. सेवक लौकर आले नाहींत असें पाहून किल्लेदारानें पुन्हा दुसरे सेवक श्रीचिंतामणीमहा-

राजांस ताबडतोब धरून आणण्यासाठीं पाठविले. त्यांची स्थिति पूर्ववत् शिपायाप्रमाणें होऊन त्यास भुरळ पडून महाराजांस धरून नेण्याचा विसर पडला. शेवटीं स्वतः बादशहा फौजेनिशिं यावयास निघाले. हें वृत्त चिंचवडकर मंडळीस समजतांच त्यांनीं महाराजांस पळून जाण्याविषयीं विनंति केली परंतु श्रीचिंतामणीनीं त्यांचें बिलकूल न ऐकतां ते मंगलमूर्तीच्या भजनांत अधिकच रंगून गेले व माझा वाली श्रीमोरया आहे. मला कोणाचेंही भय नाहीं तुह्मी घाबरूं नका असें त्यांनीं मंडळीस आश्वासन दिलें. बादशाहा गांवांत येऊन ससैन्य दाखल झाला व महाराजांकडे जाऊन त्यांस धरण्याविषयीं हुकूम करणार तोंच एकाएकीं त्याची क्रोधवृत्ति मावळून महाराजांचें दर्शन घ्यावें असें त्यांस वाटलें व तो तत्काळ त्यांचेकडे आला. श्रीचिंतामणीची विभूति पाहिल्याबरोबरच हा कोणी हिंदूचा खरा अवलिया आहे अशी त्याच्या मनाची पक्की खात्री झाली. तथापि त्यांची कसोटी पाहावी एतदर्थ त्यानें एका रुप्याच्या ताटांत मद्य व मांस घालून तें झांकून आणविलें व तुझ्या देवास हें अर्पण कर ह्मणून तो त्यांस ह्मणाला. श्रीनें तें तत्काळ जाणून त्यावर तीर्थसिंचन केलें व उघडून पाहण्यास सांगितलें तोंच त्याचें दूध व गुलाबाचीं फुलें असें रूपांतर झालें हा चमत्कार पाहून बादशा-

ह्यास फारच आश्चर्य वाटून तो त्यांचे चरणीं लीन झाला महाराजांनीं त्यास प्रसाद देऊन बोळविलें.

५ त्याच किल्लेदाराच्या स्त्रीला पोटदुखीची नेहमींचीच व्यथा होती. तिची भक्ति श्रीचिंतामणि महाराजांच्या चरणीं जडली व तिनें एकवेळ महाराजांचे दर्शन घेण्याची आपली इच्छा आपल्या पतीस दर्शविली त्यावरून किल्लेदार तिला घेऊन चिंचवड येथें श्रीचिंतामणि महाराजांचे दर्शनास आला. दर्शन झाल्यावर त्यानें आपल्या कुटुंबाची सविस्तर हकीगत महाराजांचे पुढें सादर केली. त्यावरून महाराजांनीं पूर्णकृपेनें तिचेंकडे अवलोकन केलें व तिला तीर्थ व प्रसाद (शाक-भाजी) देऊन निरोगी केलें. तेव्हां तीं दोघें आनंदित मनानें परत चाकणास गेलीं व तेथून किल्लेदारांनीं श्रीचिंतामणींच्या नांवाच्या सनदा लिहून पाठविल्या परंतु महाराजांनीं त्यांचा स्वीकार न करितां त्या तशाच परत किल्लेदाराकडे पाठविल्या सनदा परत आलेल्या पाहून किल्लेदारास व त्याच्या कुटुंबास फार वाईट वाटलें व त्यांनीं कांहीं ब्राह्मणांच्या मध्यस्तीनें श्रीचिंतामणींचे ज्येष्ठ पुत्र श्रीनारायणमहाराज यांजकडून त्यांच्या पश्चात् युक्तीनें वचन घेऊन त्यांचा स्वीकार करविला. असो.

६ एकेवेळीं मार्गशीर्ष कृष्णपक्षीं पुण्यतिथिचे दिवशीं श्रीचिंतामणि महाराज नैवेद्य समर्पण करण्याकरितां देवालयांत

गेले असतां समुद्रांत बुडत असलेल्या त्यांच्या एका श्रीमान् भक्तानें त्यांची करुणा भाकिली. ती दीनवाणी महाराजांचे कर्णीं पडतांच तेथेंच गुप्त होऊन ते भक्ताचें संकट निरसन करण्याकरितां तसेच धांवले व त्यांस समुद्रांतून जहाजासकट बाहेर समुद्र तीरीं आणून ठेविलें. इकडे महाराजांस उशीर लागला. ह्मणून मंडळी देवालयांत पाहतात तों ते तेथें कोठें दिसेनात. ह्मणून इकडे तिकडे शोधतात तो महाराज ओलेत्यानें आलेले दिसलें. तेव्हां त्यांस मंडळींनीं स्नान करण्याचें कारण सहज विचारलें. तेव्हां त्यांनीं घडलेला सर्व वृत्तांत सांगितला तेव्हां सर्वांस मोठें आश्चर्य वाटलें आणि त्यांपैकीं एकानें त्यांचें वस्त्र पिळून पाणी चाखलें तों तें अगदीं खारट लागलें त्यावरून सर्वांचीच खात्री होऊन त्यांनीं श्रीचिंतामणि महाराजांचा जयजयकार केला नंतर श्रीस नैवद्य होऊन रीतीप्रमाणें ब्राह्मणभोजन झालें त्या श्रीमान् भक्तानें श्रींस मुगुट जवाहीर वगैरे अर्पण केलें.

७ एके समयीं पुण्यतिथीच्या दिवशीं ऐन दोनप्रहरीं श्रीमहाविष्णु आणि श्रीशंकर हे फकीर वेषानें श्रीचिंतामणमहाराजांचे द्वारीं आले व त्यांनीं सवाल करून भोजन मागितलें. महाराजांनीं अंतरज्ञानानें ते देव आहेत व आपली परीक्षा पाहण्याकरितां फकीरवेषानें आले आहेत असें जाणिलें. व त्यांना तत्काळ सिद्ध असलेलें अन्न अर्पण करून भोजन दिलें हें पाहू-

न निमंत्रित भिक्षुकांपैकीं कांहीं अज्ञ व शीघ्रकोपी ब्राह्मण महाराजांवर रागावून भोजन न करितां तसेच उठून परत गेले. महाराजांनीं त्यांची पुष्कळप्रकारें समजूत घातली परंतु त्यांचें समाधान झालें नाहीं अखेरीस राहिलेल्या ब्राह्मणांस भोजन घालून विडा दक्षिणा देऊन बोलविलें. तेव्हांपासून त्याच ब्राह्मणांकडे कुलोपाध्यायाचा मान सोंपविला.

८ एकदां अनगडशा नांवाचा एक अवलिया श्रीचिंतामणि महाराजांची कीर्ती ऐकून चिंचवड येथें आला व त्यानें एक तुंबा घेतला व तुंबाभर धान्याची भिक्षा मागितली. तेव्हां मंडळींनीं त्यांत धान्य घालण्यास सुरवात केली कितीही धान्य घातलें तरी तुंबा भरेना. हें वृत्त शेवटीं त्यांनीं श्रीचिंतामणिमहाराजांच्या कानावर घातलें तेव्हां त्यांनीं योगबलानें त्याचें कारण जाणून एक दूर्वा श्रीमंगलमूर्तीच्या तीर्थांत भिजवून त्या तुंब्यांत आणून टाकिली तेव्हां चमत्कार असा झाला कीं, सर्व धान्य त्या तुंब्यांतून आपोआप बाहेर येऊन तुंबा फक्त एका दूर्वेनेंच भरला अनगडशा साधूनीं हें पाहून मोठी धन्यता मानिली. महाराजांनीं नंतर त्यास आदरपूर्वक भोजन घालून त्यांची रवानगी केली.

९ श्रीतुकारामबुवास एकेवेळीं श्रीचिंतामणि महाराजांस भेटावें असें वाटून ते देहूहून चिंचवडास आले. महाराज पूजा करीत

होते. पूजा संपवून बाहेर आल्यावर उभयतांचे कुशल प्रश्न झाले; त्यावेळीं देवांनीं श्रीतुकारामास केव्हां आलांत हा प्रश्न केला. तेव्हां " आपली स्नान संध्या चालली असतां बागेस पाणी दिलें नाहीं तें दिलें पाहिजे असा विचार आपला चालला होता त्यावेळेसच मी येऊन दाखल झालों. " हा मनोमय संकेत जाणलेला पाहून देवास कौतुक वाटलें, नंतर श्रीदेवांनीं त्यास भोजनास राहण्याविषयीं आग्रह करून ठेवून घेतलें तेव्हां दोघेही सहजीं ह्मणाले कीं, अशा प्रसंगी श्रीरामदासही अवचित येऊन उतरतील तर मग त्या आनंदास काय पारावार आहे ? हें भाषण संपतें तोंच रामदास आकस्मिक येऊन उतरले देवांनीं सर्वांचीच भोजनाची तयारी केली पात्रांची सिद्धता करणार तोंच लोकांस चमत्कार दाखवावा ह्मणून तुकाराम व रामदास ह्मणाले कीं, आज आपापल्या आराध्यदैवतेस ज्यांनीं त्यांनीं प्रत्यक्ष भोजनास आणिलें पाहिजे, असें बोलून देवाकडून जास्त पात्रें वाढविलीं. देवांनीं या आग्रहांत न पडण्याविषयीं उभयतांस सुचविलें. परंतु उपयोग झाला नाहीं श्रीतुकाराम यांनीं रुक्मिणीपांडुरंगास आणलें श्रीरामदास यांनीं श्रीसीतारामचंद्रादि देवांस आणलें श्रीमंगलमूर्ती आपल्या समुद्रांत बुडत असलेल्या भक्तांस सोडविण्यास गेल्यामुळें देवांस त्यास लौकर आणतां आलें नाहीं. तेव्हां श्रीचिंतामणि महाराज तुकारामास ह्मणाले कीं तुम्ही श्रीमंगलमूर्तींची स्तुति

करा ह्मणजे ते येतील. इतक्यांत असा चमत्कार झाला कीं, श्रीचिंतामणि महाराजच शुंडादंडमंडित चतुर्भुज गणेशरूप दिसूं लागले. हें साधुद्वयांनीं पाहून तत्काळ त्यांचे चरणीं वंदन केलें व अनेकप्रकारें स्तुतिपर अभंग, आरती वगैरे करून त्यांस आळविलें. तीं पद्यें शेवटीं दिलीं आहेत. व ह्मणाले महाराज; आह्मी व आमचीं आराध्य दैवतें अशीं दोन रूपानें आम्हीं वेगळे आहोंत व तुह्मी व तुमचें दैवत हे एकच ह्मणजे प्रत्यक्ष मंगलमूर्तीरूप देव आहांत तेव्हां आजपासून तुमचें उपनांव देव असें ठेविले आहे हें उपनांव अद्याप त्यांच्या वंशास चालू आहे. श्रीमंगलमूर्ती भक्तास सोडविण्यास गेल्याचें वर लिहिलें आहे ते भक्तास सोडवून परत आल्यावर उभयसाधूंची खात्री पटण्याकरितां महाराजांनीं श्रींचा पितांबर पिळून दाखविला. तों तें क्षारोदक असल्याचें सर्वांस आढळलें. तेव्हां त्यांनीं श्रीचिंतामणि महाराजाची साधुत्वाविषयीं लोकांत फार प्रसिद्धि केली भक्तांचें ब्रीद राखण्याकरितां श्रीपरमेश्वर काय एक करणार नाहीं ! ! यावेळीं झालेले संवादात्मक अभंग शेवटीं दिले आहेत.

१० सिद्धटेक येथील राहणारा गोपाळ नांवाचा ब्राह्मण धनप्राप्त्यर्थ तेथेंच श्रीगणेशचरणीं तप करीत बसला होता. त्याला दृष्टांत झाला कीं तूं चिंचवड येथें श्रीचिंतामणिमहाराजाकडे जा ते तुझी इच्छा परिपूर्ण करितील. तेव्हां त्यास मोठें नवल

वाटलें कीं, जें काम प्रत्यक्ष देवाच्या हातून झालें नाहीं तें मनुष्याच्या हातून कसें होईल ? तथापि एकादां अनुभव घेऊन पहावा म्हणून तो चिंचवडास आला व महाराजांचे दर्शनास गेला तोंच त्याला चिंतामणमहाराज म्हणाले तुझी इच्छा मनुष्याच्या हातून कशी पूर्ण होईल हें खुणेचें बोलणें ऐकल्याबरोबर ब्राह्मण लज्जायमान होऊन शरण आला तेव्हां त्यास श्रींनीं धूपातींचे वेळीं येण्यास सांगितलें धूपार्ती नंतर त्यांस दाळीचा प्रसाद दिला व भोजन करून आपलेगांवीं जाण्यास परवानगी दिली ब्राह्मणानें रागानें त्याचा त्याग केला व नशीबावर हात ठेवून तो आपल्या कर्मास दोष देत परत गेला. वाटेनें अनेक विचार त्याच्या मनांत घोळून आपण विनाकारण इकडे आलों म्हणून त्याला पश्चात्ताप वाटला. मध्यंतरीं नदीवर स्नानासाठीं तो उतरला व पंचा सोडून पाहतो तों रात्रौ दिलेल्या दाळीपैकीं राहिलेल्या दाळीचे सर्व होन झाले आहेत हें पाहून त्यांस फारच आश्चर्य वाटले व आपण दाळीच्या प्रसादाचा अव्हेर केला म्हणून फारच दुःख झालें—लोभामुळें तो पुन्हा परत श्रीचिंतामणीमहाराजाकडे आला परंतु महाराजांनीं तुझ्या नशीबांत जेवढें द्रव्य होतें तेवढेंच तुला मिळालें आतां जास्त मिळणार नाहीं. असें सांगून परत जाण्यास आज्ञा दिली ब्राह्मण नशीबाला दोष देत देत तडक चालता झाला.

११ वैशाखी चतुर्थीस महाराज मोरगांवीं गेले तों तेथें एक ब्राह्मण गायत्रीपुरश्चरण करीत बसला होता. परंतु त्याची श्रद्धा मात्र श्रीमोरेश्वरावर नव्हती त्यांमुळें त्यास फलप्राप्ति होईना. तेव्हां तो महाराजांस ह्मणाला कीं, तुह्मी या पाषाणास व्यर्थ कां भजता यांत देवपणा नाहीं असा मला अनुभव आला आहे. त्यावर महाराज त्याला ह्मणाले तुझा अहंकार व पूर्व जन्मींचीं पातकें तुला नडतात त्यामुळें तुला इष्टफलप्राप्ति होत नाहीं. ब्राह्मण ह्मणाला; माझीं गायत्रीपुरश्चरणें फुकट गेलीं कीं काय ? महाराज ह्मणाले अहंकार रहित होत्साता श्रीमंगलमूर्तीस अनन्य भावानें शरण जा व उदयीक कऱ्हा बाईचें स्नान-करून आर्द्रवस्त्रानेंच देवलयांत येऊन श्रीचीपूजा कर ह्मणजे तुला प्रत्यय येईल. ब्राह्मणानें त्याप्रमाणें केलें व महाराजांनीं सांगितल्यावरून मागें वळून पाहिलें तों भोंवतालीं बत्तीस चिता (कांहीं जळत असलेल्या व कांहीं अर्धवट जळालेल्या) त्याला दिसल्या तेव्हां तो घाबरून जाऊन श्रीचिंतामणिमहाराजांस शरण गेला नंतर महाराजांनीं त्याला यथाविधी पुरश्चरण करावयास सांगितलें त्या योगानें कृतपापाचा क्षय होऊन त्याला थोड्याच दिवसांत सिद्धि मिळाली.

१२ एकदा मोरगांवची यात्रा करून श्रीचिंतामणिमहाराज परत येत होते तेव्हां ते मंगलमूर्तीशिवाय इतर देवांचें दर्शन घेत

नाहींत असें जेजुरीच्या खंडोबानीं मनांत आणून त्यांस स्वतः दर्शन दिलें आणि ह्मणाले मंगलमूर्ती व मी दोन नाहींत असें ह्मणून तसा प्रत्यय दाखविला. त्यावरून चिंतामणि महाराज जेजुरीस गडावर जाऊन श्रीखंडेरायाचें दर्शन घेऊं लागले त्या वहिवाटीप्रमाणें त्यांचे वंशज यात्रा करून आल्यावर दर्शनास जातात. पुढें येत असतां यमाईदेवीनें महाराजास दृष्टांतानें दर्शन घेण्याविषयीं सुचविलें व आपण वाटेवर येऊन त्यास दर्शन दिलें तेव्हांपासून तिचें दर्शन घेण्याची वहिवाट पडली आहे.

१३ कोथळे गांवीं कऱ्हानदीमध्यें एक शिवलिंग फार दिवस पडलें होतें तें घेऊन जाण्याविषयीं सासवड येथील एक अभाविक सावकार पाहत होता शिवलिंगास सासवड येथें जावयाचें नसल्यानें सावकाराचे सर्वप्रयत्न फुकट गेले शेवटीं चिंतामणमहाराजांस तें नेण्याविषयीं दृष्टांत झाला तेव्हां ते एके वर्षीं यात्रेस गेले असतां परत येतांना त्या शिवलिंगास आपल्या बरोबर घेऊन आले. (श्रीमोरया महाराजांच्या गुहाद्वारावर त्याची स्थापना पुढें करण्यांत आली त्यास श्रीअर्जुनेश्वर असें नांव असून तें हल्लीं मोरयाचे देवळांत दिसत आहे.)

१४ इसलामपूर नजीकच्या रेठरेगांवांतील मल्हार भक्त रामभट उंडाळकर नांवाचा एक ब्राह्मण श्रीचिंतामणिमहाराजांच्या

दर्शनास आला त्याची भक्ति पाहून त्यास मोरगांवीं वारीस येत जा ह्मणून त्यांनीं आज्ञा केली पुढें त्याचें नांव गणेशदेव असें पडलें. एकेवेळीं गणेशदेव पंढरपुरास गेले व श्रीमंगल-मूर्तीचीं पदें ह्मणूं लागले तेव्हां पंढरपूर मोरगांवाप्रमाणें दिस-ल्याचा भास झाला. ह्मणून श्रीतुकाराम यांनीं अभंग ह्मणून भजनास सुरवात केली तों पूर्वीं सारखी पंढरी दिसूं लागली. तसेंच चमत्कार मोरगांवीं या दोन्ही साधूंनीं लोकांस दाखविले. तेथें तुकाराम आल्याची साक्ष लोकांस पटावी ह्मणून त्यांनीं विठ्ठलमूर्तीची मोरगांवीं स्थापना केली.

१९ पुन्हा एकेप्रसंगीं शिवभक्तांनीं शिवरूप मोरया दाखवावा ह्मणून विनंति केली. तेव्हां श्रीचिंताम-णिमहाराजांनीं शिवरूप मोरया दाखविला. नंतर शंकर, विष्णु व सिद्धिविनायक अशीं तीन रूपें दाखवितांच सर्वांना अत्यानंद झाला. महाराज घरीं गेले. त्यांचे मागून त्यांचे भक्त गणेशदेवही चिंचवडास आले. व त्यांनीं मागित-ल्यावरून व त्याची एकनिष्ठ भक्ति पाहून त्यांना एक प्रासा-दिक गणेशमूर्ती दिली ती त्यांनीं हातांत घेतांच तीन कलेचा बाण झाला मुळांत श्यामवर्ण, मध्यें श्वेतवर्ण व मस्तकीं रक्तवर्ण याप्रमाणें तीन रंगी तीन कलांची बाणाकृति पाहून त्यास त्यांनीं कलाधरेश्वर नांव दिलें व त्याची स्थापना गणेशदे-वानीं आपले घरीं केली पुढें त्यास कांहीं उत्पन्नही इनाम

मिळालें आहे तें अद्याप त्यांचे वंशजाकडे चालत आहे नंतर थोडक्याच दिवसांनीं गणेशदेव कैलासवासी झाले. आपले प्रियभक्त गणेशदेव निवर्तल्याचें वृत्त ऐकून महाराजांस वाईट वाटलें. व त्यांनींही पुढें लौकरच देह ठेवावा ह्मणून निश्चय ठरविला. आणि स्वहस्तें एक गुहा तयार करून तिच्यांत जिवंत समाधि घेण्याचा आपला मानस श्रीमोरयांचे चरणीं निवेदन केला. श्रीमोरयांनीं स्वमदृष्टांतानें तूं जिवंतसमाधि घेऊं नकोस अशी आज्ञा केली तेव्हां त्यांनीं त्याच गुहास्थानीं मरणोत्तर दहन करवावें ह्मणून आपल्या पुत्रांस सांगून ठेविलें शेवटीं पौष वद्य ४ शके १५४७ क्रोधननामसंवत्सर रोजीं रात्रौ चंद्रोदयीं भोजनोत्तर श्रीचिंतामणिमहाराजांनीं आपला देह श्रीमंगलमूर्तीचें नामस्मरण करीत विसर्जन केला. त्यांच्या पुत्रांनीं त्यांच्या इच्छेप्रमाणें गुहेंत दहन केलें तों मूर्तिमंत गणेशमूर्तीची प्रतिमा खालीं उमटली ती अद्यापिही आहे. नंतर त्या जागेवर देवालय बांधलें.

३ श्रीनारायणमहाराज.

१ श्रीचिंतामणिमहाराजांस दोन कुटुंबांपासून ४ मुलगे झाले त्यांत वडील श्रीनारायणमहाराज हे होत यांचा जन्म शके १५२३ माघ शु. ७ झाला. हेही सत्पुरुषच होते परंतु यांनीं आपल्या लहानपणीं दैविक चमत्कार केले नाहींत. यांनीं

आपल्या आजाच्या—श्रीमोरयागोसावी यांच्या—समाधीचें द्वार उघडलें व दाराचे तोंडीं जातात तोंच आंतून शब्द झाला कीं, पुढें येऊं नको. तूं माझे समाधीचा विक्षेप केलास. प्रभूच्या आज्ञेप्रमाणें सात पिढ्या साक्षात्कार होईल परंतु पुढें औरस संततीचा लाभ मात्र होणार नाहीं. तें ऐकून त्यांना कृतकर्मांचा पस्तावा झाला. व त्यांनीं श्रीमोरयांची क्षमा मागून समाधीचे द्वारावर कायमचें शिवलिंग-श्रीचिंतामणिमहाराजांनीं आणलेलें—प्रस्थापित केलें. तें अद्याप दिसून येतें. पुढें यांनीं मोठेपणीं बरेच दैविक चमत्कार केले. त्यांतील कांहीं येथें दिले आहेत.

२ चिंचवड येथें एके वद्य चतुर्थीस वाकसानें भाजी तोडीत असतां तींत एक सर्प तुटला गेला व तो न कळत भाजीबरोबर शिजत पडला. सर्व स्वयंपाक तयार झाला पात्रें वाढून सिद्ध झालीं. ब्राह्मण भोजनास बसणार तोंच श्री मंगलमूर्तींनीं ब्राह्मणास विष बाधेल हें जाणून विष शोषण्यास प्रारंभ केला. व सर्व मूर्तीं हिरवी गार झाली परंतु त्याचें कारण कोणास समजेना. शेवटीं भोजनास बसलेल्या एका गृहस्थाच्या पानांत त्या सापाचा एक तुकडा आला तो त्यानें पाहिल्याबरोबर त्याचा गवगवा केला. त्यावरून चौकशी करून पाहिलें तों सर्व सापाचे तुकडे सांपडले. मंगलमूर्तीनें सर्व विष शोषून घेत-

लें अशी सर्वांची खात्री झाली. जेवणार मंडळींना विषाची बाधा मुळींच झाली नाहीं. इतकेंच नव्हे तर त्या सापाच्या तुकड्याच्या सोन्याच्या लगडी झाल्या अशी ही एक आख्यायिका आहे. ईश्वर करणी आगाध आहे.

३ एकदां मोरगांवीं यात्रेस गेले वेळीं मंगलमूर्तीसह महाराजास पोळींत जावयाचे होतें परंतु कऱ्हेस पाणी फार आल्यानें त्यांस जातां येईना प्रसादअन्न तर पोळींतच तयार झालें पाहिजे असें जाणून महाराज श्रीवर भार टाकून नदी उतरून चालले. त्यांचेमागून सर्व यात्रा चालली. क्षणांत जानुप्रमाण पाणी झालें; नंतर पोळींत जाऊन सर्व वार्षिकविधि झाला. मंडळींनीं श्रींचा जयजयकार केला.

४ नगर जिल्ह्यांतील शेवगांव ता० आवाणे गांवचा दादाजी गोसावी यांनीं हणमंत टाकळीस अनुष्ठान केलें तेथें दृष्टांत झाला कीं, तूं मोरेश्वरीं जा तेव्हां ते मोरगांवीं आले व तेथें त्यांनीं अनुष्ठान केलें. कार्यसिद्धी होऊन प्रसाद झाला कीं तूं चिंचवड येथें श्रीनारायण गोसावी आहेत त्यांजकडेस जा. त्यावरून ते चिंचवडास आले श्रींच्या आज्ञेप्रमाणें नारायण महाराजांनीं त्यास उपदेशमंत्र दिला व थेऊर येथें जाऊन अनुष्ठान कर म्हणून आज्ञा केली त्याप्रमाणें त्यांनीं थेऊर येथें जाऊन अनुष्ठान केलें. तेथें त्यांस घरीं जाण्याविषयीं दृष्टांत झाला. तेव्हां ते भुलेश्व-

रास गेले तेथेंही शंकरांनीं व्याघ्ररूपांनीं दर्शन देऊन दृष्टांत दिला कीं, तूं गुर्वाज्ञेप्रमाणें परत गांवीं जा व दरवर्षीं मोरयाची भाद्रपदींची यात्रा कर. एके वर्षीं ते मोरगांवीं यात्रेस जात असतां वाटेंत भीमेस पाणी फार आल्यानें त्यांस पलीकडे जातां येईना शेवटीं त्यांनीं देव गळ्यांत घालून पाण्यांत उडी टाकिली तों ते पेडगांवापर्यंत वाहावले. इकडे श्रीनारायणमहाराजास त्यांस आणण्याविषयीं दृष्टांत झाला त्याप्रमाणें त्यांनीं मनुष्य पाठवून दादाजीस मोरगांवीं आणविलें व यापुढें तूं या यात्रेस येऊं नकोस ह्मणून शपथ घातली व हा उत्सव तूं आपले गांवीं करीत जा अशी आज्ञा केली आणि सातारकर महाराजाकडून खर्चास इनाम देवविलें तें अद्याप त्यांच्या वंशजाकडे आहे.

९ श्रीनारायण महाराज हे आपल्या पदरीं हत्यारबंद माणसें ठेवून आसपास लुटालूट करून खंडणी मिळवितात हें वृत्त बादशहाच्या कानावर गेलें तेव्हां त्यांनीं त्यास पकडून आणून नजरकैदेंत ठेविलें ते दिवस उत्सवाचे होते महाराजांस नित्याप्रमाणें दररोज धूपारतीचे वेळीं चिंचवडास जावें लागे ते दररोज गुप्तपणानें जातात असें जाणून बादशाहानें त्यास एका मोठ्या पेटींत घालून बंदोबस्तानें ठेविलें व आपण स्वतः चिंचवड येथें धूपारतीचे वेळीं त्यास पाहण्यासाठीं हजर राहिला. इकडे महा-

राज योगबळानें धूपारतीचे वेळीं हजर राहिले हें त्यानें पाहून त्यांनाच कसे सुटून आलांत ह्मणून विचारिलें; त्यावरून त्यांनीं खरें वृत्त निवेदन केलें. तेव्हां बादशाहाची पूर्ण खात्री होऊन नारायणमहाराजाबद्दल पूज्यबुद्धि उत्पन्न झाली व हा एक हिंदूंचा अवलिया (देव) आहे अशी त्याची भावना होऊन त्यानें त्याचा छल करण्याचा नाद सोडला इतकेंच नव्हे तर आणखी कांहीं गांवच्या सनदा लिहून त्या मोठ्या भक्तीपूर्वक अंतःकरणानें महाराजांस अर्पण केल्या.

६ एके वेळीं श्रीनारायणमहाराजांचें सत्व हरण करण्याच्या हेतूनें चाकणाहून एक हजार (मुसलमान) फकीर चिंचवड येथें येऊन उतरले आणि भोजन मागूं लागले. त्यावेळीं महाराजांनीं एका ताटांत एक जोंधळ्याची भाकरी झांकून आणिली व मंगलमूर्तीचें नांव घेऊन त्यास वाटण्यास सुरवात केली. सर्व फकीरास भाकरी मिळाल्या हें पाहून ते महाराजाचा जयजयकार करीत गेले.

७श्री नारायण महाराज भाद्रपदीच्या यात्रेस निघाले असतां वाटेनें कोथळे गांवीं देसाई पाटलाची बायको आसन्न मरण झाली तेव्हां महाराजांनीं. तिला त्यांचे विनंतीवरून उठवून तिचेबद्दल आपल्या थोरल्या कुटुंबास देह ठेवण्यास आज्ञा केली. ती तिनें मान्य करून तत्काळ देह ठेविला. तेव्हांपासून

दहनस्थलीं देवालय बांधून ब्राह्मणद्वारा पूजा सुरु आहे. व दरसाल चोळी पातळही संस्थानांतून द्यावें लागतें. देह ठेवितांना तिनें आपल्या संनिध मला स्थान द्यावें येवढें मागून घेतलें होतें. पुढें श्रीनारायण महाराज यात्रेस जाऊन परत चिंचवड येथें आले.

८ गंगाधर नाईक या नांवाच्या गृहस्थानें लढाईंत यश मिळावें ह्मणून चिंचवड येथें येऊन पवनाबाईंत उभें राहून एकवीस दिवस अनुष्ठान केलें. श्रीमोरया प्रसन्न होऊन त्यांनीं त्यास एक प्रासादिक तरवार श्रीनारायण महाराजांच्या हातानें देवविली. नाईकानें तिचा भक्तिपूर्वक स्वीकार करून वसईचा किल्ला घेण्याचेकामीं पराक्रम करून तो सर केला.

९ निरंजन नांवाचा एक ब्राह्मण मोरगांवास श्रीमंगलमूर्तीची भक्तिकरून राहिला होता. त्याच्या भक्तींनीं श्री प्रसन्न होऊन डोलूं लागले. इतक्यांत श्रीनारायण महाराजांची स्वारी श्रीदर्शनास आली ह्मणून त्यांच्या लोकांनीं त्यास तेथून घालवून दिलें तो बिचारा भैरवाजवळ जाऊन बसला हें पाहून श्रीमंगलमूर्तीही तेथें गेले हा चमत्कार पाहून श्रीनारायण महाराजांनीं त्यांस स्वतः सन्मानानें परत देवालयांत आणवून आपल्या उजव्या बाजूचा त्यास मान दिला. श्रीनारायण महाराजांनीं शके १६३२ भाद्रपद शु. ७ रोजीं हा नश्वरदेह विसर्जन केला. त्यांना जेथें दहन केलें तेथें श्रीगणपतीची

प्रतिमा उठविली आहे व शेजारीं त्यांच्या पत्नीस दिलेल्या वराप्रमाणें तिचीही प्रतिमा उमटली आहे. हल्लीं ह्या दोन्ही प्रतिमा एकत्र असलेल्या जागीं देऊळ बांधिलें आहे (शके १६४१ आरंभ मार्गशीर्ष शुद्ध १० समाप्ति १६४२ शर्वरी नाम संवत्सरे वैशाख शु. ३)

४ धाकटे श्रीचिंतामणि महाराज.

१ हे श्रीनारायण महाराज यांचे ज्येष्ठ पुत्र होत हे सत्पुरुष असून साक्षात्कारी होते. यांनीं आपला काळ श्रीमंगलमूर्तींच्या सेवेंत घालविला. यांचे कारकीर्दींत श्रीनारायण महाराजांनीं बांधिलेलीं देवालयें थेऊर, शेवरी येथील पूर्ण झालीं. यांनींही आणखीं कांहीं देवालयें बांधिलीं आहेत. याशिवाय यांचा इतिहास उपलब्ध नाहीं यांनीं शके १६५८ कार्तिक वद्य १२ रोजी समाधि घेतली.

५ श्री धरणीधर महाराज (थोरले.)

१ श्रीधाकटे चिंतामणि महाराज यांचे हे वडील पुत्र होत. हेही साक्षात्कारी असून सत्पुरुष होते. यांचे कारकीर्दींत सातारचें शाहुराजास श्रीचे दर्शनास जाण्याबद्दल मंगलमूर्तींचा दृष्टांत

+टीप–हे नरनारायणाचे अवतार होते ह्मणून द्विमुख उमटले आहेत असें कोणी सांगतात.

झाला. त्याप्रमाणें ते चिंचवड येथें श्रीचे दर्शनास आले. प्रथम वाड्यांत गेले तों धरणीधर महाराज तेथें नसून दूर्वा आणण्याकरितां बागेंत गेले होते. ह्मणून कारभारी मंडळींनीं महाराजांचे बंधूसच हे महाराज ह्मणून दाखविले परंतु शाहूमहाराजांस स्वप्नांत जे पुरुष दिसले ते हे नव्हत असें वाटून त्यांनीं चौकशी केली. त्यावरून ते दूर्वा आणण्याकरितां बागेंत गेल्याचें वृत्त त्यांना समजलें ह्मणून शाहूमहाराज श्रीमोरयाचे देवालयाकडे दर्शनास गेले. तों श्रीधरणीधर महाराज तिकडून येत होते. उभयतांची दृष्ट होतांच खुणापटून शाहूमहाराजांनीं श्रींस साष्टांग दंडवत घातलें. श्रीनीं तेथेंच प्रसाद दिला ही भेट जेथें झाली त्या खडकाला राजाबिंडा ह्मणतात. नंतर कांहीं दिवस मुक्काम पडून शाहूमहाराज परत गेले. हे शके १६९४ मार्गशीर्ष वद्य ६ स समाधिस्त झाले.

६ श्रीनारायणमहाराज (धाकटे)

१ श्रीधरणीधर महाराज यांचे हे वडील पुत्र होत यांस सिद्धि अनुकूल असून हे सत्पुरुष साक्षात्कारी होते. एकदां श्रीमंत माधवराव पेशवे यांनीं इंग्रज सरकारावर स्वारी करण्याचा मनोदय करून ओझर येथें श्रीचेदर्शनास नानाफडणीस व सखारामबापू ह्यांसहवर्तमान गेले. त्यावेळीं श्रींचा प्रसाद झाला.

कीं तुह्मांस जय प्राप्त होईल. त्याप्रमाणें त्यांस अनुभव आला तेव्हां परत येतांना त्यांनीं श्रीचें दर्शन घेऊन गांव इनाम करून दिले ते अद्याप त्यांचे वंशजाकडे चालू आहेत. ही गोष्ट शके १७०० विलंबनामसंवत्सरीं घडली. यांनीं शके १७२४ कार्तिक वद्य १२ रोजीं समाधि घेतली

७ श्रीचिंतामणि महाराज (तिसरे)

१ श्रीनारायण महाराजांचे हे ज्येष्ठ पुत्र त्यांच्या पश्चात् संस्थानचे मालक झाले. हे साक्षात्कारी सत्पुरुष होते परंतु यांनीं गादीचा उपभोग फार दिवस घेतला नाहीं हे शके १७२७ आषाढ शु॥ ४ स समाधिस्त झाले. यांस औरस संतती नव्हती व श्रींची आज्ञाही सात पिढ्यांपर्यंतच औरस संततीस उपभोग घेतां येईल अशी होती त्याप्रमाणेंच शेवटीं झालें. नंतर यांनीं धरणीधर महाराजांस दत्तक घेतलें.

८ श्रीधरणीधर महाराज (दत्तक)

१ श्रीचिंतामणि महाराजाचे हे दत्तक पुत्र हेही साक्षात्कारीं सत्पुरुष व व्यवहार चतुर होते. यांचा जन्म शके १७२२ सालीं झाला. हे एकदां निजाम हैदराबादेस गेले होते तेव्हां त्यांचा दिवाण चंदूलाल यानें महाराजांचें सत्व पाहावें ह्मणून एका सबर असलेल्या घोडीस व गाईस काय

होईल ह्मणून विचारलें त्यावरून महाराजांनीं त्यांस उत्तर दिलें. पुढें त्यांनीं त्यांस तीं जनावरें प्रसूत होईपर्यंत ठेवून घेतलें. दोन्हीं जनावरें प्रसवल्यानंतर पाहतात तों महाराजांनीं सांगितलेल्या गोष्टींचा अनुभव आला त्यावरून दिवाणांनीं निजामसरकाराकडून महाराजांस देणगी देवविली. यांचा काल शके १७७४ अधिक भाद्रपद व॥४ ता. २ सप्टेंबरसन १८५२ रोजीं झाला.

२ श्रीधरणीधर महाराज गादीवर असतांना त्यांचे पुत्र श्रीचिंतामण महाराज हे अल्पवयी वारले. धरणीधर महाराज यांच्या कुटुंबांनीं गणपतदेव या नांवाचे इसम दत्तक घेतले असें ह्मणतात. यांनीं सुमारें २० वर्षें संस्थान चालविलें तसेंच श्रीचिंतामण महाराजांच्या बायकोनेंही एक भालचंद्र देव या नांवाचे इसम दत्तक घेतले होते. उभयतांचा तंटा सुरू झाला व कोर्टांत निकालासाठीं प्रकरण गेलें. त्यावेळीं निकालांत दोघेही श्रीची सेवा करण्यास अनधिकारी ठरले. नंतर कोर्टांनीं संस्थानची व्यवस्था तीन ट्रस्टींच्या हातीं दिली त्यावेळेपासून हल्लींचे महाराज धुंडिराज गणेशदेव हे चीफट्रस्टी या नात्यानें संस्थानचे पट्टाभिषिक्त महाराज ह्मणून काम पाहत आहेत (इ. स. १८९० तारीख १६ आगष्ट)

श्रीमंगलमूर्तींचें संस्थान. नंबर १

श्रीमोरयागोसावी यांनीं श्रीमंगलमूर्तीस प्रसन्न करून त्यांनीं

दिलेला प्रसाद ग्रहण केला व त्यांचेच अनुज्ञेवरून चिंचवड येथें ते वास करून राहिले आणि अनेक दैवीचमत्कार त्यांच्या हातून झाले हें वर्णन मागें आलें आहेच. श्रीमोरयागोसावी व त्यांचे पुत्र श्रीचिंतामणिमहाराज ह्या दोघांची ईश्वरनिष्ठा दैविकचमत्कार, भूतदया इत्याद्यनेक गुण पाहून त्यांस मोंगल, सरकारांनीं पुष्कळ गांवें इमान करून दिलीं. परंतु त्या दोघांही परम वैराग्यशील पितापुत्रांनीं त्यांचा मुळींच स्वीकार केला नाहीं. पुढें मोंगलांनीं त्यांचे पुत्रास- श्रीनारायण महाराजांस वचनांत गुंतवून घेऊन त्या सर्व सनदांचा स्वीकार करणें भाग पाडिलें त्यावरून महाराजांनीं त्यांचा स्वीकार केला व त्यांच्या उत्पन्नाचा विनियोग भिकारी, गोसावी, फकीर, अतीत अभ्यागत, गरजवंत वगैरे जो कोणी येईल त्यांस अन्नदान करण्याकडे सुरू केला. खर्च नीटनेटका चालावा ह्मणून जी व्यवस्था महाराजांनीं ठरविली तिलाच पुढें संस्थानचें रूप प्राप्त झालें—अरसल सनदा केव्हां मिळाल्याचा नक्की शक सन मिळत नाहीं; तथापि त्या इ० स० १७४१ च्या पूर्वी मिळाल्या असाव्या असें सन १८८६ सालच्या संस्थानच्या तंट्याच्या कोर्टाच्या निकालावरून दिसून येतें. सदर चालत आलेल्या सनदा मराठे व पेशवे यांनीं मान्यकरून त्या पुन्हा नव्या करून देण्यांत आल्या पुढें आपल्या दयाळू सार्वभौम इंग्रज सरका-

रानें इ. स. १८५९ सालीं इनामकमिटी कडून आपली मान्यता दर्शवून त्या चालू केल्या. हीं गांवें १७ । १८ असून त्यांचें एकंदर उत्पन्न सुमारें ६५ हजाररुपयांचें आहे. चिंचवड हें संस्थानचें मुख्य ठिकाण असून त्याचे ताब्यांत मोरगांव, थेऊर व सिद्धटेक या तीन ठिकाणचीं देवस्थानें आहेत. येथील खर्च याच उत्पन्नांतून होत असून या तिन्हीगांवीं संस्थानचे कारकून वगैरे नौकर आहेत. त्यांचे देखरेखी खालीं तेथील सर्व व्यवस्था होते. पूर्वीं महाराजांकडे त्यांच्या हद्दींतील सर्व दिवाणी फौजदारी अधिकार होते. गांवांत जकातीचीं नाकीं असून त्यांचें उत्पन्न संस्थानांत जमा होई. महाराजांनीं एक टाकसाळ बांधून नवीन चिंचवडी नाणेंही पाडून सुरू केलें होतें. तें चिंचवडी रुपया ह्मणून प्रसिद्ध आहे तें हल्लीं कोठें दिसून येत नाहीं. हें सर्व पुढें गव्हर्नमेंटनें कायद्याप्रमाणें महाराजापासून घेतलें. हल्लीं यापैकीं कांहींच प्रकार उपलब्ध नाहीं. इ. स. १७४४ सालीं श्रीधरणीधर महाराजांनीं सातारकर शाहू महाराज व पेशवे सरकार यांजकडून एकंदर उत्पन्नाची व्यवस्था करून घेतली व संस्थान खर्च आणि भाउबंदाचा प्रपंचखर्च अगदीं निराळा केला. तेव्हां पासून संस्थानास थोडें निराळेंच स्वरूप आलें. त्यावेळीं जी व्यवस्था ठरविली तीच हल्लींही चालू आहे. सन १८९१।९२ सालीं रिव्हिजन सर्वे होऊन संस्थानचें

उत्पन्न सुमारें ५३५०० रु. झालें त्यांत इंग्रजसरकार देणें १२६९० व इतर खर्च वजा जातां ३४००० रुपये निवळ संस्थानाकडे जमा होतात. यांतून स्कीम प्रमाणें २८००० रु. पर्यंत संस्थानचा दरसालचा खर्च होत असतो. असो. इ. स १८५२ पर्यंत सुरळीत व्यवस्था चालली होती. त्यासालीं पट्टाभिषिक्त महाराज अल्पवयी वारल्यामुळें सासु सुनांनीं वेगवेगळाले दत्तकपुत्र घेतले त्यामुळें तंटा सुरू झाला. पूर्वापार चालत आलेला क्रम बिघडला व संस्थानास कर्ज झालें. तेव्हां कोर्टांत दावा चालून अखेर नामदार हायकोर्ट मुंबई यांनीं निकाल करून संस्थानचे व्यवस्थेकरितां सन १८९० ता. ३० जुलै पासून तीन पगारी ट्रस्टी नेमिले. नेमिलेल्या ट्रस्टींची नेमणूक तहाहयातची आहे. चीफ ट्रस्टी वडील घराण्यांतील, नंबर २ चे ट्रस्टी धाकट्या घराण्यांतील व तिसरे नंबरचे कोणी तरी संभावीत गृहस्थ असे आहेत; खर्चाचे व्यवस्थेकरितां स्कीम ठरवून दिलें आहे त्यांत ठरविल्या प्रमाणें खर्च करितात. कोणत्याही कामाचा निकाल त्रिवर्गांनीं मिळून एक विचारानें करावयाचा असतो. मतभेद झाल्यास चीफ ट्रस्टीस एकमत जास्त देण्याचा अधिकार आहे संस्थानांत कारकून, शिपाई, आचारी पाणके, मशालजी, गडी माणसें वगैरे पुष्कळ नौकर आहेत. (गपचूप या नांवाच्या पाटील अधिकाऱ्याशिवाय) हे सर्व पगारी आहेत. वंशपरंपरा

वतनदार नाहींत. या सर्वांवर देखरेख ट्रस्टींची असते परंतु चीफट्रस्टी यांस येथील सर्वच व्यवस्था पाहावी लागते. ते संस्थानचे मालकच आहेत असें ह्मटलें असतां चालेल.

श्रीमंगलमूर्तीस नव्या जुन्या मिळालेल्या. देणग्या व इनामी गांवें.

पुणें जिल्ह्यांतीलः—

१ चिंचवड. २ चिखली. ३ चिंचवली. ४ चऱ्होली. ५ भोसरी. ६ माण. ७ बाणेरे. ८ मोरगांव. ९ थेऊर.

कुलाबा जिल्ह्यांतीलः— १ चिंचवली. २ खारनारिंगी.

नगर जिल्ह्यांतीलः— १ तांदळी.

या गांवचें उत्पन्न खुद्द संस्थानाकडे जमा होते.

भाऊबंद मंडळीकडे खालील गांवें इनाम आहेत.

पुणें जि०:— १ औंध. २ रावेत. ३ वाकड. ४ आंबी.

नगर जि०:— सिद्धटेक.

देणग्या देणारांची नांवें. नांवें देणग्या.

१ किबेइंदूर .... हंड्या, झुंबरें, पाट, भांडीं हिऱ्याचा चंद्र.

२ लदाइब्राहिम .... झुंबर.

३ गुप्ते रा. स. व लक्ष्मीबाई. .... रुप्याचें ताट.

४ सातारकरमहाराज .... गजनीचे पडदे १० व सतरंजी

५ पितळे. .... रुप्याची छत्री.

आनरबेल नामदार गणपत सदाशीव राव यांनीं सन १८८६ ते १८९७ पर्यंत संस्थान तर्फे निरपेक्ष व उदार बुद्धीनें कोर्टाचीं सर्व कामें मोफत चालविलीं व फीचा स्वीकार न करितां ती श्रीचरणीं अर्पण केली.

श्रीमंगलमूर्ती देवस्थानचा नित्यक्रम.

१ सकाळीं पूजा, अभिषेक होत असतां गवयाचें गाणें; नंतर सर्वपूजा, पोषाख, मग पहिला नैवेद्य. पुढें पुराण नंतर दुसरा नैवेद्य. दुपारीं:—पुराण. सायंकाळीं गवयांचें गाणें; नंतर नैवेद्य, धूपार्ती, पंचारती, व शेजारती (पंचपदि). पंचारति महाराज धरितात.

२ श्रीमोरयाचे देउळाचाही असाच क्रम आहे. फक्त सकाळचें पुराण व गवयाचें गायन हें मात्र नसतें. जर महाराज स्वतः तेथें हजर असतील तर ते पंचारती धरितात; नाहीं तर पुजारी ती लावून खालीं ठेवितात. ती दुसऱ्यास धरण्याचा अधिकार नाहीं. वृद्धि अगर क्षय यांपैकीं कोणतीही अडचण आली तरी पंचारती महाराजांनींच ओंवाळिली पाहिजे. आणि ह्मणूनच त्यांना कोठेंही गांव सोडून जातां येत नाहीं. गेल्यास रात्रौ श्रीमंगलमूर्तींच्या धूपार्तीचे वेळीं पंचारति ओंवाळण्याकरितां यावेंच लागतें. हा अधिकार येथें विशेष आहे.

३ दर महिन्याचे शुद्ध व वद्य चतुर्थी, एकादशी आणि सणाचे

दिवस या दिवशीं महापोषाख घालतात. वद्य चतुर्थीचें माहात्म्य यथें विशेष आहे. बहुतेक सर्व लोक हें संकष्टीचें व्रत (उपवास) करितात. रात्रौ संस्थानचे वाड्यांत ब्राह्मणांस मुक्तद्वार भोजन मिळतें. ब्राह्मणेतर हिंदू व मुसलमान देखील चतुर्थीचा उपवास करितात हें नवल आहे. श्रीमोरयाची प्रक्षालन पूजा दररोज दुपारीं करितात.

द्वारयात्रा.

१ मोरगांवीं श्रीमंगलमूर्तीचीं द्वारें चारी दिशेला स्थापन केलेलीं आहेत. तेथील रहिवासी त्यांची चारदिवस भाद्रपद महिन्यांत शु॥१ पासून ४ पर्यंत यात्रा करितात. तद्वत् त्याचीं अंशभूत द्वारें प्रसादमूर्ती चिंचवड येथें श्रीमोरयागोसावी यांनीं आणून वासकेला तेव्हां पासून स्थापन केलीं आहेत तीं पूर्वद्वार (पिंपरीरस्ता) मांजराई व रमारमेश; दक्षिणद्वार (वाकड रस्ता, आसराई व उमामहेश; पश्चिमद्वार (तळेगांवरस्ता) ओसराई व रतिकंदर्प; उत्तरद्वार (आकूर्डीरस्ता) मुक्ताबाई व महीवरा; या प्रमाणें चार देवता चारदिशेला स्थापन केल्या. यांची यात्रा श्रावणमासीं शुद्ध १ पासून चारदिवस चारठिकाणीं जाऊन करितात. पट्टाधिकारी महाराज गणमंडळी व भाऊबंद मंडळी आणि इतरजन ह्यांसह श्रीमोरयाचें दर्शन घेऊन तासे वाजंत्री पांढऱ्या पताका ५ व पांढरी छत्री चोपदार रुप्याची काठी वगैरे घेऊन थाटानें सोंवळ्यानें निघतात. तेथें गेल्यावर पूजा व

पदें होऊन परत गांवाजवळ ठरलेल्या ठिकाणीं येतांच, धूपार्ती करीत करीत श्रीचिंतामणि महाराजांचे देवालयापुढें उभे राहून संपवितात. नंतर परत वाड्यांत जाऊन मुक्तद्वार ब्राह्मणभोजन होतें. याप्रमाणें तीनदिवस तीनद्वारें करून येतात. चवथे दिवशीं नित्यक्रम होऊन श्रीमोरयागोसावी, महादेव व सप्तपुरुष ह्या सर्वांस कोरे धोतरजोडे नेसवून पूजा होमहवन करितात. धूपार्ती चालू असतांच छत्रीवाला व गुरव ह्यांस पागोटें बांधितात. आरती करणारास मध्यंतरीं सुंठसाखर वांटतात, शवटीं खिरापत वांटून वाड्यांत भोजनास जातात.

भाद्रपदीची यात्रा.

१ भाद्रपद शु॥ १ स सकाळीं श्रीमंगलमूर्तींची पूजा नैवेद्य करून त्यांस सिद्धिबुद्धि सहित डब्यांत प्रासादून ठेवून पालखींत घालितात बरोबर उपाद्ध्ये, गवई, शास्त्री, पुराणीक, आश्रित, गणमंडळी यात्रेस निघालेले ग्रामस्थ आणि भाऊबंदमंडळी असते. पालखी ब्राह्मण मंडळीं उचलून घेतात बरोबर तासे, वाजंत्री, छत्र्या, पताका, निशाणें, अबदागिरी, चांदीच्या काठ्या, चवऱ्या, मोरचेल, डंका, नगारखाना, थाळ[illegible] ...ची पटका, भगवें निशाण, दिवटीवाले वगैरे घेऊन समारंभानें श्रीमोरयाचे देवळांत येऊन त्यांची प्रार्थना करून जमलेल्या मंडळीस दाळीचा प्रसाद वाटून गांवाबाहेर खडक वेहेरें या ठिकाणीं जाऊन उभे राहतात. तेथें प्रसाद पुन्हा वांटितात नंतर पांच-

विण्यास आलेली ग्रामस्थमंडळी परत गांवीं जातात व यात्रेस देवाच्या पालखीबरोबर येणारे सर्व लोक पुढें रवाना होतात. संस्थान तर्फें मंडळीस बसण्याकरितां व सामाना करितां बैलगाड्या घेतलेल्या असतात. अन्नसत्र सदावर्त वगैरे सर्व बरोबर असतें. गणमंडळींनीं स्वतःचीं घोडीं घेतलीं असतील तर त्यांस चंदी वैरण मिळते. पहिला मुक्काम पुणें येथें होतो. वाटेनें लकडीपुलावर तळेगांवकर दाभाडे यांजकडून किनखाबी पताक व पूजासामुग्री येते. ती श्रीस अर्पण केल्यावर त्यांस प्रसाद मिळतो. नंतर पालखी समारंभानें मुक्कामास जाते. तेथें आल्यावर श्रीची धूपार्ती करून लिंबलोण उतरितात. नंतर पंचारती होते. भोजन झाल्यावर विश्रांती घेऊन पहाटेस निघून दुसरा मुक्काम सासवड येथें करितात. वाटेनें अंबी येथें कऱ्हाबाईचें स्नान श्रीस घालून पूजा अर्चा भोजन होतें. व रात्रौ मोरगांवीं पालखी जाते मोरगांवकर छबीना घेऊन श्रीस सामोरे येतात व मोठ्या थाटानें गांवांत मिरवीत घेऊन जातात. धूळदर्शन वगैरे झाल्यावर श्रीस भांडारगृहांत ठेवितात. नंतर मूर्तींसह चतुर्थीस श्रीमंगलमूर्तीची महापूजा होते. त्यावेळीं रेशमीधोतरजोडा महादक्षिणा ६० रुपये श्रीस अर्पण करितात नंतर महानैवेद्य होतो. व सर्वत्रांस प्रसाद मिळतो. पंचमीचे दिवशीं श्रीस पालखींत घालून पोळींत नेतात. तेथें पूजा नैवद्य होऊन

सर्वत्रास भोजन प्रसाद मिळतो. हा समारंभ फारच प्रेक्षणीय होतो. ब्राह्मणभोजन संपताच मुद्दाम तयार केलेलें प्रसादअन्न इतर जात व अंत्यज येऊन लुटतात. यावेळीं तेथें स्पर्शास्पर्शाचा दोष धरीत नाहींत. येथें कोणास बंदी नाहीं; परंतु बंदोबस्त मात्र ठेविला असतो. षष्ठीचेदिवशीं निघून वाटेनें जेजूरीचे खंडेराय व सप्तमीस शेवरीची यमाई या देवांचीं दर्शनें श्रीमंगलमूर्तीस पुढें ठेवून घेतात. सप्तमीस सासवड येथें श्रीनारायण महाराज यांची पुण्यतिथि होते. तेथून अष्टमीस नवमीस हडपसर अगर उरळी येथें मुक्काम करून नित्यक्रम होतो, रात्रौ भांबुर्डे येथें मुक्काम करून दशमीस रात्रौ चिंचवड येथें येतात. या यात्रेस १० वे दिवशीं चिंचवड येथें परत यावेंच लागतें. पालखी जातांना व येतांना ब्राह्मण वाहकांनींच न्यावी लागते इतरांस (कोणत्याही जातीस) मनाई आहे. पालखी चिंचवडाजवळ येतांच मंडळी सामोरी जाऊन श्रीमंगलमूर्तीस वाजत गाजत गांवांत आणतात; नंतर दुसरे दिवशीं श्रींची अर्चा वगैरे होते व देव पूर्वस्थलीं बसवितात.

श्रीमोरयागोसावीमहाराज यांची पुण्यतिथि.

मार्गशीर्ष वद्य ३ ते ६ पर्यंत उत्सव.

१ ह्या चारदिवसांत श्रीमंगलमूर्तीची स्वारी संस्थाननें बांधले-

ल्या भव्य व सुंदर मंडपांत आणून सिंहासनावर अधिष्ठित करितात मंडपाची रचना व बांधणी फारच मनोहर असून ह्या उत्सवाचे दिवसांत तो हंड्या झुंबरें शामदानें तसबिरा मखर वगैरे लावून सुशोभित करतात. मंडपासभोंवतीं गजनीचे पडदे सोडले असल्यामुळें फारच रम्य देखावा दिसतो मंडपांतील तबकडींत बिछायत गालिचे वैगेरे घालून बिछावतात. सकाळींच श्रींची पूजा सुरू होते. यावेळीं संस्थानचे आश्रित गवयाचें गाणें सुरू होतें नंतर उत्सवास आलेले इतर गवई व नायकिणी यांचीं गायनें होतात. तीं श्रीस महानेवैद्य होईपर्यंत सुरू असतात. महानैवेद्यानंतर गायन बंद होतें. श्रीस सुवासिक पुष्पहारांनीं व उंचीं वस्त्रें दागिने यांनीं विभूषित करितात. सायंकाळीं रोषनाई करून कीर्तनाकरितां मुद्दाम आणविलेल्या हरिदासांचें कीर्तन सुरु होतें. नंतर धूपारतीं वगैरे नित्य विधि होऊन श्रीस शेजारती होते.

२ श्रीमोरयाचे देवालयानजीक दोहीं बाजूंस पटांगणें असल्याचें मागें वर्णन आलेंच आहे. त्यांत दक्षिण बाजूचे पटांगणांत विस्तीर्ण मंडप उभारून त्यांत पाकशाळा व भोजनगृह करितात. उत्तरेकडील पटांगणांत मेवामिठाईवाले, बुकसेलर, माळी, हलवाई स्टेशनरी वगैरे लोकांचीं सामानांनीं भरलेलीं दुकानें रस्त्याच्या दुतर्फाबाजूस बसतात. पूर्व बाजूस

मठांत मुख्य कोठी असून कोठीपुढें भाजी तोडण्याचा कारखाना सुरू असतो. कोठीचे दक्षिण बाजूस तात्कालिक ऑफिस करून त्यांत ट्रस्टी व कारकून बसून कामाची देखरेख करितात. उत्सवाकरितां आचारी, पाणके, वाढपे, बत्तीवाले वगैरे मंडळी आणितात. सर्व देवालयास रंगसफेती करून चित्रें वगैरे काढितात. श्रीमोरयासही श्रीमंगलमूर्तीं प्रमाणें पुष्पहारांनीं महापूजा बांधितात. श्रींचा महानैवद्य झाल्यावर ब्राह्मणभोजन सुरू होतें. तीन दिवसपर्यंत ब्राह्मणसमुदाय वाढत जाऊन षष्ठीचे दिवशीं तो एकंदर ८।१० हजारपर्यंत होतो व रात्रौ ८ वाजेपर्यंत भोजनपंक्ति सुरू असतात.हा दिवस मुख्य असल्यानें पुष्कळ लांब लांबचे लोक या उत्सवाकरितां सकाळपासून येऊं लागतात. त्यामुळें रेलवे कंपनीस स्पेशल गाड्या सोडाव्या लागतात. मनुष्यांची रांग स्टेशनापासून गांवापर्यंत सारखी लागून राहिली असते. गांवांत घरोघर पाहुणे मंडळी आलेली असल्यानें प्रत्येक घरीं मंगलकार्य असल्याप्रमाणें एकच गर्दी उडते. सर्व गांव अगदीं गजबजून गेल्याप्रमाणें दिसतो. कोणी देवदर्शनास जातात, कोणी पवना नदीचा चित्ताकर्षक देखावा पाहात घाटावर बसतात, कोणी गानलोलुप श्रीमंगलमूर्तींचे सभामंडपांत गायनाचे आलाप श्रवण करितात तर कोणी भोजनमंडपांत जाऊन आपलीं व

आपल्या इष्टमित्रांचीं भोजनपात्रें धरून प्रसाद मिळण्याची वाट पाहत बसतात असा एकंदर थाट उडालेला एकसमयावच्छेदेंकरून दिसून जो आनंद होतो तो खरोखरच अवर्णनीय, अतर्क्य व कल्पनातीत आहे. दुपारीं घाटांवर श्रीमोरयाचेपुढें कीर्तन सुरू असतें.

३ ग्रामस्थ मंडळीस या चार दिवसांत ग्रामजोशामार्फत (भोजनाचें) पहीपाहुण्यासुद्धां निमंत्रण असतें. संस्थानतर्फे निमंत्रित मंडळीची सर्व व्यवस्था संस्थान ठेवितें अनिमंत्रित मंडळी आपापल्या सोईनें व्यवस्था करितात. ब्राह्मणेतर मंडळीस त्यांनीं इच्छा दर्शविली असतां कोरडा सिदा (प्रसाद) मिळतो. भोजनप्रसाद मिळणेची सर्वत्र रीति दिसत नाहीं.

४ संस्थानतर्फे शक्य तेवढी व्यवस्था व बंदोबस्त होतो. परंतु अतिशय समुदाय जमत असल्यानें सर्वत्रांस सारखा व्यवस्थित प्रसाद न मिळाल्यास त्यांत मोठा दोष उत्पन्न होतो असें नाहीं. हा किरकोळ दोष खेरीज करून एकंदर समारंभ फारच वर्णनीय होतो. उत्सवाची व्यवस्था पाहण्यासाठीं कधींकधीं जज्ज येत असतात. तृतियेपासून षष्ठीपर्यंत जमलेले गवई, गाणारणी कथेकरी, पुराणीक, शास्त्री, वैदिक, भिक्षुक इतर गुणिजन ह्यांच्या हजेऱ्या श्रीजवळ होतात. त्यांची संभावना संस्थान तर्फे नेमलेल्या तज्ञ (आश्रित) लोकांच्या मार्फतीनें होते. वर्षासनें

वार्षिक देणग्या-वगैरे संस्थानांतून दिल्या जात नाहींत. सारांश असा अवर्णनीय प्रासादिक उत्सव फारच थोड्या ठिकाणीं होत असेल. आज ३१४ शेंवर्षें हा सतत अखंड चालत असल्यानें याचें चिरस्थायित्व व श्रीमोरयांचें महद्भाग्य दिसून येतें. व तो पहाणारांस व ऐकणारांस महानंद वाटून त्यांची पूज्यबुद्धी झाल्याशिवाय खास राहत नाहीं. या लेखकानें आज तीन वर्षें सतत अनुभव घेतल्यामुळें त्याची खात्री होऊन त्याचें निदर्शक हें आजचें चरित्र बाहेर आलें आहे. असें ह्मणण्यास त्याला बिलकूल दिक्कत वाटत नाहीं. शेवटीं आमच्या रसिक, भाविक, व सदय वाचकांस या उत्सवास ऐकवेळ तरी येण्याविषयीं अत्याग्रह पूर्वक विनंति करितों कीं, महाराज आपण येथें येऊन श्रीचे दर्शनप्रसादाचा लाभ घेऊन आत्मप्रत्यय पहावा.

माघीयात्रा.

१भाद्रपदीच्या यात्रेप्रमाणें सर्व व्यवस्था असते यावेळीं स्वारी पालखींत न जातां घोड्यावरून जाते. ती प्रथम थेरगांव रस्त्यानें पुण्यापर्यंत गेल्यावर भाद्रपदीच्या मुक्कामाप्रमाणें मोरगांवीं जाऊन पोंचते. तेथें सर्व विधि यथाक्रम होतो परत येतांना थेऊर येथें श्रीचिंतामणिचे दर्शनास जावें लागतें. तेथें प्रथम धूळ भेटीचे वेळीं श्रीमंगलमूर्तींचा डबा बाहेर ठेवून सड्यानेंच श्रीचें दर्शन घ्यावें लागतें. महाराजांस गुरव प्रसाद

देतां. रात्रौ धूपारती वगैरे होते. नंतर चिंचवडास शु. १० स परत येतात. या स्वारीच्या वेळीं जरी कांहीं दिवस जास्त लागले तरी चालतात पण भाद्रपदीच्या वेळेस दहावें दिवशीं चिंचवड येथें परत यावेंच लागतें.

गणमंडळी.

१ उत्सवप्रसंगीं व यात्राप्रसंगीं जी नेमलेली मंडळी आपापलीं कामें हक्कानें करीत असतात त्यांस गणमंडळी ह्मणतात. त्यांचीं नांवें.

नांवें.	कामगिरी.
गपचूप (पाटील)	नैवेद्य वाढून नेणें
रेडे	काठ्या धरणें.
चांदखेडकर, रावेतकर, खोले, शिवणेकर,	चवरी धरणें. छत्री मोरचेल धरणें
नाणेकर तेली लवळेकर ब्राह्मण	मशाल दिवटी धरणें.
भोईर (सातारकर तर्फे)	छत्री धरणें.
सोनार	अबदागिरी.
रबडे, गोऱ्हे, कऱ्हाडकर, व ग्रामस्थ	पालखी वाहणें.
रावेतकर, पिंपरीकर, चिखलीकर,	पाकसिद्धि, व वाढप.
पाखंडेकर	फरशांकुश धरणें.

२ येणेंप्रमाणें मंडळी नेमल्याप्रमाणें कामें बिनहरकत करीत

असतात. तथापि आणखीही कोणी यात्रे बरोबर निघालेली मंडळी स्वेच्छेनें श्रींचीं कामें व पालखी वाहून नेण्याचें काम मोठ्या हौसेनें व भक्तीनें करितात.

कोठारेश्वर.

श्रीमंगलमूर्तींची स्वारी यात्रेकरितां वाड्याबाहेर निघाल्यावर ज्या मूर्तीचें पूजन करितात तिला कोठारेश्वर अशी संज्ञा आहे. हें नांव पडण्याचें कारण श्रीमोरयागोसावी मृत्तिकेचा गणेशपार्थींव करून ज्या जागेवर विसर्जन करून टाकीत असत त्या जागीं ही मूर्ती स्थापन केली हें होय. ही स्थापना श्रावण शुद्ध ६ शके १७७२ रोजीं केली. ही मूर्ती श्रींची स्वारी परत येईपर्यंत उघडी ठेवितात. दहा दिवस ह्याच मूर्तींची पूजा अर्चा नैवेद्य वगैरे करितात. यावेळींही येथें अन्नसत्र सदावर्त वगैरे सर्व प्रकार चालू असतात. श्रींची स्वारी परत आल्यावर कोठारेश्वरास पडदा सोडून आच्छादून ठेवितात श्रींची व त्यांची भेट होत नाहीं.

माघीयात्रेस ही याचप्रमाणें दहा दिवस कोठारेश्वराची पूजा सुरू असते.

श्रावण शुद्ध ६ स यांचा वाढ दिवस असल्यमुळें श्रीमंगलमूर्तीस न उठवितां (जागृत न करितां) कोठार उघडून त्यांची पूजाअर्चा होऊन मग श्रीस जागृत करून श्रींचा

नित्यविधि होऊन श्रीस पुन्हा आपल्या जागेवर प्रस्थापित करितात. उत्सव प्रसंगीं देव मंडपांत आणिल्यावर ४ दिवस यांची पूजा होते. नित्यपूजा मागले बाजूनें पाठीवर असते.

श्रीविनायकदेवमहाराज.

श्रीचिंतामणमहाराजांचे हे तृतिय पुत्र होत. हे काका महाराज या नांवानें प्रसिद्ध आहेत. यांचे वडीलबंधु श्रीनारायण-महाराज हे यावेळीं संस्थानाधिपति होते. एकेवेळीं त्यांनीं श्रीकाकामहाराजास श्रीमंगलमूर्तींचीपूजा करण्यास व दुर्वा वाहण्यास प्रतिबंध केला. त्यावरून श्रीविनायकदेव रागावून थेऊर येथें गेले. व त्यांनीं श्रीमोरयांनीं अनुष्ठान केलेल्या जागेच्या संन्निध मूळगंगेंत उभेंराहून अनुष्ठान केलें. एकविसावे दिवशीं श्रीचिंतामणि प्रसन्न होऊन वर माग ह्मणून ह्मणाले. तेव्हां विनायक देवांनीं श्रीमंगलमूर्तींची पूजा करण्याचा अधिकार मला असावा अशी विनंति केली. तेव्हां श्रीनीं त्यांस त्यांची पुण्याई व नारायणमहाराजांची पुण्याई दोन डोंगरांच्यारूपानें दाखविली. व तुझीपुण्याई त्या मानानें अगदींच थोडी ह्मणून तुझा अधिकार पूजेस पोंचत नाहीं. आतां तुझ्याकरितां मीच स्वतःप्रसाद-मूर्तीनें येतो. ती घेऊन तिची पूजा तूं करित जा, असें त्यांस सांगितलें. तें देवांनीं मान्यकरून श्रींची अनन्यभावें स्तुति केली नंतर श्रीनीं तथास्तु असें ह्मणून ते अंतर्धान पावले.

दुसरे दिवशीं विनायक देवांच्या ओंजळींत स्नान करीत असतां श्रीचा तांदळा आला. तो त्यांनीं भक्तीनें घरीं आणिला. त्यावेळेस जिंजीच्या महाराजास श्रीचिंतामणिमहाराज यांचा दृष्टांत झाला कीं, मी चिंचवड येथें विनायक देव यांच्या घरीं अवतरलों आहें तरी तूं त्यास इनाम + देऊन सेवा कर. त्याप्रमाणें त्यांनीं थेऊर येथें येऊन अनुष्ठान समाप्तीचे वेळीं हजर राहून महाराजास पालखींत घालून चिंचवडास पोंचविलें. अनुष्ठान करीत असतां काकामहाराजांस जलचरांनीं त्रास देऊन त्यांच्या शरीराचें मांसही खाल्लें होतें. तथापि ते एकनिष्ठ डगले नाहींत त्यांस बरें होण्यास पुष्कळ दिवस लागले. यांना प्रसादमूर्ती घेऊन भाद्रपदमासीं व माघमासीं थेऊर येथें यात्रेस जावें लागे तोच क्रम त्यांच्या वंशजांनीं पुढें चालविला आहे. त्यांचेंही एक मध्यम प्रतीचें नंबर २ चें संस्थानच आहे. देवस्थानची व्यवस्था व नित्यक्रम पूजाअर्चा वगैरे नंबर १ चें संस्थानचे पद्धतीप्रमाणें आहे. यांना मोरगांवीं यात्रेस जावें लागतें. थेउरास मात्र हे गेल्याशिवाय उत्सव सुरू होत नाहीं.

श्री काकामहाराज यांनीं माघ वद्य १० स देहविसर्जन केला त्यांच्या दहनभूमीच्या जागीं गणेशप्रतिमा उमटल्यामुळें

+ जांबें, हिंजवडी, थेऊर, उरळींदेवाची हीं चार गांवें इनाम करून दिलीं आहेत. पैकीं थेऊर संस्थान नंबर १ कडे हल्लीं गेलें आहे.

मुख्य देवालयाचे उत्तर बाजूस समाधि वृंदावनरूपानें बांधिली आहे.

यात्राः—दरवर्षी श्रावण शु. ११२ या दिवशीं सर्व जामानिमा देवदेवस्थान घोड्यावर घेऊन मोठ्या थाटानें वाजत गाजत मंडळीसहवर्तमान थेऊर येथें यात्रेस जाण्याकरितां निघतात. गांवाबाहेर किंचित्‌काल थांबून मंडळीस प्रसाद वगैरे देऊन परत करितात व स्वारी पुढें मार्गक्रमण करिते. पहिला मुक्काम हडपसरास होऊन दुसरे दिवशीं थेऊर येथें पोचतात. थेऊरकर श्रींस सामोरे येऊन मोठ्या समारंभानें गांवांत घेऊन जातात. तेथें गेल्यावर त्यांना १ कोरेगांव २ आळंदी चोराची ३ मांजरी ४ ह्मातारजीचें देऊळ या चार ठिकाणीं द्वारयात्रेस जावें लागतें. नंतर नित्यपूजा धूपातीं वगैरे विधि होतात. अनुष्ठान, पोषाख महापूजा, महानैवेद्य, जोंधळ्यांच्या लाहीपिठाचा प्रसाद वगैरे सर्व विधि यथाक्रम होऊन भाद्रपद शु॥ ८।९ पर्यंत चिंचवड येथें परत येतात. चिंचवडकर मंडळी सामोरे जाऊन गांवाबाहेरून श्रीच्या स्वारीस वाजतगाजत आणून घरीं पोचवितात. प्रसाद वगैरे मिळाल्यावर लोक आपापले घरीं जातात.

माघी यात्रेचाही थोड्या बहुतमानानें असाच क्रम आहे.

श्रीविघ्नेश्वरमहाराज-संस्थान नंबरः २

श्रीनारायणमहाराजांचे हे द्वितीय पुत्र होत. यांस अप्पा-

महाराज असें ह्मणत असत. हेही सत्पुरुष असून महान् विद्वान् दशग्रंथी ब्राह्मण होते. यांच्या विद्वत्तेची कीर्ति काशी-पासून रामेश्वरपर्यंत पसरली होती. यांची विद्वत्ता पाहून यांच्या पित्यास—श्रीनारायणमहाराजांस—फार धन्यवाटे. "जो तोषवी स्वजनकास सुपुत्र तोच" ह्या उक्तीप्रमाणें ते खरो-खरच सुपुत्र होते आणि ह्मणूनच त्यांनीं श्रीविघ्नेश्वर महाराजांस आपली स्वतःची पूजार्ह गणेशमूर्ती प्रसाद ह्मणून दिली. यांचा काल त्या मूर्तीचें भजन पूजनांत व विद्या व्यासंगांत नेहमीं जात असे. त्यामुळें हें यांचें एक लहानसें संस्थान व देवस्थान बनलें यांसही विद्येच्या जोरावर मोंगल व मराठे यांजकडून आकुर्डी व साष्टें अशी दोनगांवें इनाम मिळालीं शिवाय चार गांवचा मोकासाही मिळाला. त्यामुळें यांचे देवस्थानचा खर्चेंवेच उत्तम प्रकारें चाले, सदर गांवें हल्लीं त्यांचे वंशजाकडे वहिवाटीस असून खर्च वगैरे त्याच उत्पन्नांतून होत असतो. यांना भाद्र-पदमासीं व माघमासीं त्याप्रसाद मूर्तीस घेऊन मोरगांवीं यात्रेस जावें लागे. तोच क्रम त्यांच्या वंशजांनीं पुढें चालविला आहे. संस्थान नंबर १ प्रमाणें यांचे सर्व मानमरातब व रीतिरिवाज आहेत. फक्त हे धाकट्या घराण्यांतील असल्यानें वडील घरा-ण्यांतील अधिकाऱ्यांच्या मागून यांस सर्व व्यवस्था करावी अ-शी श्रीची आज्ञा आहे. यांनीं स्थापन केलेलें देवालय

हल्लीं श्रीमंगलमूर्तींच्या वाड्यानजीकच आहे. यांची समाधी श्रीमोरयांच्या देवालयाच्या दक्षिण अंगास पटांगणांत आहे. देवकुळांत यांनींच कायतो प्रत्यक्ष चतुर्थाश्रम स्वीकारला होता. व यांनीं स्वहस्तें जे कित्येक वैदिक ग्रंथ लिहून तयार केले आहेत त्यांपैकीं पूर्वीं न झालेला असा 'क्रम' या विषयाचा ग्रंथ लिहिला आहे तो अद्याप त्यांचे वंशजांजवळ आहे.

प्रकरण १३ वें.

उपसंहार

" जे कां रंजले गांजले । त्यासि ह्मणे जो आपुले ।
तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥ "

(श्रीतुकाराम)

१ श्रीमोरयागोसावी यांचा चरित्र भाग संपूर्ण झाला. त्यांनीं बालपणापासून समाधि घेई पर्यंत जी चमत्कृति करून दाखविली ती आम्हां मानवांस अगम्यच होय. ऐहिक आणि पारमार्थिक कल्याण त्यांनीं कशा रीतीनें साधलें हें त्यांच्या चरित्र वाचनानें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. शेंकडों व्याख्यान पुराणांनीं जें काम होत नाहीं तें सत्पुरुषांचें आचरण पाहून होतें. 'ऐकून वळत नाहीं इतका मनुष्य पाहून वळतो' श्रीमोरयांची सोसिकता व क्षमाशीलता अलौकिक असल्यामुळें निंदक व छलक यांचें त्यांच्या पुढें कांहीं चाललें नाहीं. अपकार करणाऱ्यावरही उपकार करणारे महात्मे

धन्य होत. श्रीमोरयांची भगवद्भक्ति इतकी दृढ होती कीं, श्रीमंगलमूर्ती प्रत्यक्ष त्यांचे घरीं चालून आले:--

२ " सर्वमेकं अद्वितीयं ब्रह्म " हें जो पुरें ओळखीत होता, जो प्रपंची असूनही नाहींसारखा होता; जो जगाचें भासमान् पूर्णपणें ओळखित होता ज्याची कृति अखंड-दंडायमान बनल्याप्रमाणें होत असे. असा तादात्म्य पावले-ला व तद्रूप झालेला मोरया प्रत्यक्ष श्रीमंगलमूर्तीचा अवतार-च होता असें जे भाविक लोक आज म्हणतात, त्यांत आश्चर्य तें कसलें ? ते सुखाच्या पाशांत कधीं सांपडले नाहींत. शरी-राचे चोजले करणें व विषयसुखलुब्ध होणें हें तर त्यांस विषासारखें वाटत होतें. त्याचें कारण इतकेंच कीं, या गोष्टी आपल्या इष्ट हेतूच्या आड येतील आणि याच कारणानें त्यांत बिघाड होईल. हें त्यांनीं पूर्णपणें जाणलें होतें. ते इतके निग्रही व निश्चयी असत कीं विघ्नें कधींहि त्यांच्या प्रयत्नाच्या आड आलीं नाहींत. निराशेनें त्यांचें धैर्य कधींही डळमळलें नाहीं. दुःखक्लेशाच्या योगानें त्यांच्या चित्तस्वास्थ्यांत कधींहि चलबिचल झाली नाहीं. लोहचुंबकाप्रमाणें त्यांचे आंगीं आकर्षक शक्ति असल्यामुळें ते प्रत्यक्ष आत्मिक चुंबकच होते. हें सामर्थ्य ईश्वरीप्रसाद आंगीं असल्याखेरीज मुळींच येत नाहीं. सारांश:--असले श्रीमोरयासारखे दिव्य हिरे कधीं

काळीं जन्मास येतात व तेच सन्मणिमालिकेंत चमकले जातात.

३ श्रीमोरयांची थोरवी जितकी वर्णन करावी तितकी थोडीच होणार आहे. सूर्याचें तेज जसें अवर्णनीय तसाच त्यांचा चरित्रभाग होय. त्यांच्या चरित्रापासून आपण जो बोध घ्यावयास पाहिजे तो जर आपण घेतला नाहीं, तर खरोखर आपण अगदीं भाग्यहीन आहों असेंच समजलें पाहिजे. त्यांचा अवतार ह्मणजे केवळ आपल्या भाग्योदयासाठींच तो जर आपण थोडच्याप्रमाणानें कां होईना, साधला नाहीं तर आपल्यासारखे आत्मघातकी आपणच; ह्याकरितां आपण तो आपल्या स्वतःच्या उन्नत्यर्थ अवश्य साधलाच पाहिजे ह्मणजे आपलें इहलोकीं व परलोकीं कोटकल्याण झाल्याशिवाय खास राहणार नाहीं. शेवटीं ज्या कृपाघन मंगलमूर्तींनीं आपल्या कृपा प्रसादानें हा श्रीमोरयांचा चरित्रभाग माझ्या हातून परिपूर्ण करून घेतला त्यांचें अनन्यभावें स्मरण करून हें चरित्र त्यांचे पदीं समर्पण करितों. श्रीमंगलमूर्ती मोरया ! !

प्रकरण १४ वें.

श्रीमोरयांचीं पदें आरत्या.

पद १ लें.

प्रथम आरंभीं ध्यातों चिंतामणि देव ॥ रहिवास मूळ

गंगे ॥ कैसा सभवता हा वेढा ॥ जळचरें उल्हास देती मुक्ति द्यावया रहिवास ॥ जयजय विघ्नराजा ॥ उग्ररूप रे स्वामी तुझें अरण्यांत वास तुझा नाम चिंतामणि देव जय ॥ धृ० ॥ १ ॥ सभवती तीर्थें भारी ॥ पूर्वभागींरे सिद्धेश्वर प्रगट झाली भागिरथि ॥ तीर्थें कायरे वर्णुं आतां ब्रह्महत्या निरसति जय ॥२॥ दक्षिणभागीं मोहंमाया माता कृपाळु जननी समस्तां मोक्ष देती रहिवास रे देवापाशीं ॥ जय ॥३॥ पश्चिम तीर्थ थोर जग ध्यातीरे मोहंमाया ॥ समस्ता सिद्धि देती प्रगट झालीरे मोरेश्वरी काय वर्णुं ॥ उत्तरभागीं जननी (माता) खेळति कल्लोळी ॥ माता ते मोहंमाया ॥ समागमे रे ब्रह्मचारि सकलिक मिळोनियां ॥ ध्यातों चिंतामणि देव आरति उज-ळोनी छंदनाचे (अंदनाचे) गौरी बाळ मोरया गोसाव्यानें चरण (पाय) धरिले देवाचे ॥ नुपेक्षीं या भक्तालागीं अहो जय ॥ ४ ॥

पद २ रें.

अकळु अवतार कऱ्हे पाठारीं ॥ ब्रह्मकमंडलु गंगा ॥ रहि-वास तये तीरीं ॥ भीमकुंड गणेश तीर्थ तेथील महिमा थोर ॥ तेथें केलिया पैं स्नान कर्मा (दोषा) नाहीं ऊरीं ॥ जय जय जय जय जय लंबोदरा ॥ सकळा सिद्धीचा तूं दाता होशील विघ्नहरा (मोरेश्वरा) ॥ १ ॥ तुझें केलिया भजन (पूजन)

चुकतील येरझारा ॥ तूं भक्तजन वत्सल कृपाळु बा मोरेश्वरा ॥ २ ॥ भाद्रपद शुद्ध चतुर्थीसी ॥ चाऱ्ही द्वारें केलिया मुक्ति होय ॥ चारि दिवस उपवास करोनियां चारी पाहे ॥ एक निष्काम करिती सायुज्यता होय ॥ एक कामना इच्छिती इच्छाफळ (पूर्वफळ) देतो आहे ॥ ३ ॥ पूर्वद्वारीं ती मांजराई आदिशक्ति माया ॥ दक्षिणद्वारीं ती आसराई भवानी मोहंमाया ॥ पश्चिमद्वारीं ती ओझराई माता वंदुनियां ॥ उत्तरद्वारीं होय मुक्ति मुक्ताबाई देखिलीया ॥ ४ ॥ माहाद्वारीं ती कृपाळु माता गवराई ॥ दृष्टि सन्मुख जननी जवळि उभा भैरवभाई । वृक्ष उत्तम वामभागीं आदिस्थान तये ठाईं ॥ वृंदावानिचा महीमा तो मी वर्णूं (बोलूं) काई ॥ ५ ॥ ऐसा परिवार सहित मयुर (गांवीं) आहे ॥ भक्त येतिल यात्रेसी तयाचें चित्त (मन) पाहे ॥ मोरया गोसावी दास तुझा तुज 'नित्य' (जवळी आहे) ध्याये प्रतिमासि दर्शन लोटांगणीं (येतो आहे) जाये ॥ जय जय० ॥ ६ ॥

पद ३ रें.

सखि सांगे सखे प्रति (आहो) स्वप्न देखिलें रात्रीं ॥ शेंदुर चर्चिली मूर्ती देखिली डोळां बाप ॥ तयावरी पुसे बाळा (अहो) कैसा भासला डोळां ॥ मजप्रति सांगे वेळोवेळां प्राणसखये॥१॥

एकदंत लंबोदर (आहो) कांसे पितांबर ॥ भाळीं मनोहर शोभला टिळा (त्याचे) सुंदर नयन दोन्ही (आहो) कुंडलें शोभति कानीं ॥ रत्नमाणिक जोडूनी माथां मुगुट शोभे ॥ २ ॥ फरश कमळ करीं (आहो) मोदकें पात्रभरीं अंकुश शोभे करा वरद हस्त 'त्याचे' ॥ सर्वांगीं सुगंध (आहो) दोंदावरी नागबंध ॥ विद्या चतुर्दश आनंद करिती तेथें ॥ ३ ॥ जडित सुलक्षण (आहो) नवरत्न भूषण ॥ बाहुबहिवटकंकण शोभति करी ॥ नानापरिची पुष्पाज्याति (आहो) जाइ जुइ सेवंती ॥ चाफे मोगरे मालति कंठी रूळति माळा ॥ ४ ॥ चरण वांकी तोडरु (आहो) घागऱ्या झणत्कारू ॥ तयेठायीं आधारु भक्त जन ' बाप ' ॥ मोरया गोसावी दास तुझा ॥ (आहो) करितां देखिला पूजा ॥ देखुनि पुरला माझा मनोरथ ' बाप ' ॥ ५ ॥

आरति १ ली.

सकळारंभीं देव आदि गणपती ॥ ब्रह्मादिक हरिहर ऋषिमुनिध्याती ॥ अकळे नकळे अगाध मंगलमूर्ती ॥ जयजयकरुणानिधि कल्याणकीर्ती ॥ १ ॥ जयदेव जयदेव सिद्धि बुद्धि रमणा ॥ आरती (भावार्थीं) ओवाळू तुमचीया चरणा ॥ जयदेव ॥ धृ० ॥ विश्वाधीशा विराट स्वरूप विशाळा ॥ विश्वजन व्यापक अगाधलीला ॥ तारक भवाब्धि भक्तजन कृपाळा ॥

लक्षितां हा लक्ष निर्गुण निराळा ॥ जयदेव० ॥ २ ॥ ब्रह्माविष्णु शिवादि तूं आदिमूर्ती ॥ नकळशी वेदशास्त्रा अगाध गुणकीर्ती ॥ मोरयागोसावी योगिया चित्तीं ॥ सबाह्य अभ्यंतर व्यापक गणपती ॥ जयदेव० ॥ ३ ॥

शेवटली आरति:

झाली पूजा उजळू आरती ॥ भक्तिभावें पूजा करूं विघ्नेशी ॥ पूजेचा आरंभ करितो कुसरी ॥ कैसी पूजा तुझी न कळे अंतरीं ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय (श्री) मंगळमूर्ती ॥ भक्तिभावें तुझे चरण हृदयीं ॥ जयदेव० ॥ धृ० ॥ उजळीले दीप मनोमानसीं ॥ सुखें निद्रा (मोरया) करी तूं मंगलमूर्ती॥ पूर्वपुण्य माया रचिली कुसरी ॥ भक्तिभावें तुज धरिलें अंतरीं ॥ जयदेव० ॥ २ ॥ प्रपंचाची गति न कळे लौकीकी ॥ किती भोग भोगूं विपरीत ध्याती ॥ ह्मणूनी तुज शरण येतों (आलों) प्रतिमासीं ॥ ऐसा भक्ति भाव निरोपि तुजशीं ॥ जय० ॥ ३ ॥ समर्थासी बोलणें न कळे मानसीं॥ऐसा सदोदीत देखिला भक्तीसी ॥ मोरयागोसावी ह्मणे तुजशी ॥ टाकिले वनवासी कवणाचे द्वारीं ॥ जयदेव० ॥ ४ ॥ अर्चन करुनी तुह्मां केली आरती ॥ सुखें निद्रा (मोरया) करी तूं मंगलमूर्ती ॥ जयदेव जयदेव जयमंगलमूर्ती (श्री) मंगलमूर्ती ॥ भक्ति भावें तुझे चरण हृदयीं ॥ ५ ॥ जयदेव० ॥

श्रीमोरया.

श्रीचिंतामणि महाराज कृत

पदें.

व्यर्थ प्रपंचीं गुंतलों बहू विषयानें वेष्टिलों (तुझिया) भजना अंतरलों मोरेश्वरा ॥ १ ॥ बहु फार माया मज लागली या देहा ॥ (महाराजा) एकदां दीनराया मज कृपा करीं ॥२॥ प्रपंचही माया येथें बांधलों दृढची (भजन) तुझें गा मजशी हो न घडेचि ॥ ३ ॥ वेचिलें आयुष्य येथें न घडेची साधन (माझें) चुकवी जन्म मरण गणाधीशा ॥ ४ ॥ तुझिया नामाचि मज लागलीसे गोडी ॥ (भव) बंधन तूं तोडीं हो (महाराजा) गणराज ॥ ५ ॥ आहेसि कऱ्हेतीरीं होसी भक्त सहाकारी ॥ (ध्यान) तुझें म्यां अंतरीं हो धरिलेंसे ॥ ६ ॥ कृपेचा सागरु होसी ॥ भक्तांचा दातारू ॥ (महाराजा) एकदां पैलपार हो उतरी मज ॥ ७ ॥ मोरया गोसावी मज जोडिली दातारू ॥ (महाराजा) तेणें मज वरू ॥ हो दिधलासी ॥ ८ ॥ तूंचि तूं एकचि प्रति तुझ्या हो चरणीं ॥ (महाराजा (आवडी नामाचि मज लागलीसे ॥ ९ ॥ कृपा तूं करुनी मज लावी तूं चरणीं ॥ (महाराजा) दास चिंतामणि हेंचि मागतसे ॥ १० ॥ येई तूं मोरया चरण दाखवी नयनीं ॥) देह कुरवंडी करूनी तुज वोवाळिन ॥ ११ ॥

पद २ रें.

मजसुखपावलेंहो ॥ मोरयादेखिला हो ॥ श्रम माझा हारला हो ॥ केलें विघ्नेश भजन ॥ तेणें नाशिलें मि तूं पण ॥ १ ॥ याता याती मी चुकलों ॥ चरणीं तुझ्या विनटलों ॥ २ ॥ घेतां नाम तुझें वाचें ॥ भय नाहींरे दोषाचे ॥ ३ ॥ न करितां तपतीर्थ ॥ कृपाकेली गणनाथ ॥ ४ ॥ पूर्वपुण्यें जोडि झाली ॥ भेटली गण-राज माउली ॥ ५ ॥ भाग्योदय थोर माझा ॥ शरण आलों मी गणराजा ॥ ६ ॥ विनवी चिंतामणिदास अखंड देई भक्ति रस ॥ ७ ॥

पद ३ रें.

गजानन माझा आहे मोरेश्वरीं ॥ तोचितो पाहिला हो आजि डोळां ॥ १ ॥ अहो भाद्रपदमास शुद्धचतुर्थीस ॥ आनंदले भक्त हो येति तेथें ॥ २ ॥ अहो तया भक्ता माजीं मोरया गोसावी ॥ आणिक दुसरा हो भक्त नाहीं ॥ ३ ॥ अहो देव भक्त तोही एकचि हो जाणा ॥ हे गुह्य कवणा हो कळेना हो ॥ ४ ॥ अहो चिंतामणि देव तैसे तेही रूप ॥ त्यासि तूंचि भेद हो नाहीं जाणा ॥ ५ ॥ अहो आनंदें गर्जती मोरया ह्मणती ॥ यात्रेसी हो जाती भाद्रपदीं ॥ ६ ॥ अहो भाद्रपदमास शुद्ध हाचि पक्ष ॥ चतुर्थीसी थोर हो आनंद हो ॥ ७ ॥ अहो ब्रह्मादिक देव शिव विष्णु तेही ॥ सकळिक येती हो आजि तेथें ॥ ८ ॥ अहो

मोरया गोसावी चिंचवडीं आहे ॥ प्रतिमासीं जाई हो मोरेश्वरा ॥ ९ ॥ अहो यात्रेचा आनंद न माये गगनीं ॥ देवभक्त पाहे हो आजि डोळां॥१०॥अहो देवभक्त तेहि तेथेंच पहावे॥आनंदे गर्जती हो मोरया हो ॥ ११ ॥ अहो ऐसें तेचि सुख चिंतामणि मागे ॥ समर्था तूं देई हो क्षणमात्रें ॥ १२ ॥

श्रीविघ्नेश्वरमहाराजांचें पद.

माझी मयुरपुरी हेचि पंढरी ॥ नाम गर्जे अंबरीं ॥ माझी विठ्ठलमूर्ति देउळांत ॥ शोभे सेंदुर चर्चित ॥ अहो दूर्वांकुर तुळसीदळ ॥ शोभेशिरीं अद्भुत ॥ माझी० ॥ १ ॥ अहो शुंडा दंड कटीवरी ॥ शोभे हाताच्या परी ॥ भक्तिभाव दृढधरी ॥ पाय तया विटेवरी ॥ मा० ॥ २ ॥ माझी रुक्मिणी राधा सिद्धिबुद्धि ॥ चवरे ढाळिती ॥ नित्य भेटी देउनियां ॥ दिधली भक्ताच्या आधीं ॥ मा० ॥ ३ ॥ अहो ब्रह्मकमंडलु भीमगंगा ॥ गणेशतीर्थ चंद्रभागा ॥ तेहतीस कोटी देव येती ॥ नित्य स्नानाच्या योगा ॥ मा० ॥ ४ ॥ अहो भैरव भाई पुंडलीक ॥ कल्प वृक्ष कळंबक ॥ विघ्नेश्वर दास बोले ॥ सूक्ष्म गाईचा रक्षक ॥ माझी० ॥ ५ ॥

श्रीधरणीधरमहाराजांचें पद.

नीळकंठा परशुधरा येये हा शक्तिश्रीवरा ॥ प्रभाकरा एकभावें अर्चन करावें ॥ पंचमूर्तीच्याठाईं ज्यानें येये हा द्वैत धरिलें ॥ आपुलें कर्म करून त्यानें नरक साधिले ॥ १ ॥ वरण्यातें स्वमुखें करूनि येये हा गीता सांगितली ॥ उत्तम योगाची हीं खुण तेथें जाणविली ॥ २ ॥ गजानन अनंत रूपी येये हा आहे कीं साचा॥ मायाजाळें मंदमतीसी अनुमान कैंचा ॥ ३ ॥ यास्तव तुजला प्रार्थितों येये हा मना समजावे ॥ गजाननाचे सर्वभावें नामची वदावें ॥ ४ ॥ योगादिक साधनें येये हा कशास करावें ॥ स्वल्प प्रयत्नें नित्याभ्यासे मुक्ति सेवावे ॥५॥ मोरयागोसावी यांचे येये हा वंशीं किंकर ॥ धरणीधर वरद कृपेनें सुखी निरंतर ॥ ६ ॥

श्रीमोरयाष्टक.

श्री वक्रतुंडपदपंकज हें नमूनी ॥
मी प्रार्थितों पतित हा विनती करूनी ॥
सिद्धीस मत्कवन नेतिल फार आस ॥
पोटीं धरी करुनि निश्चय दीन दास ॥ १ ॥
श्रीमोरया गुरु सदा पवनातटाकीं ॥

वास्तव्य नित्य करुनी बसला विलोकी ॥
सुक्षेत्र चिंचवड हें तइं जाहलें कीं ॥
विख्याति पावत असे बहु मृत्युलोकीं ॥ २ ॥
सर्वांगिं सिंदुर गळां नवपुष्पहार ॥
दूर्वांशमीदल शिरीं दिसती अपार ॥
घेऊनियां गणपती अवतार आला ॥
तारावया भवनिधींतुनि तो जनांला ॥ ३ ॥
हा भाव जाणुनि मनीं स्तवना कराया ॥
हो सिद्ध मन्मति पहा जगदेकराया ॥
जें बोबडें वचन मन्मुखिचें निघालें ॥
तें पाहिजे परिसुनी मज धन्य केलें ॥ ४ ॥
येई न नाम तव हें कधिं मन्मुखांत ॥
त्वद्भक्तिही न उपजे मम अंतरांत ॥
आलों तरी शरण आजि तुझ्या पदातें ॥
श्रीमोरया भव निधींतुनि तारिं मातें ॥ ५ ॥
निर्बुद्ध, मंद, जड, आळसि, मी तसाच ॥
निर्विद्य, अज्ञहि निरक्षर जाण साच ॥
सत्संग देउनि अहर्निश पामरातें ॥ श्रीमोरया० ॥ ६ ॥
उद्धारिलेस निजभक्त कितीक तूं ही ॥
सीमा तयास गणितां मिळणार नाहीं ॥

त्वत्कीर्ति ही असुनि तारिसि कां न यातें ॥
श्रीमोरया० .... ॥ ७ ॥

वर्णावया तव गुणा शिणले सहा कीं ॥
शोधूनि चार दमले तुजला त्रिलोकीं ॥
आद्यंत हा न कळला तव बा कुणातें ॥ श्रीमोरया० ॥८॥

तूं भूतमात्र अवघें सम वागवीलें ॥
मित्रारि यांस सुवचें बहु गौरवीले ॥
बा, पावलास जगतीं किति धन्यतेतें ॥
श्रीमोरया भव० ॥ ९ ॥

संसार साधुनि तुवां परमार्थ केला ॥
सद्भक्तिनें प्रभु गजानन आळवीला ॥
सन्मार्ग हा सुलभ दावियला जनांतें ॥ श्रीमोरया०॥१०॥

तूं तात तूं जननि तूं मम बंधु तूंही ॥
मातें तुझ्याविण दुजें गण गोत नाहीं ॥
जाणेन मी जपतपादिक साधनातें ॥ श्रीमोरया०॥ ११ ॥

मत्पूर्वपुण्य म्हणुनी मज दाविलेंस ॥
सप्रेम चिंचवडि आणुनि त्वत्पदास ॥
सेवा घडो सततही तव या नरातें ॥
श्रीमोरया भवनिधींतुनि तारिं मातें ॥ १२ ॥

स्तुतिपर पदें.

पद १ लें. (चाल–धांव विभो०)

सकलारंभीं वंदन माझें चिंचवडीच्या गुरु मोरयाला ॥ ॥ धृ० ॥ पवनातटीं स्थल पाहुनी सुंदर वास जयानें नित्यचि केला ॥ १ ॥ भक्तजनोद्धारार्थचि जगिं या गणपति रूपें जो अवतरला ॥ २ ॥ विष्णुदास हा तत्पादिं विनवी सन्मति द्यावा त्वत्कवनाला ॥ ३ ॥

पद २ रें (चाल–सोच समजे नादान०)

शरण चला मोरयाला । विनवितसें मी अखिल जनाला ॥ धृ० ॥ भवभयहारक षड्रिपु मारक, सन्मति दायक वंदु तयाला ॥ १ ॥ शोधुनि ज्याला चारहि दमले । थांग सहांना न च लागियला ॥ २ ॥ अठरा ज्याचे गुणगण गातां । व्यापक विभु जो मनिं ना ठेला ॥ ३ ॥ संत महाजन स्तवन करिती परि । नवविध मार्गें नच आकळला ॥ ४ ॥ सर्व चराचर व्यापुनि उरला । विष्णुदास हा तत्पादिं रमला ॥ ५ ॥

पद ३ रें (चाल– नारी मजर तुझी०)

तारीं मजसी मोरया ॥ भवनिधिमाधिं मी बुडतचि आहे हे देवा सदया ॥ धृ० ॥ षड्रिपु सतत मला छळिती । मन्मन

तव पदिं विघडविती ॥ अंतरिं दुर्मति उपजविति । विघ्नहरा हेरंबा उद्धरिं बालकृष्णतनया ॥ १ ॥

पद ४ थें (चाल–अरसिक कि०)

माते पवनाबाई ॥ ठेवितसें तव पायीं डोई ॥ धृ० ॥
बघतां नयनीं तुजला । मोद मनाप्रति अतितर होई ॥ १ ॥
स्पर्श तुझ्या उदकाचा । घडतां अघमल विलया जाई ॥ २ ॥
त्वज्जलीं मज्जन करितां । पातकी तनु ही विमला होई ॥ ३ ॥
त्वत्सहवाससुखातें । दुस्तर या भवीं विष्णुस देई ॥ ४ ॥

आरती श्रीमोरयाची.

चाल–– [साधी]

कर्नाटक वासी द्विज वामन नाम । शालिग्रामीं होता करुनी निजधाम । दारिद्र्येगांजुनी सोडुनी स्वग्राम । भार्येसह मयुरेश्वरि पावे विश्राम । जय देव जय देव जय वामन तनया । जय पार्वती तनया ॥ आरती ओंवाळू तुजला मोरया ॥ धृ० ॥ १ ॥ पुत्रप्राप्तीसाठीं रहिवास केला । सद्भावें आराधी श्रीमयुरेशाला ॥ उग्र तप पाहुनी प्रसन्न प्रभु झाला । सप्रेमें स्वप्नांतरिं येउनि वर दिधला ॥ जय दे० ॥ २ ॥ येतों उदरीं तुझ्या घेउनि अवतार । जगदुद्धारा साठीं या पृथ्वीवर । ऐशा

परिसुनि वरा द्विज तोषे फार । भावें गुण वर्णुनियां ठेवी पादें शीर ॥ जय० ॥ ३ ॥ तत्कांता सति पार्वति गर्भवती झाली । नव मासांती पुत्ररत्ना प्रसवली । त्यांते श्रीमोरया संज्ञा ही दिधली । सत्कीर्ती नौबद जगिं ज्याची दुमदुमली ॥ जय० ॥ ४ ॥ स्थावर क्षेत्रीं जाउनि तप तेणें केलें । चिंतामणिच्या वरा मिळवुनि परतले । आज्ञा घेउनि प्रभुची चिंचवडा आले । पवनातटिं रम्यस्थल पाहुनि राहियले ॥ जय दे० ॥ ५ ॥ प्रतिमासीं मयुरेश्वरिं वारिस येऊनी । तोषविलें मयुरेशा निजभक्ती करुनी । प्रभु वदले भक्तांचें वृद्धत्व बघुनी । येउं नको बा पुढती तनु कष्टवोनी ॥ जय०॥ ६ ॥ निष्ठा पाहुनि तुझी मन्मन बहु धालें । तवसदनीं येतों मी वचन दीधलें॥ गणेशकुंडीं स्नाना गोसावी गेले । तत्करकमलीं शीलारूपें अवतरले ॥ जय० ॥ ७ ॥ गोसावी आनंदें प्रभु घेउनि आले । चिंचवडी निजसदनीं स्वकरें स्थापियलें । तच्छक्तीनें जे जे चमत्कार केले । परिसुनि अवघेजन हे मनि विस्मित झाले ॥ ८ ॥ अंगस्पर्शें सर्पव्याघ्र उद्धरले । कुष्ट,रोगी, विप्रा आरोग्य दिधलें । शूद्र कन्यकेचें अंधत्व हरिलें ॥ वैश्यमृत पुत्रातें सदयें उठवीलें ॥ जय०॥ ९ ॥ अगाधलीला ज्याच्या स्वमुखानें गातां । थकले कवि तेथें मी कितिवर्णू आतां । सप्रेमें मोरया हरि भवभय चिंता । विष्णूदास ठेवीं तत्पादें निजमाथां॥जयदेव जय०॥१०॥

पुरवणी १.

श्रीचिंतामणि महाराज यांचें तुकोबारायाशीं झालेल संभाषण.

अभंग. ४३८६

चिंतामणिदेवा, गणपतीसी आणा ॥ करवावें भोजना दुजे पात्रीं ॥ १ ॥ देव ह्मणती तुक्या एवढी कैची थोरी । अभिमाना भीतरीं नागवलें ॥ २ ॥ वाढ वेळ झाला शिळें जालें अन्न । तटस्थ ब्राह्मण बैसलैती ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा तुमच्या सुकृतें । आणिन त्वरित मोरयासी ॥ ४ ॥

अभंग. ४३८७

वांजा गाई दुभती । देवा ऐसी तुझी ख्याती ॥ १ ॥ ऐसे मागत नाहीं तुज । चरण दाखवावे मज ॥ २ ॥ चातक पाखरूं । त्यासी वर्षे मेघ धारू ॥ ३ ॥ पक्षी राजहंस । अमोलिक मोती त्यास ॥ ४ ॥ तुका ह्मणे देवा । कां गा खोंचलासी जीवा ॥ ५ ॥

अभंग. ४३८८

भोक्ता नारायण लक्षुमीचा पति । ह्मणूनी प्राणाहुती घेतलिया ॥ १ ॥ भर्ता आणि भोक्ता कर्ता आणि करविता । आपण सहजता पूर्णकाम ॥ २ ॥ विश्वीं विश्वंभर कृपा दृष्टी सांभाळि-

त । प्रार्थना करीत ब्राह्मणाची ॥ ३ ॥ कवळोकवळीं नाम घ्या-
वें गोविंदाचें। भोजन भक्तांचें तुका ह्मणे ॥ ४ ॥

अभंग ४३८९

माझा स्वामि तुझी वागवितो लात । तेथें मी पतित काय आलों ॥ १ ॥ तीर्थें तुमच्या चरणीं जाहलीं निर्मळ । तेथें मी दुर्बळ काय वाणूं ॥ २ ॥ तुका ह्मणे तुह्मी देवा द्विजवंद्य । मी तों काय निंद्य हीन याति ॥ ३ ॥

अभंग ४३९०

परतें मी आहें सहजचि दुरी । वेगळे भिकारी नाम रूपा ॥ १ ॥ नलगे रुसावें धरावा संकोच । सहज तें नीच आले भागा ॥ २ ॥ पडिलिये ठायीं उच्छिष्ट सेवावें । आर्थ तेंचि देवें केलें ऐसे ॥ ३ ॥ तुका ह्मणे तुह्मी आह्माजी वेगळे ॥ केले-ती निराळे द्विज देवें ॥ ४ ॥ तुकाराम गाथा भाग २ (यंदे आणि मंडळीकृत) १९०३

याशिवाय भक्तिविजय, तुकाराम चरित्र वगैरे ग्रंथांतही थोड्या बहुत फरकानें वरील संभाषणाचा अनुवाद केला आहे तो भाविक वाचकांनीं मर्जीनुरूप पहावा.

श्रीसमर्थ रामदास यांनीं या प्रसंगीं जी-" सुखकर्ता दुःख-हर्ता वार्ता विघ्नांची " इ० आरती केली ती सर्वप्रसिद्ध आहेच.

मोरगांवाहून चिंचवडास प्रथमच निघते वेळीं केलेलें पद.

राग १

आदि अवतार तुझा अकुळ कऱ्हे पाठारी ब्रह्म कमंडलु गंगा । रहिवास तये तिरीं स्नान पै केलिया हो ॥ पाप तप निवारी (देवा) मोरया दर्शन ॥ जन्ममरण पै दुरि जय देवा मोरेश्वरा॥ जय मंगलमूर्ती आरति चरण कमला ॥ ओवाळु प्राणज्योती जय देवा मोरेश्वरा ॥ धृ० ॥ अहो सुंदर मस्तकीं हो मुगुट दिसे साजिरा विशालकर्णद्वयें ॥ कुंडलें मनोहर त्रिपुंड टिळक भाळीं ॥ अक्षता तेजे स्वर (देवा) प्रसन्न मुख कमल ॥ मस्तकीं दुर्वांर जय देवा मो० जय मं० ॥ २ ॥ अहो नयने निर्मळ हो ॥ अति भोवया सुरेख एक दंत शोभताहे जडले रत्नें माणिक बरवी सोंड सरळ ॥ दिसती अलोलिक (देवा) तांबूल शोभे मुखीं ॥ अधरंग सुरेख जय० ॥ ३ ॥ चतुर्भुज मंडित हो शोभती आयुधें करीं ॥ फरश कमल अंकुश हो मोदकपात्र भरी ॥ अमृतफळ नागर सोंड शोभ तयावरी (देवा) मूषक वाहन तुझें लाडु भक्षण करी ॥ जय० ४ ॥ नवरत्न कंठीं माळा । यज्ञोपवीत सोज्वळ ताईत मिरवितसे तेज ढाळ निर्मळ ॥ जाई जुई नागचाफा । पुष्पहार परिमळ

(देवा) चंदन कस्तुरीहो उटी घेउनी परिमळ ॥ जय० ५ ॥
अहो प्रसन्न दिसे दोंद तयावरी नागबंद सर्वांगीं सेंदुरहो ॥ वरी
मिरवे सुगंध नाभीमंडळ सुरेख विद्या करिती आनंद (देवा)कटि
सूत्र शोभताहे ॥ मेखळा कटिबंध ॥ जय० ६ ॥ सुकुमार जानु
जंघा पवित्र चरण कमळ वर्तुळाकार घोटी । टांचा दिसे
सोज्वळ पाउलें काय वर्णूं । आंगुलिका सरळ (देवा) नखीं
चंद्र मिरवितसे ॥ भ्रमर घेती परिमळ ॥ जयदेव० ॥ ७ ॥ अहो
चरणीं तोडर वाकी अदुनाद साजिरा रत्नसिंहासनीं हो वोवाळूं
विघ्नहारा देईल भुक्ति मुक्ति चुकतील येरझारा ॥ गोसावीदास
तुझा मोरया गोसावी दास तुझा॥ओवाळू विघ्नहरा ॥ज०॥ ७॥

कऱ्हा नदीस पूर येऊन पलिकडे जातां येईना त्या वेळीं केलेलें पद. २

तुझिया भेटिची बहु आस रे मोरया । लेखितां बहुत झाले
दिस रे मोरया॥ कां बापा धरियेले उदास रे मोरया । वियोगें
झालें कासावीस रे मोरया॥१॥तुजविण कोण आम्हा आहे बा
मोरया॥एकवेळ कृपा दृष्टि पाहे रे मोरया॥धृ०॥ रात्रंदिवस वाट
पाहेरे मोरया॥ निढळावरी ठेउनि बाहे रे मोरया ॥ वेगीं तूं येई
लवलाही रे मोरया ॥ धेनु वत्सालागी जैसी मोहे रे मोरया॥२॥
जन्मोजन्मींचा तुझा दास रे मोरया ॥ आणिक कोणाची ना-
हीं आस रे मोरया ॥ एक वेळ उद्धारी या दीनास रे मोरया ॥

त्रास देई सकळा कर्मास रे मोरया ॥ ३ ॥ संसारसागरीं दुःख भारी रे मोरया । एक वेळ भवसिंधु तारि रे मोरया ॥ आया गमन तूं निवारीं रे मोरया ॥ दीनानाथ एक वेळ तारि रे मोरया ॥ ४ ॥ दीनवत्सल बाप आला रे मोरया ॥ साष्टांग दंडवत घाला रे मोरया ॥ मोरया गोसावी तन्मय झाला रे मोरया ॥ चरणांबुज देखूनिया निवाला रे मोरया ॥ तुजवीण कोण आह्मां आहे बा मोरया ॥ एक वेळ कृपा दृष्टि पाहे रे मोरया ॥ ५ ॥

तटींचे झाडाखालीं देव येऊन बसलेले पाहून मोरयांनी केलेलें पद ३.

भवश्रम हारला हो ॥ मोरया देखिला हो ॥ धृ० ॥ नयनीं अवचीत भासला ॥ अंगीं चंदन चर्चिला ॥ १ ॥ आला लव-लाही धावूनी ॥ भेटी दिधली आलिंगुनी ॥ २ ॥ शुंडादंड उभारिला ॥ नाभी नाभीसी बोलला ॥ ३ ॥ असुरा कंजन मोरेश्वर भक्तजना वज्र पंजरा ॥ ४ ॥ मोरया गोसावी दातार ॥ विघ्न अंतक मोरेश्वरा ॥ ५ ॥

श्रीचा तांदळा प्राप्त झाल्यावर केलेलें पद ४.

माझ्या स्वामीचे भोग विलासरे । चला जाऊ पाहूं त्या मोरयास रे ॥ चारी दिवस चरणीं करूं वास ॥ दर्शना जालिया

पातक होईल नाशरे ॥ माझ्या० ॥ १ ॥ रत्नजडित मुगुट शोभिवंतरे ॥ बैसला देऊळांतरे ॥ मोरया गोसावी पूजा करितो ॥ त्याचे हृदयीं नांदतो सततरे ॥ २ ॥ एके नारी ती पूजा घेउनि हातींरे ॥ एके नारी आणिल्या पुष्पयाति रे ॥ चंपक बुकुल मोगरे मालतींरे ॥ महाराजाची पूजा बांधितरे ॥ ३ ॥ बावन चंदनाची शोभिवंत उटीरे ॥ नवरत्नाचा हार शोभे कंठींरे ॥ मृगनाभीचा टिळकू ललाटीं ॥ गोरा सेंदूर झळकतो भृकुटी रे ॥ ४ ॥ जाई जुई अबया नागचाफे रे ॥ पारिजातक कमळे शोभति धोपरे ॥ भक्त भ्रमर होऊनी जाता झोपी रे ॥ ५ ॥ भक्तजन द्वारें करावया जाती रे ॥ स्वामी माझा उभा तो देउळांतरे ॥ अमृतदृष्टि करूनि न्याहाळितो समस्तरे । त्याचे कृपेनें भाग शीण जातो रे ॥ ६ ॥ भक्त भद्र त्याची द्वारें करिती रे॥मोरया गोसावी दिंडी घेउन हाति रे ॥ भाग्यवंत हरिकीर्तन गातीरे ॥सकळजन तेथें लोटांगणीं येती रे ॥ ७ ॥ तीनी द्वारें करुनि मुक्ताईस जातीरे ॥ वंदोनियां महाद्वारा येती रे ॥ पंचतत्वांच्या आरत्या वोवाळिती रे त्यासि तात्काळ प्रसन्न गणपतीरे ॥ ८ ॥ ऐसा आनंद होतसे मोरेश्वरीरे ॥ मोरया गोसाव्याच्या खेळत असे घरींरे ॥ भक्त जनांसी प्रसाद देतो झणींरे ॥ निजभक्ता देई परिपूर्ण परी रे ॥ ९ ॥

श्रीचिंतामणीस श्रीमोरेश्वरांनीं मोरगांवाहून येऊन चतुर्थीस अन्न दिलें त्या वेळेचे

पद ५.

मज सुख पावलें हो । मोरया देखिला हो ॥ श्रम माझा हरला हो ॥ केलें विघ्नेश भजना ॥ तेणें नाशिलें मी तूं पण ॥ १ ॥ यातायाति मी चुकलों ॥ चरणीं तुझ्या विनटलों ॥ २ ॥ घेतां नाम तुझे वाचे ॥ भय नाहीं रे दोषाचें ॥ ३ ॥ न करितां तप तीर्थ ॥ कृपा केली गणनाथ ॥ ४ ॥ पूर्व पुण्य जोडी जाली ॥ भेटली गणराज माउली ॥ ५ ॥ भाग्योदय थोर माझा ॥ शरण आलों मी गणराजा ॥ ६ ॥ विनवी चिंतामणि दास ॥ अखंड देई भक्तिरस ॥ ७ ॥

श्रीमोरेश्वरांनीं शिवरूप धरिलें त्या वेळेचें

पद ६

गजानान माझा शिवरूप झाला॥विश्व म्यां पाहिला आजि डोळा ॥१॥ अहो सिद्धि बुद्धि दोन्ही गंगा गौरि जाणा ॥दशभुज तोहि हो देखिला हो ॥ २ ॥ आयुधें सहित दशहस्तीं जाणा ॥ नंदि हा मूषक हो शोभे त्याला ॥ ३ ॥ अहो ऐसा गणराज विश्व म्यां पाहिला ॥ तत्काळ हा झाला हो विष्णु तोची ॥

॥ ४ ॥ अहो चतुर्भुज तोही सिद्धि हा सहित ॥ अंकुर फरश-हो चक्रगदा ॥ ५ ॥ अहो गरुडवाहन मयूर येथ शोभ ॥ लक्ष्मीनारायण हो ह्मणती त्याला ॥ ६ ॥ अहो ऐसें तेंही नाम सिद्धि विनायक ॥ ऐसें त्रिगुणात्मक हो रूप त्याचें ॥७॥ अहो शिव विष्णु ते ही रूप हे धरुन ॥ साजतील तिन्ही हो गणराज ॥८॥ अहो मोरया गोसावी ॥ कृपा (दया) मज वर केली ॥ तेणें स्फूर्ति जाली हो बोलावया ॥९॥ अज्ञान बोबडे चिंतामणि ॥ मोरयासि रंजवी हो वेळोवेळीं ॥ १० ॥

तुकारामांनीं श्रीमयूरमोरेश्वराकडे पाहून केलेला अभंग ७.

" शिरीं जटाजूट त्रिपुंड टिळक । ललाटिं सुरेख शोभताहे ॥ १ ॥ भ्रूमध्यें शेंदूर रक्तवर्ण फार । प्रेमानें गंहिवर येत आहे ॥ २ ॥ नेत्रीं आश्रुधारा कंठ सद्गदित ॥ पाहतां गणनाथ हर्षी पावे ॥ ३ ॥ विस्तीर्ण शोभतें कैसें उरस्थळ ॥ प्रवालमणि-माळ गळां शोभे ॥ ४ ॥ कौपिन लंगोटी गळा कफनि आहे । हातीं स्मरणी राहे सदोदित ॥ ५ ॥ अजानुबाहु दंड पावुलें सुरेख ॥ प्रत्यक्ष विनायक शोभताहे ॥ ६ ॥ अमोल हा बाणा तुमचा सद्गुरू देवा । तुका ह्मणे सेवा काय करूं ॥ ७ ॥

ग्रंथकाराची प्रार्थना.

शार्दूलवि०.

गेला सिद्धिस हा प्रयत्न अवघा माझा जयांच्या वरें ॥ वर्णावें किति तद्गुणांस वदनें मीं दुर्बळें पामरें ॥ साष्टांग प्रणिपात मी करुनियां भावें तयां प्रार्थितों ॥ व्हावीं सच्चरितें अशीं ममकरें हें मागणें मागतों ॥ १ ॥

इंद्रवज्रा.

श्रीमोरयाचें रचिलें चरित्र ॥ शोधूनि गद्यात्मक मी पवित्र ॥ तें अर्पितों मी विबुधोत्तमाला ॥ सोत्कंठ सेवोत सुखें तयाला ॥२॥

वैतालिक.

पडलें चरितीं जरी उणें ॥ अथवा आधिक तें कुठें दुणें ॥ सुजनीं सदयेंचि साहुनी ॥ न धरावा लव रोष हा मनीं ॥ ३ ॥

आर्या.

हें सच्चरित्र ज्याचें खेडकरोपाख्य विष्णुनें केलें ॥ वास्तव्यक-टुग्रामीं ज्याचें त्यानें तयांस अर्पियलें ॥ ४ ॥ अठराशेंपस्तीशीं संपविलें मी प्रमादिअब्दांत ॥ श्रावणवद्य चतुर्थीदिनिं यामिनिं सौम्यवारि हें चरित ॥ ५ ॥

समाप्त.

Printed & Published by V. V. Pathak Jagadishwar Press
Girgaon Gaiwadi House No. 2 Bombay.

विष्णु बाळकृष्ण खेडकर यांनीं केलेलीं

पुस्तकें खालील [illegible]

[illegible]हेत.

...राम मवाळ कडुसकर साधु यांचें

पद्य-चरित्र कि ८=

२ शिशुवर्गोपयोगी सोपीं गाणीं कि. ८=

३ स्कूलड्रिल अथवा व्यायाम पद्धति कि. ८=

पत्ताः—१ वि० बा० खेडकर

स्टे० मा० चिंचवड जि० पुणें

बाळकृष्ण लक्ष्मण पाठ[illegible]

मोतीबाजार-मुंबई